सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | बुधवार, २२ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २९८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## समाजाचा आणि सभासदांचा उत्कर्ष हा सहकाराचा उद्देश - हरिभाऊ बागडे

अहिल्यानगर दि. २१ जानेवारी : केवळ नफा मिळविणे हे सहकाराचे ध्येय नसून समाजाचा आणि सभासदांचा उत्कर्ष हा सहकाराचा खरा उद्देश आहे, असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केले. कोपरगाव तालुक्यातील सहजानंदनगर येथील गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघ लिमिटेडच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त विविध प्रकल्पांचा व कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या नवीन घरकुलांच्या बांधकामांच्या पायाभरणीचा शुभारंभ राज्यपाल बागडे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार रमेश बोरनारे, आमदार विठ्ठलराव लंघे, आमदार काशिनाथ दाते, आमदार अमोल खताळ, माजी खासदार डॉ.सुजय विखे पाटील, गोदावरी खोरे नामदेवराव परजणे तालुका दूध उत्पादक संघाचे चेअरमन राजेश परजणे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनी विखे पाटील आदी उपस्थित होते.



राज्यपाल बागडे म्हणाले, चांगल्या भावनेने सहकार क्षेत्रात काम केल्यास संस्थांना तोटा होत नाही, तोटा झाला तरी त्याची भरपाई अधिक क्षमता वापरून करता येते. देशात सहकार क्षेत्रातील विविध उद्योग मागील ६० वर्षांपासून यशस्वीपणे चालू आहेत.दूध उत्पादक व सभासद हा खरा दूध संघाचा मालक असतो, असे नमूद करून राज्यपाल बागडे म्हणाले, दूधसंघात उत्पन्न व खर्च याचा ताळमेळ बसला पाहिजे. उत्पन्नापेक्षा खर्च कमी पाहिजे, तरच सहकारी संस्था नफ्यात राहतील. दूध उत्पादक व वितरकांनी दूध भेसळ होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. दूध व्यवसाय हा शेतकऱ्याच्या हिताचा असल्याने तो टिकला पाहिजे. दूध उत्पादनात भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे,असेही त्यांनी सांगितले. पालकमंत्री विखे पाटील म्हणाले,एखादी संस्था सहकारात पन्नास वर्ष पूर्ण करत आहे, ही घटना सहकाराबद्दल लोकांचा विश्वास अधिक दृढ करणारी आहे. गायींच्या निकृष्ट दर्जाच्या बीजावर बंदी घालणारा कायदा राज्य शासनाने आणल्याने येत्या काळात गायींच्या संख्येत वाढू होऊन दूध उत्पादन क्षमता वाढणार आहे. राज्यात सर्वाधिक ५३ लाख लीटर दूध उत्पादन अहिल्यानगर जिल्ह्यात होत आहे. मदर डेअरीचा प्रकल्प शिर्डी औद्योगिक वसाहतीत सुरू करण्याचा मानस असल्याचे ही त्यांनी सांगितले.जिल्ह्यात दूधाचे उत्पादन वाढल्याने शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या कमी झाली आहे. राज्यशासनाने शेतकऱ्यांना सात अश्वशक्ती पर्यंत वीज मोफत दिली आहे. पश्चिम वाहिनी नद्यांचे ६५ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात आणण्यासाठी जलसंपदा विभागाचे प्रथम प्राधान्य असणार असल्याचेही पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले.याप्रसंगी राज्यपालांच्या हस्ते १.५ मेगावॅट (डी.सी.) क्षमतेचा सौरउर्जा प्रकल्प, दूध शुद्धीकरण मशीन, सतत खवा बनविणारी मशीन, पाणी शुद्धीकरण यंत्रणा आणि पाणी साठवण टँक या प्रकल्पांचे उद्घाटन करण्यात आले.याप्रसंगी राज्यपालांच्या हस्ते संवत्सर ग्रामपंचायती च्या घरकुल प्रकल्पांसाठी शेती महामंडळाच्या जागेचा उतारा ग्रामपंचायतीला वाटप करण्यात आला. प्रास्ताविक राजेश परजणे यांनी केले.

## पंतप्रधान फेब्रुवारीत महाकुंभाला भेट देणार

नवी दिल्ली, २१ जानेवारी : पंतप्रधान नरेंद्र मोदी फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात महाकुंभमेळ्याला भेट देण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा २७ जानेवारी रोजी तर उपराष्ट्रपती जगदीप धनखड १ फेब्रुवारी रोजी कुंभमेळ्याला भेट देणार आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू १० फेब्रुवारी रोजी महाकुंभमेळ्याला हजेरी लावणार आहेत. महाकुंभ मेळ्याला १३ जानेवारी रोजी सुरुवात झाली असून आतापर्यंत सुमारे ९ कोटी लोकांनी त्रिवेणी संगमात स्नान केले आहे. आगामी २६ फेब्रुवारी पर्यंत चालणाऱ्या महाकुंभात एकूण ६ स्नान होणार आहेत, त्यापैकी ३ अमृत स्नान आहेत. तीन अमृत स्नानांपैकी एक आधीच झाले आहे, ज्यामध्ये सुमारे साडेतीन कोटी लोकांनी भाग घेतला होता. यात १३ वेगवेगळ्या आखाड्यांमधील संत आणि साधू देखील होते. महाकुंभात दररोज सुमारे १० लाख भाविक गंगा नदीत स्नान करतात. आतापर्यंत ८.२६ कोटी भाविकंनी त्रिवेणी संगमात स्नान केले आहे.

## मुंबईच्या समुद्रात आता 'ई-वॉटर टॅक्सी' धावणार!




मुंबई : मुंबईकरांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. आता देशातील पहिलीवहिली ई-वॉटर टॅक्सी मुंबईत धावणार आहे. गेटवे ऑफ इंडिया ते जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) दरम्यान ही टॅक्सी सेवा चालवण्यात येणार आहे. या ई-वॉटर टॅक्सीने मुंबईकरांची उत्सुकता ताणून धरली आहे.

माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेड आणि जेएनपीटी यांच्यातील करारानंतर ही सेवा पुढील महिन्यापासून नियमितपणे सुरू केली जाणार असल्याची माहिती मिळाली आहे. या नवीन वाहतूक मार्गाच्या पर्यायाने मुंबईला भेडसावणारा वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटणार आहे. या निर्णयाचे तमाम मुंबईकरांनी स्वागत केले आहे. जलमार्गांच्या वापराला प्रोत्साहन देण्यासाठी हे एक महत्त्वाचे पाऊल म्हटले जात आहे. यापूर्वीही वॉटर टॅक्सी आणि रोपॅक्स फेरी सेवा सुरू करण्यात आली होती. मात्र, पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमती आणि पर्यायाने महागड्या तिकीट दरांमुळे या सेवांना मुंबईकरांनी प्रतिसाद दिला नाही.

सुरवातीला या ई - वॉटर टॅक्सीचे मॉडेल परदेशातून आणण्याचे ठरले होते. मात्र नंतर माझगाव डॉक शिपबिल्डिंग लिमिटेडने (एमडीए) स्वत:च इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी तयार करण्याचा निर्णय घेतला. तसेच, इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीची निर्मितीही यशस्वीपणे पूर्ण केली आहे. त्यामुळे मुंबईकरांच्या वाहतुकीचा नवा पर्याय उपलब्ध झाला आहे.

इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीचे स्वरूप कसे असेल ?

ही इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी १३.२७ मीटर लांब आणि ३.०५ मीटर रुंद आहे. तसेच या इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सीमधून २५ प्रवाशी प्रवास करू शकतात. यामध्ये ६४ किलोवॅटची बॅटरी आहे. ही इलेक्ट्रिक वॉटर टॅक्सी एकदा चार्जिंग केल्यावर ४ तास चालू शकते. या टॅक्सीचा वेग १४ नॉट्सपर्यंत असणार आहे. याशिवाय, या ई - वॉटर टॅक्सीत वातानुकूलित सुविधा उपलब्ध असणार आहेत. ज्यामुळे प्रवाशांना आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळेल. दरम्यान आता मुंबईकरांचा या वाहतुकीला कसा प्रतिसाद मिळेल हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## राहुल गांधी हे 'पप्पू टप्पू उडान टप्पू' : खा. बोंडे

अमरावती, २१ जानेवारी : काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांची जीभ छाटायला नको तर जिभेला चटके द्यायला पाहिजे असे वादग्रस्त विधान करणारे भाजपचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी पुन्हा एकदा राहुल गांधी यांना लक्ष केले आहे. 'पप्पू टप्पू उडान टप्पू' म्हणत बोंडे यांनी त्यांच्यावर जहरी टीका केली आहे.

खासदार डॉ. अनिल बोंडे पत्नी डॉ. वसुधा बोंडे यांच्यासोबत अंदमान निकोबार बेटाच्या दौऱ्यावर आहेत. केंद्र सरकारच्या हिंदी राजभाषा समितीच्या निमित्याने त्यांचा हा दौरा होत आहे. दरम्यान त्यांनी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या सेल्युलर तुरुंगातील काळकोठडीला भेट दिली. ज्या ठिकाणी सावरकरांना काळ्यापाण्याची शिक्षा भोगावी लागली त्या कोठडीत जाऊन अनिल बोंडे यांनी सावरकरांचे स्मरण केले. त्या कोठडीत काही काळ ध्यानही केले. तसेच सावरकरांच्या पावन स्मृतीला आपण नमन करत असल्याचे देखील त्यांनी स्पष्ट केले. दहा वर्षापर्यंत स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी या कोठडीत वास्तव्य केले. जी माणसे वीर सावरकरांवर टीका करतात, त्यांनी या कोठडीत एकदा येऊन बघावे. सात दिवस राहून पाहावे. इथला कोल्हू चालवावा.

## प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये दिसणार 'प्रलय' मिसाईल

नवी दिल्ली : २६ जानेवारी रोजी भारत आपला ७६वा प्रजासत्ताक दिन साजरा करणार आहे, त्यासाठी नवी दिल्लीतील कर्तव्य पथ येथे होणाऱ्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी भारत सज्ज झाला आहे. यंदाची परेड विशेष ठरणार आहे कारण डीआरडीओचे प्रलय क्षेपणास्त्र प्रथमच कर्तव्यपथावर प्रदर्शित होणार आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या संचलनात पहिल्यांदाच 'प्रलय' मिसाईलचा समावेश करण्यात आला आहे. हे क्षेपणास्त्र डीआरडीओ अर्थात संशोधन, संरक्षण आणि विकास संस्थेने तयार केले असून हे शत्रूच्या मनात धडकी भरवणारे



आहे.जमिनीवरून जमिनीवर मारा करणाऱ्या या क्षेपणास्त्राची झलक यंदाच्या प्रजासत्ताक दिनानिमित्त कर्तव्यपथावर आयोजित संचलनात दिसणार आहे, अशी माहिती संरक्षण सचिव राकेश कुमार सिंह यांनी दिली. यंदाच्या संचलनात स्वदेशीवर भर देण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनाची सुरुवात हिंदुस्थानी वाद्यांच्या वादनाने होईल. यात तब्बल ३०० कलाकार सहभागी होणार असल्याचे राकेश कुमार सिंह यांनी सांगितले.

संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेने (डीआरडीओ) विकसित केलेले, हे क्षेपणास्त्र शेजारील चीन आणि पाकिस्तानच्या सीमेवर देशाच्या संरक्षण आवश्यकता पूर्ण करण्याचा प्रयत्न करते. हे ५००-१,००० किलोग्राम पेलोड क्षमता असलेले ३५०-५००किमी कमी पल्ल्याचे, पृष्ठभागावरून पृष्ठभागावर मारा करणारे क्षेपणास्त्र आहे. घन इंधन, युद्धभूमीवरील क्षेपणास्त्र पृथ्वी संरक्षण वाहनावर आधारित आहे. हे प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर (एलएसी) आणि नियंत्रण रेषेवर (एलओसी) तैनात करण्यासाठी विकसित केले गेले आहे.

## चॅम्पियन्स ट्रॉफीसाठीच्या जर्सीवर पाकिस्तानचं नाव छापण्यास भारताचा नकार

मुंबई , २१ जानेवारी : चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी टीम इंडियाने पाकिस्तानला जाण्यास नकार दिला होता. यानंतर रोहित शर्मा देखील कर्णधार म्हणून आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या उद्घाटन समारंभाला उपस्थित राहणार नाही. पाकिस्तान या आयसीसी स्पर्धेचे यजमानपद भूषवत आहे पण भारताचे सामने दुबईत होणार आहेत. त्यांनतर आता पुन्हा एकदा बीसीसीआयने मोठं पाऊल उचललं आहे. साधारणपणे सर्व संघांच्या जर्सीवर या स्पर्धेचे यजमान देशाचे नाव असते, मात्र भारताच्या जर्सीवर पाकिस्तानचे नाव नसणार आहे. असं बीसीसीआयने स्पष्ट केलं आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीचा उद्घाटन सोहळा आणि कॅप्टन्स डे १६ किंवा १७ फेब्रुवारीला होणार आहे. बीसीसीआयने चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी कर्णधार रोहित शर्माला पाकिस्तानमध्ये पाठवण्यासही नकार दिला होता.यावर पीसीबीच्या एका अधिकाऱ्याने बीसीसीआयवर क्रिकेटमध्ये राजकारण आणल्याचा आरोप केला आहे. अशातचं आता भारतीय संघाच्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठीच्या जर्सीवर पाकिस्तानचं नाव छापलं जाणार नसल्याचे बीसीसीआयने स्पष्ट केले आहे. पाकिस्तानकडे यंदा चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद असल्याने इतर देशांच्या खेळाडूंच्या जर्सीवर पाकिस्तानचं नाव असणार आहे.

## चोरीच्या तब्बल ६३ मोबाईलसह कार जप्त!

### सुटीवर असलेल्या पोलिसाच्या कर्तव्यदक्षपणामुळे मोबाईल चोरांच्या आंतरराज्यीय टोळीचा छडा

तभा वृत्तसेवा

अंबाजोगाई : साप्ताहिक सुटी असल्याने बीडहून अंबाजोगाईला आलेले पोलीस कर्मचारी तेजस वाहुळे यांना बस स्थानकात एका तरुणाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याच्यावर पाळत ठेवली. त्यानंतर कारमध्ये निघालेल्या त्या चोरट्याचा पाठलाग करून वाहुळे यांनी त्यास पकडले असता त्याच्याजवळ चोरीचे तब्बल ६३ मोबाईल आढळून आले. यावेळी त्या चोरट्याचे तिघे साथीदार मात्र पलायन करण्यात यशस्वी झाले. ही घटना मंगळवारी (दि.२१) दुपारी



अंबाजोगाई शहरात घडली.

तेजस वाहुळे सध्या बीड पोलीस मुख्यालय कर्तव्य बजावत आहेत. अधिक माहिती अशी की, साप्ताहिक सुटी असल्याने वाहुळे अंबाजोगाईत आले होते. दुपारी मुलाची शाळा सुटेपर्यंत वाट पाहत ते बस स्थानकात थांबले होते. यावेळी एका तरुणाच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने तो पाकीटमार किंवा मोबाईल चोर असून शकतो अशी खात्री झाल्याने वाहुळे यांनी त्याच्यावर पाळत ठेवली. थोड्यावेळात तो तरुण लगबगीने बस स्थानकच्या बाहेर पडला आणि रस्त्यावर थांबलेल्या एका कारमध्ये बसलेल्या तीन साथीदारांसह लगबगीने निघाला. वाहुळे यांनी तत्काळ एका ऑटोरिक्षातून त्या कारचा पाठलग सुरु केला. आपल्या पाळतीवर कोणी येत असल्याची अजिबात कल्पना नसलेल्या त्या चोरट्यांनी कार भगवानबाबा चौकातील पंपावर सीएनजी भरण्यासाठी थांबवली. यावेळी तिघेजण काह्नी उतरले तर एकजण कार जवळच थांबला. पाठलाग करत आलेल्या वाहुळे यांनी कारजवळ थांबलेल्या चोरट्यास पकडले आणि चौकशी सुरु केली. यावेळी त्याच्यासोबतचे तिघे पळून जाण्यात यशस्वी झाले. पोलीसी खाक्या दाखवताच त्या चोरट्याने तो स्वतः नागपूरचा असून सोबतचे तिघे साथीदार झारखंडचे असल्याचे सांगून आत्ता बस स्थानकातून एक मोबाईल चोरला असल्याचे कबूल केले. त्यानंतर वाहुळे यांनी कारची झडती घेतली असता आतमध्ये तब्बल ६३ मोबाईल आढळून आले. वाहुळे यांनी मोबाईल आणि कारसह त्या चोरट्याला शहर पोलिसांच्या स्वाधीन केले. या कामगिरीबद्दल तेजस वाहुळे यांचे कौतुक होत आहे.

सहा आयफोनचा समावेश

दरम्यान, जप्त केलेल्या ६३ मोबाईलमध्ये सहा आयफोनचा समावेश आहे. हे मोबाईल ट्रेस होऊ नयेत म्हणून चोरट्यांनी त्याला चांदीच्या आवरणात गुंडाळले होते. अंबाजोगाई शहर पोलीस पुढील तपास करत आहेत.

## रायगडमध्ये वाढला बर्ड फ्ल्यूचा धोका!

अलिबाग : रायगडमध्ये घरगुती कोंबड्यांना बर्ड फ्लूची लागण झाली असून जिल्ह्यात आतापर्यत १ हजार कोंबड्यांची विल्हेवाट लावण्यात आली आहे. यामुळे जिल्हा प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे.

रायगड जिल्ह्यात बर्ड फ्लूचा शिरकाव झाल्याचे अहवालातुन समोर आले आहे. उरण तालुक्यातील चिरनेर गावात घरगुती कोंबड्यांना हि लागण झाली असून तसा अहवाल भोपाळच्या पशुरोग प्रयोग शाळेने दिला आहे. त्यामुळे आता जिल्हा प्रशासन सतर्क झाले असून सतर्कता म्हणून उपाय योजना करण्यास सुरुवात केली आहे. खबरदारी म्हणून गावातील १ हजाराहून अधिक कोंबड्या तसेच अंड्यांची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट देखील लावण्यात आली आहे.

तसेच परिसरातील चिकनची दुकान ९ फेब्रुवारीपर्यंत बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले आहेत. पशुसंवर्धन, आरोग्य, महसूल, ग्रामविकास, पोलीस, वनविभाग, परिवहन इत्यादी विभागांच्या समन्वयाने बाधित क्षेत्रात कृती आराखड्याप्रमाणे कारवाई करण्यात येत आहे. सदर रोगस्थिती नियंत्रणात असून कुक्कुट व्यवसायिक व नागरिकांनी घाबरून न जाता सतर्कता बाळगण्याबाबत पशुसंवर्धन विभाग व जिल्हा प्रशासनाकडून आवाहन करण्यात आले आहे.

दहा किमी परिसरात अलर्ट झोन

बर्ड फ्लूचा पुन्हा एकदा शिरकाव झाला आहे. यामुळे धोका वाढला असून अनेक ठिकाणी कोंबड्यांना लागण झाल्याचे पाहण्यास मिळत आहे. तर बाधित क्षेत्रात नागरिकांच्या हालचाली पक्षी प्राण्यांच्या वाहतुकीला प्रतिबंध करण्यात आला आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी येथील बाधित क्षेत्रापासून एक किलोमीटरपर्यंतचा परिसर बाधित क्षेत्र व एक ते दहा किलोमीटर पर्यंतचा परिसर सर्वेक्षण क्षेत्र म्हणून घोषित केला आहे. बाधित क्षेत्रात कुक्कुट पक्षांचे सर्वेक्षण आणि वैद्यकीय नमुने संकलित केले जाणार आहेत. नागरिकांनी कसलीही भीती बाळगू नये असे आवाहन करण्यात येते आहे.

## तुर्कीच्या स्की रेसॉर्टमध्ये लागली आग, ६६ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली: तुर्कीच्या बोलू पहाडो येथू ग्रँड कार्टल हॉटेलमध्ये मंगळवारी लागलेल्या भीषण आगीत ६६ जणांचा मृत्यू झाला तर ५०हून अधिक जण जखमी झाले. सोबतच आगीने घाबरलेल्या पाहुण्यांनी जीव वाचवण्यासाठी हॉटेलच्या खिडकीतून उड्या मारल्या. ही घटना उत्तर-पश्चिम तुर्की स्थित एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ कार्टालकाया स्की रिसॉर्टमध्ये घडली. आगीची घटना घडली तेव्हा हॉटेलमध्ये २३४ पाहुणे होते.

वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार तुर्कीच्या बोलू पहाडोमध्ये ग्रँड कार्टल हॉटेलात मंगळवारी भीषण आग लागल्याने ६६ जणांचा मृत्यू झाला. ही घटना उत्तर पश्चिम तुर्कीमधील लोकप्रिय कार्तलकाया स्की रिसॉर्टमध्ये घडली. यावेळेस तेथे २३४ पाहुणे थांबले होते.

सकाळी साडेतीन वाजण्याच्या सुमारास लागली आग

१२व्या मजल्यावर हॉटेलच्या रेस्टॉरंटमध्ये सकाळी साडेतीन वाजण्याच्या सुमारास आग लागली. ही आग वेगाने बिल्डिंगमध्ये पसरली. हॉटेलमध्ये सगळीकडे धूरच धूर झाल्याने एकच गोंधळ उडाला.

दुर्घटनेत ५१ जण जखमी

आरोग्य मंत्री केमल मेमिसोग्लू यांनी या दुर्घटनेत ५१ जण जखमी झाल्याच्या बातमीला दुजोरा दिला आहे. यात एका व्यक्तीची स्थिती गंभीर आहे. दरम्यान, या घटनेप्रकरणी मंत्र्यांनी शोक व्यक्त केला आहे.

उडी मारल्याने दोन जणांचा मृत्यू

बोलूचे गर्व्हनर अब्दुल अजीज अदीन यांच्यानुसार, या दुर्घटनेत दोन जणांनी घाबरून बिल्डिंगमधून उडी मारल्याने मृत्यू झाला. काही जणांनी घाबरून हॉटेलमधून उड्या मारल्या.

## जय लक्ष्मी कंपनीच्या दूषित पाण्यामुळे फळबाग नष्ट

### शेतकऱ्याचा नुकसानभरपाई न मिळाल्यास आत्मदहनाचा इशारा

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २१ जानेवारी : पैठण तालुक्यातील फारोळा येथील गट नंबर ७४,७५,८४,८५ मधे मे जय लक्ष्मी स्पेशल स्टील कास्टीग अँड अलाय कंपनी असून या कंपनीच्या वेस्टेज केमिकलयुक्त राखेमुळे व केमिकल युक्त पाणी गट नंबर ८३,८४ मधे सोडले जाते. याच गटामध्ये शेतकरी शिवाजी शंकरराव धरपळे यांची २ हेक्टर शेती असून या शेतजमिनी मोसंबी फळबाग असून यामधे १७ वर्षाची ३२६ झाडे असून त्यापैकी २०० झाडे केमिकल्युक्त दूषित पाण्यामुळे व वितळलेले लोखंडी राखेमुळे शेतातील फळबाग सुकून गेल्याने शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून यामुळे शेतातील पिकांना व फळबागेला सुध्दा याचा फार



मोठा धोका निर्माण झालेला आहे. सदर शेतकऱ्याने अनेक वेळा उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हा कृषी अधिकारी, तहसिलदार पैठण यांच्याकडे लेखी तक्रार दिलेली आहे.गट नंबर ८५ मधे वाढीव प्लांटचेबेकायदेशीर सूरु असलेले काम बंद करण्याची मागणी शेतकऱ्याने केली आहे. प्रदूषण विभाग व तालुका कृषी अधिकारी, पाणी टेस्टिंग रिपोर्ट पुणे यांचा अहवाल, तसेच अनेक ठिकाणी वेगवेगळया संबंधीत विभागात केलेली तक्रार शिवाजी धरपळे यांनी केलेली आहे पंचनामा करून जयलक्ष्मी कंपनीच्या दुषित पाण्यामुळे व वेस्टेज राखेमुळेच शेतीचे नुकसान होत असल्याचे पंचनाम्यात लेखी स्वरूपात स्पष्ट केले आहे. शिवाजी धरपळे या शेतकऱ्याने आमच्या शेतीच्या आसपासचे क्षेत्र जय लक्ष्मी कंपनी व इतर कंपन्यांना वाढीव करून देउ नये त्यामुळे आमच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान होऊन शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ येऊ लागल्याने यातून अनेक शेतकरी नापिकीमुळे आत्महत्या करताना महाराष्ट्रात दररोज दिसून येत आहे.

> **माझे मोसंबी फळबागांचे आतोनात नुकसान झाले असून केमिकलयुक्त दूषित पाण्यामुळे माझ्या उदरनिर्वाहाचे साधन शेती नष्ट होत असून जयलक्ष्मी कंपनीच्या वाढीव प्लांटच्या परवानगी रद्द करण्यात याव्या नसता उपप्रादेशिक अधिकारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ छत्रपती संभाजीनगर येथे आत्मदहन करण्याचा लेखी अर्ज दिलेला आहे.**
>
> **शिवाजी शंकरराव धरपळे**
> **शेतकरी फारोळा**

## आतापर्यंत १६ नक्षलवाद्यांचे मृतदेह आढळले

रायपूर, २१ जानेवारी : छत्तीसगडच्या गरियाबंदमध्ये सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत आतापर्यंत १६ नक्षलवादी ठार झाले आहेत. ही चकमक अजूनही सुरू असून आहे. सर्व मारल्या गेलेल्या १६ नक्षलवाद्यांचे मृतदेह आणि शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. यासंदर्भातील अधिकृत माहितीनुसार गरियाबंद जिल्ह्यातील कुल्हाडी घाटावर असलेल्या भालू डिग्गी जंगलात सुरक्षादलाच्या सुमारे एक हजार जवानांनी नक्षलवाद्यांना चारही बाजूंनी घेरले आहे. याठिकाणी रविवार सकाळपासून अधूनमधून गोळीबार सुरू आहे. मैनपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरू असलेल्या या चकमकीत सीआरपीएफच्या कोब्रा युनिटचा एक जवानही जखमी झाला आहे. त्याला विमानाने रायपूरला नेण्यात येत आहे. यापूर्वी रविवारी झालेल्या चकमकीत २ नक्षलवादी ठार झाले होते आणि एक सैनिकही जखमी झाला होता. गरियाबंद येथे सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत नक्षलवादी जयराम उर्फ चालपती ठार झाला आहे. तो नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीचा सदस्य होता आणि त्याच्यावर १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. आतापर्यंत १६ नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. ठार झालेल्या नक्षलवाद्यांमध्ये वरिष्ठ माओवादी कार्यकर्त्यांचा समावेश आहे, ज्यांची ओळख पटवली जात आहे. चकमकीत एसएलआर रायफलससारखी स्वयंचलित शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. नक्षलविरोधी शोध मोहिमेत, गरियाबंद ऑपरेशन ग्रुप ई-३०, कोब्रा २०७, सीआरपीएफ ६५ आणि २११ बटालियन, एसओजी-नुआपाडा यांचे संयुक्त पथक मोहिम राबवत आहे.

## नवीन फर्स्ट ईएएन रुपे क्रेडिट कार्ड लॉन्च

मुंबई: आयडीएफसी फर्स्ट बँक, भारतातील जागतिक कार्ड पेमेंट नेटवर्क रुपे यांच्या भागीदारीत,यूपीआय सक्षम रुपे क्रेडिट कार्ड – फर्स्ट ईएएन लॉन्च करण्याची अभिमानाने घोषणा केली आहे. हे क्रेडिट कार्ड फिक्स्ड डिपॉझिटद्वारे समर्थित आहे आणि म्हणूनच प्रत्येकजण ऑनलाइन या युनिक क्रेडिट कार्डचा त्वरित वापर करण्यास पात्र आहे. ते यूपीआय पेमेंटवर कॅशबॅक देखील देते, ज्यामुळे वापरकर्त्यांसाठी उत्पादन फायदेशीर ठरते.त्याची खासियत अशी आहे की सर्व ग्राहकांसाठी क्रेडिट कार्ड अर्जामध्ये मुदत ठेव निर्मिती अखंडपणे एकत्रित केली जाते. अशाप्रकारे, ग्राहकांना यूपीआयवर क्रेडिट मिळविण्याची, बक्षिसे मिळविण्याची तसेच मुदत ठेवींवर आकर्षक व्याजदर मिळविण्याची अतुलनीय संधी देते. त्याच्या समावेशक दृष्टिकोनाव्यतिरिक्त, कार्डचे यूपीआयसोबत अखंड एकत्रीकरण अनेक शक्यता उघडते, ज्यामुळे भारतातील ६० दशलक्षाहून अधिक यूपीआय-सक्षम व्यापाऱ्यांना सार्वत्रिक प्रवेश मिळतो. प्रत्येक यूपीआय खर्चावर, ग्राहकांना १% पर्यंत कॅशबॅक मिळतो, ज्यामुळे प्रत्येक व्यवहार फायदेशीर होतो.

## केनव्यूने त्यांच्या रिहायड्रेशन पोर्टफोलिओचा विस्तार केला

मुंबई – २०२५: केनव्यूने त्यांच्या रेडी-टू-ड्रिंक रिहायड्रेशन पोर्टफोलिओचा विस्तार करत ओआरएस लॉन्च केला आहे, जो डायरियामुळे होणाऱ्या डिहायड्रेशनसाठी डब्ल्यूएचओ मान्य फॉर्म्युला आहे. या लॉन्चसह, केनव्यू आता डायरियल आणि नॉन-डायरियल डिहायड्रेशन दोन्हीचे निराकरण करणारा एक सर्वसमावेशक हायड्रेशन पोर्टफोलिओ प्रदान करते. नॉन-डायरियल डिहायड्रेशनसाठी यापूर्वीच उपाय प्रदान करणाऱ्या केनव्यूच्या हायड्रेशन केअरमध्ये हे नवीन लॉन्च आणखी एक मजबूती जोडते. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते दरवर्षी १.७ अब्ज बालके अतिसाराच्या आजाराचे बळी ठरतात. हे जागतिक आरोग्यासमोरचे सर्वांत मोठे आव्हान आहे.भारतात,अतिसार विशेषतः ५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये मृत्यूचे तिसरे प्रमुख कारण आहे. जागतिक आरोग्य संघटनेने शिफारस केलेले ओरल रीहायड्रेशन सॉल्ट हे अतिसाराच्या उपचारांमध्ये सुवर्ण मानक आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण-५च्या २०१९-२१ च्या अहवालानुसार ५ वर्षांपेक्षा कमी वयाच्या मुलांमध्ये ओआरएसचा वापर अजूनही कमी आहे .

## साजरा करा प्रजासत्ताक दिन, दि ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाईमच्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरसह

मुंबई : दि ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाईम सह एका उत्कट आणि रोमांचक अनुभवासाठी सज्ज व्हा, जिथे अॅक्शन, नाट्य आणि शक्तिशाली क्षण खऱ्या 'सिनेमा' शैलीत एकत्र येतात. या प्रजासत्ताक दिनी झी सिनेमा तुमच्यासाठी रविवारी, २६ जानेवारी रोजी दुपारी १२ आणि रात्री ८ वाजता 'दि ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाईम' चा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर घेऊन येत असल्याने एका दमदार सिनेमाच्या अनुभवासाठी सज्ज व्हा. त्यामुळे तुमचा प्रजासत्ताक दिन खास बनेल. पॉवरहाऊस परफॉर्मर थलपथी विजय आणि अष्टपैलू अभिनेता प्रभू देवा अभिनीत, हा हाय-एनर्जी एंटरटेनर रोमहर्षक नाट्यमय वळणे आणि अविस्मरणीय दृश्यांसह देशाला वाचवण्याच्या मिशनवर आहे! शत्रुत्व आणि महानतेची कथा असलेल्या या चित्रपटामध्ये कौटुंबिक भावना, देशभक्ती, अॅक्शन, भावना, विनोद आणि अर्थातच विजयच्या ट्रेडमार्क आकर्षणाचा उत्कृष्ट मिलाफ आहे! अनपेक्षित वळणांनी भरलेला आणि दिग्दर्शक वेंकट प्रभू यांच्या सिग्नेचर शैली असलेल्या या चित्रपटात एका अल्टिमेट हिरोच्या रुपात आपण विजयला पॉवर हाऊस परफॉर्मन्स देताना पाहतो आणि प्रभू देवा अर्थातच त्याच्या सिग्नेचर स्टाईलमध्ये प्रत्येक दृश्याला संस्मरणीय बनवतो. हा चित्रपट केवळ एक कथा नाही तर हा एक अनुभव आहे. आणि जेव्हा देशासमोरील कुठल्याही आव्हानांची गोष्ट येते तेव्हा दि ग्रेटेस्ट ऑफ ऑल टाईम कायमच सज्ज असतो.

## सोनी सबवरील 'तेनाली रामा'मध्ये तेनाली अखेर कृष्णदेवराय राजासमोर आला

सोनी सबवरील 'तेनाली रामा' मालिकेत महान दरबारी कवी आणि चतुर, बुद्धिमान तेनाली रामा (कृष्ण भारद्वाज)च्या कथा सादर करण्यात येत आहेत. सध्या सुरू असलेल्या कथानकात तेनाली लपतछपत विजयनगरात परतला आहे. आपल्या राज्याला शत्रूपासून मोठा धोका असल्याची कुणकुण त्याला लागली आहे. या साम्राज्याचे रक्षण करण्यासाठी त्याचे बुद्धीचातुर्य पणाला लागणार आहे. आगामी भागांमध्ये, तेनाली हुबेहूब तथाचार्यांसारख्या दिसणाऱ्या वेंकण्णा (पंकज बेरी)ला अक्कल-हुशारीने हाताशी धरतो आणि त्याच्या योजनेनुसार वेकण्णा त्याला आपल्या पाठीवर घेऊन निघतो. हे आगळेवेगळे दृश्य राजा कृष्णदेवरायाचे (आदित्य रेडिज) लक्ष वेधून घेते. परिस्थितीचा चुकीचा अर्थ काढत तो आपल्या सैनिकांना तथाचार्यांच्या खांद्यावर बसलेल्या इसमाला पकडून आणायला सांगतो. शिक्षेच्या भीतीने बावचळून वेंकण्णा तेनालीने दिलेली चिठ्ठी राजाला देतो.

## सा रे ग म प ची विजेती म्हणून श्रद्धा मिश्राने जिंकला हा प्रतिष्ठित चषक!

पाच महिने अथक रियाज आणि सचिन-जिगर, सचेत-परंपरा आणि गुरु रंधावा आशा तज्ञ मेंटॉर्सच्या मार्गदर्शनाखाली मंत्रमुग्ध करणारे एक से एक परफॉर्मन्सेसच्या माध्यमातून आपल्या सूर तालाला अचूक बनवल्यानंतर झी टीव्हीवरील 'सा रे ग म प' मधील अंतिम स्पर्धक या शोच्या ग्रँड फिनालेमध्ये एकदा शेवटचे संगीत महायुद्धाला सामोरे गेले. अतिशय कडव्या अशा या स्पर्धेमध्ये मुंबईची श्रद्धा मिश्रा या पर्वाची विजेती ठरली आहे.

# महिलांच्या सबलीकरणाचे माध्यम भारतीय संविधान : न्यायाधीश व्हि. एन. काटकर

तभा वृत्तसेवा

कन्नड :- दि.२१ जानेवारी – राज्यघटना भारतीयांचा राष्ट्रीय ग्रंथ आहे हाच सर्वांच्या उत्कर्षाचा केंद्रबिंदू आहे विशेषतः जागतिक स्तरावर स्त्री- पुरुष यांच्यात अधिकाराच्या बाबतीत असमानता असताना भारतीय राज्यघटनेने समानतेच्या तत्त्वाचा स्वीकार करून विषमतेच्या तत्वाला छेद दिला त्यामुळे राज्यघटना ही महिलांच्या सबलीकरणाचे माध्यम आहे म्हणून तिची जोपासना करणे आपल्या सर्वांचे आद्य कर्तव्य आहे असे मत न्यायाधीश व्ही. एन. काटकर यांनी तालुका विधी सेवा समिती तथा दिवाणी न्यायालय कनिष्ठ कन्नड आणि शिवाजी महाविद्यालय कन्नड यांच्या वतीने दि.२१ रोजी आयोजित केलेल्या कायदेविषयक जागृती शिबिरात प्रतिपादन केले.



विद्यार्थ्यांनी आनंदी राहण्यासाठी संगीतातील सात सुरांचा आनंद घेतला पाहिजे तर अपघातापासून सुरक्षित राहण्यासाठी रस्ता सुरक्षितचे नऊ नियम काटेकोरपणे पालन केले पाहिजे तरच अपघातापासून आपला बचाव होऊ शकतो अशी भूमिका यावेळी पोलीस उपनिरीक्षक केसरिया जारवाल यांनी व्यक्त केली.

लोकशाही आणि संविधान यांची कनिष्ठ नाते आहे संविधानिक मूल्यांच्या जोपासण्यातून भारतीय लोकशाही अधिक सक्षम केली पाहिजे. ही जबाबदारी युवकांची आहे त्यामुळे विद्यार्थी अवस्थेतूनच पासून संविधान योग्य रीतीने समजून घेतले पाहिजे व तिचा प्रचार आणि प्रसार केला पाहिजे असे आवाहन याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्राचार्य डॉ. व्ही. भोसले यांनी केले. या निमित्ताने लोकप्रशासन विभागाच्या वतीने भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवाचे औचित्य साधून संविधानाचे अमृतमंथन या अनुषंगाने संविधान भान या लोकसत्ता वृत्तपत्रातील डॉ. श्रीरंजन आवटे यांच्या लेख सदराचे प्रदर्शन व लेख संकलनाचे प्रकाशन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. राहुल शिरसागर, डॉ. विजय मातकर, डॉ. बी.के.मगरे, डॉ.शिवाजी हुसे, मा.अरविंद कांबळे, डॉ. प्रकाश महाजन, अॅड. प्रदीप जाधव, डॉ. जगदीश बेलोंडे, डॉ. अतिश मेहत्रे, मा.संजय जाधव,मेहत्रे, तसेच पत्रकार सहयोग जावळे, विठ्ठल सिरसे व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता पवन जाधव, ऋषीकेश सूरेवाड या विद्यार्थ्यांने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अॅड. उमेश वारे यांनी केले तर आभार प्रा डॉ. संजय भालेराव यांना मानले.

# स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले ३६१ वी पुण्यतिथी सोहळा

## समाधीस्थळी कर्नाटक राज्यात २३ जानेवारीला होणार संपन्न

खुलताबाद : संतोष करपे .पराक्रम,युध्दप्रसंगाची बुध्दिमत्ता,उत्तम प्रशासन, स्वतंत्र राज्यकारभार या गुणांचे शिवरायांमध्ये बीजारोपण करणारे, अनंत संकटावर मात करत छत्रपती शिवाजी महाराजांना घडविणारे स्वराज्य संकल्पक, महाबली, महापराक्रमी शहाजीराजे भोसले यांची ३१ जानेवारी रोजी ३६१ वी पुण्यतिथी आहे. यानिमित्त समाधीस्थळ, होदेगेरी, कर्नाटक राज्य येथे पुण्यतिथी अभिवादन सोहळा संपन्न होणार असल्याने,त्याचे संपूर्ण महाराष्ट्रातील शिवभक्तांना निमंत्रण श्री. शहाजीराजे भोसले स्मारक समिती कर्नाटक राज्य अध्यक्ष मल्लेशी शिंदे व स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजेंद्र पवार यांच्या वतीने देण्यात येत आहे.

२३ जानेवारी रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत अभिवादन, तदनंतर देशभरातून आलेल्या मान्यवरांचे स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांच्या कार्यकर्तुत्वावर आधारित मनोगत आणि आयोजकाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार अशा पद्धतीने अभिवादन सोहळ्याची रूपरेषा असणार आहे. देशभरातून आलेल्या शिवभक्तांना यावेळी जेवण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची कर्मभूमी कर्नाटक राज्य असले तरीही महाराष्ट्र जन्मभूमी आहे. महाबली शहाजीराजे भोसले यांचा मालोजीराजे भोसले व उमाबाईसाहेब या मराठी सुपुत्रांच्या पोटी जन्म झाला आहे. अमाप शक्ती आणि युक्तीचे धनी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांनी आपल्या युद्ध आणि राजकीय कौशल्याच्या जोरावर प्रचंड मोठा इतिहास घडविला असल्याने संपूर्ण महाराष्ट्रासाठी ही अभिमानास्पद बाब असल्याने महाराष्ट्र राज्याच्या वतीने शहाजीराजांना अभिवादन करण्यात येणार आहे. समाधीस्थळ होदेगेरी कर्नाटक येथे शहाजीराजांच्या चरणी नतमस्तक होणार असल्याची, माहिती राजेंद्र पवार यांनी दिली आहे.

शहाजी महाराजांची जन्मभूमी श्रीक्षेत्र वेरूळ संभाजीनगर येथून ८५०तर पुणेमार्गे ५५० किलोमीटर स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांचे होदेगेरी कर्नाटक येथील समाधीस्थळ आहे. संभाजीनगर येथून त्यांच्या समाधी स्थळाकडे जाण्यासाठी धुळे – सोलापूर महामार्गाद्वारे संभाजीनगर, श्रीक्षेत्र कचनेर, येरमाळा, धाराशिव, श्री क्षेत्र तुळजापूर मार्गे सोलापूर जातो, सोलापूर वरून चित्रदुर्ग हायवे मार्गाने शहाजीराजे भोसले यांचे समाधी स्थळ गाव होदेगेरी, जिल्हा दावणगिरी कर्नाटक राज्यात आपल्याला जाता येते. राज्यातील शिवभक्तांच्या दृष्टीने सदरील मार्ग योग्य राहिल,अशी सूचना राजेंद्र पवार यांनी केली आहे.

महाराष्ट्रातील शिवभक्तांनी स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले यांची होदेगेरी कर्नाटक येथील समाधी स्थळावर अभिवादन करण्यासाठी जास्तीत जास्त संख्येने यावे,असे आवाहन श्री. शहाजी राजे स्मारक समिती कर्नाटक राज्य व स्वराज्य संकल्पक शहाजीराजे भोसले प्रतिष्ठान अध्यक्ष राजेंद्र पवार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# तब्बल ३८ वर्षांनंतर झाला वर्ग मित्रांचा स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ जानेवारी

सोयगाव येथील जिल्हा परिषद प्रशाला माजी वर्ग मित्र स.न.१९८७ पर्यंतची बॅच यांचे स्नेहसंमलन ३८ वर्षा नंतर जिल्हा परिषद शाळा सोयगाव येथे १० वी बॅच सोबतचे वर्ग मित्र ३८ वर्षा नंतर मित्र व मैत्रिणी एकत्र येऊन स्नेहसंमेलना कार्यक्रम दि.१९ रविवार रोजी जिल्हा प्रशाला सोयगाव येथे सकाळी १० वाजता सर्व मित्र एकत्र जमून ज्या वर्गात १० वी चे शिक्षण पूर्ण झाले त्या क्लास रूम मध्ये सर्व वर्ग मित्र मैत्रिणी बेंचवर बसून ३८ वर्षानंतर आमचे सर्वांचे गुरुजी लक्ष्मण रोकडे,वंसत वणी,डी. सी.पाटील,पी.के शेळके यांनी आमचा शिक्षणाचा क्लास घेतला आपण याच क्लास रूम मध्ये शिक्षण घेतले आहे.असे सर्व जणांचे डोळे भरून आले एकमेकांनी गळ्यात पडून मनाचे



समाधान केले.त्या नंतर सर्व मित्र श्री महामुनी अगस्ती महाराज वारकरी शिक्षण संस्था आमखेडा-सोयगाव येथे येऊन एकत्र जमून कार्यक्रमाचे अध्यक्ष गुरुजी लक्ष्मण रोकडे,वंसत वाणी,पी. के.शेळके,डी.सी.पाटील,एकनाथ महाजन सखोल असे मार्गदर्शन दिले,सूत्र संचालन संजय बावसकर यांनी केले व एकमेकांचे परिचय घेऊन मनोगत व्यक्त केले. त्यानंतर सर्वांन सन्मानपत्र देऊन सन्मानित केले,आभार हरिदास कटोले यांनी केले जवळ पास ४० मुले व २५ मुली सर्वांनी एकत्र बसून भोजनाच आनंद घेतला जवळपास ५ वाजे पर्यंत आमचा गेट टू गेदरचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.तर कोणी गुजरात,पंजाब, पुणे,मुबई, छत्रपती संभाजीनगर,जळगाव हून कार्यक्रमाला होते.आमचा कार्यक्रम पाहता पाहता आम्हाला वेळ कमी पडली होती,सर्व जणांना बोलण्याची संधी दिली आमचे गुरू शिक्षक यांनी ही त्यांचे मनोगत व्यक्त केले आपचे वर्ग मित्र भगवान वाघ,संजय बावस्कर,अनिल चौधरी,यांनी कार्यक्रमाचे नियोजन रचना करून व भाऊसाहेब पाटील,सरला महानोर,हरिदास काटोले यांनी जुन्या अठवनिंना उजाळा दिला.गोपाल राजपूत,रामदास राजपूत,निकेश बिर्ला,राजू काळे,मनीषा सोनवणे,संगीता सोनार,उषा राठोड,माधुरी दुसाने,हरिदास काटोले,सुधाकर सोहनी,भाऊसाहेब पाटील,संजय वामने,अनिल चौधरी अर्जुन पाटील,निवृत्ती पाटील,नरेश कंधारी राजू एलीस,शिवदास राजपूत,आलेले सर्व मित्र मैत्रीण यांनी कार्यक्रमाला सहकार्य केले. बाहेर गावाहून आलेले आमचे मित्र यांच्या येण्या मुळे कार्यक्रमाची शोभा वाढली व कार्यक्रम अतिशय सुंदर पार पडला असे रामदास राजपूत यांनी दैनिक तरुण भारतच्या बोलताना सांगितले.

## टि.सी. हरवली

**फर्दापूर दि २१ मानसी एकनाथ जाधव हिची टि सी फर्दापूर ते जामठी प्रवासा दरम्यान दि १७.११.२०२४ या दिवशी बस मधून हरवली तरी सापडल्यास संपर्क साधावा**

## जाहीर प्रगटन

पु.ता. ०३/०३/२०२५

**मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (गेव्ही. डी. पाटील साहेब) क.स्तर यांचे कोर्टात**

दि. किरकोळ अर्ज क. ४०/२०२५

अर्जदार : १. श्रीमती. सकुबाई भ्र. कडुबा घुले वय-६५ धंदा- घरकाम रा. वडोद ता. कन्नड जि. २- औरंगाबाद २. मंदा भ्र.संजय गुरमे वय-४३ धंदा- शेती रा.-खेडी (दि.) ता. कन्नड जि. ३- औरंगाबाद ३. अर्चना भ्र. शिवाजी सोमासे वय ३९ धंदा शेती रा. नागापुर ता. ४- कन्नड जि. औरंगाबाद ४. श्री. विठ्ठल पि.कडुबा घुले वय-३२ धंदा- शेती रा. वडोद ता. कन्नड जि. औरंगाबाद ५. उषा भ्र.भानुदास चव्हाण वय-२९ धंदा-घरकाम रा- दिगांव ता. कन्नड जि.औरगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन अॅक्ट १८२७चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी या मा. न्यायालयात अॅड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ ते ५ यांचे वडील मयत नामे कडुबा पि. रामराव घुले यांचा मृत्यु दि. ११/१२/२०२४ रोजी मौजे वडोद ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून मयतास केवळ अर्जदार क. १ ते ५ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही... मयत कडुबा पि. रामराव घुले यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच इतर शासकीय निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार हे मयत कडुबा पि. रामराव घुले यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्ग्रहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. २०/०१/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे

आदेशावरून

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय कन्नड)

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-९३७

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक ३०/१२/२०२४

अर्जदार : सुभद्रा भाऊसाहेब भडगे रा जवखेडा खु ता कन्नड जि छ संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार : ग्राम पंचायत कार्यालय जवखेडा खु ता कन्नड ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी स्वतः विधिज्ञ अॅड.एस पी भडगे यांचेमार्फत अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगा मयूर भाऊसाहेब भडगेच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगा मयूर भाऊसाहेब भडगेचा जन्म दिनांक १९-०४-२००९ रोजी जवखेडा खु ता कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगा मयूर भाऊसाहेब भडगेचा जन्म दिनांक १९-०४-२००९ रोजी जवखेडा खु ता कन्नड ता. कन्नड / ता. खुलताबाद येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगा मयूर भाऊसाहेब भडगेचा जन्म दिनांक १९-०४-२००९ रोजी जवखेडा खु ता कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०४-०२-२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक १९-०४-२००९ रोजी जवखेडा खु ता कन्नड येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीत नंतर आलेला उजर/आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही.

करिता दिनांक ....../१२/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड करिता

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. ०४/२०२५

अर्जदार : १) रामदास भागाजी नागरे, वय- ५९ वर्षे, धंदा- शेती, रा. वासडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद २- खंडु भागाजो नागरे, वय ७८ वर्षे, धंदा- शेती. रा. वासडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३- सुबाबाई त्रिंबक घुगे, वय ७० वर्षे, धंदा- घरकाम, रा. साखरवेल ता. कन्नड, जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तफे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

ज्याअथों अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु.ए. वारे यांच्या मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असून अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ- बहीन आहे. अर्जदार क. १ ते ३ यांचे वडील नामे भागाजी गंगाराम नागरे हे होते ते दिनांक १६/०७/२००४ रोजी मोजे वासडो येथे मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या आई म्हणजेच मयत भागाजी गंगाराम नागरे यांच्या पत्नी नामे वेणुबाई भागाजी नागरे या देखील दिनांक ०६/१०/२०२४ रोजी मयत झालेल्या आहे. दोन्ही मयतांचा अंत्यविधी वासडी येथेच झालेला. सोबत मृत्यु प्रमाणपत्र देत आहे.

अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, वरोल नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवून येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, अर्जदार क्र. १ ते ३ हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक ०८/०१/२०२५

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

## जाहीर प्रगटन

प्रकरण : गाळा हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सर्व्हे नं. ७७ नवा मोंढा, हिंगोली यांना कळविण्यात येते की, श्री. गणेश सत्यनारायण सोमाणी, रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली च्या हद्दीतील मोहल्ला नवा मोंढा येथील सर्व्हे नं. ७७, सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे तळमजल्या वरील गाळा क्र. १८ एस.बि.आय. बँक शेजारी ज्याची लांबी उत्तर-दक्षिण १५ फुट म्हणजेच ४.५७ मीटर व रुंदी : पुर्व-पश्चिम १० फुट म्हणजेच ३.०४ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ १५०.०० चौरसफुट म्हणजेच १३.८९ चौरसमीटर ज्याची चतुःसिमा पुर्वेस गाळा क्रं १७, पश्चिमेस : रस्ता व पाय-याची जागा, दक्षिणेस गाळा क्रं ०१, उत्तरेस कॉम्प्लेक्स मधील मोकळी जागा वरील चर्तु-सिमेच्या आतील गाळा क्र. १८ हा श्री. गणेश सत्यनारायण सोमाणी रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून राहीलेल्या उर्वरीत (०१/०१/२०३८) पर्यंतच्या कालावधी करीता नोंदणीकृत भाडेपट्टा लेख दि. २७/०८/२०११ अन्वये भाडयाने घेतला होता त्यांना सदरील गाळयाची आवश्यकता नसल्यामुळे सदरील गाळा ते श्री शंकर लक्ष्मीनारायण अग्रवाल, रा. हिंगोली यांना राहीलेल्या उर्वरीत (०१/०१/२०३८) पर्यंतच्या कालावधी करीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत श्री. शंकर लक्ष्मीनारायण अग्रवाल, रा. हिंगोली यांची कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली च्या रेकॉर्डला उपरोक्त भाडेकरु म्हणून हस्तांतरणाची नोंद करुन घेण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे.

सदरील हस्तांतरणाबाबत कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने हस्तांतरण नियमाप्रमाणे करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सचिव — सभापती

## कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

## जाहीर प्रगटन

प्रकरण : गाळा हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सर्व्हे नं. ७७ नवा मोंढा, हिंगोली यांना कळविण्यात येते की, सौ. विद्या केशव पतंगे, रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली च्या हद्दीतील मोहल्ला नवा मोंढा येथील सर्व्हे नं. ७७, सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे तळमजल्या वरील गाळा क्रं.०८ ज्याची लांबी : पुर्व-पश्चिम २५ फुट म्हणजेच ७.६२ मीटर व रुंदी उत्तर-दक्षिण १२ फुट म्हणजेच ३.६५ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३००.०० चौरसफुट म्हणजेच २७.८१ चौरसमीटर ज्याची चतुः सिमा पुर्वेस : बाजार समितीची मोकळी जागा, पश्चिमेस बाजार समितीची मोकळी जागा, दक्षिणेस : गाळा क्रं ०९, उत्तरेस गाळा क्रं ०७ वरील चर्तु-सिमेच्या आतील गाळा क्रं. ०८ हा सौ. विद्या केशव पतंगे रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून राहीलेल्या उर्वरीत (०१/१२/२०३३) पर्यंतच्या कालावधी करीता नोंदणीकृत भाडेपट्टा लेख दि. १९/०६/२०१४ अन्वये भाडयाने घेतला होता त्यांना सदरील गाळयाची आवश्यकता नसल्यामुळे सदरील गाळा ते श्री. उत्कर्ष बाळासाहेब आरळकर, रा. हिंगोली यांना राहीलेल्या उर्वरीत (०१/१२/२०३३) पर्यंतच्या कालावधी करीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत श्री उत्कर्ष बाळासाहेब आरळकर, रा. हिंगोली यांची कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली च्या रेकॉर्डला उपरोक्त भाडेकरु म्हणून हस्तांतरणाची नोंद करुन घेण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे.

सदरील हस्तांतरणाबाबत कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने हस्तांतरण नियमाप्रमाणे करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सचिव — सभापती

कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

## कृषि उत्पन्न बाजार समिती, हिंगोली

## जाहीर प्रगटन

प्रकरण : गाळा हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनता रहिवाशी मोहल्ला सव्र्हे नं. ७७ नवा मोंढा, हिंगोली यांना कळविण्यात येते की, श्री. गोपाल सत्यनारायण सोमाणी, रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी नगर परिषद हिंगोली च्या हद्दीतील मोहल्ला नवा मोंढा येथील सर्व्हे नं. ७७, सिट नं ९८ सिटी सर्व्हे नं ४०६१ मध्ये असलेल्या व मंजूर लेआऊट नकाशाप्रमाणे तळमजल्या वरील गाळा क्रं. १७ एस.बि. आय. बँक शेजारी ज्याची लांबी उत्तर-दक्षिण १५ फुट म्हणजेच ४.५७ मीटर व रुंदी : पुर्व-पश्चिम १० फुट म्हणजेच ३.०४ मीटर ज्याचे एकुण क्षेत्रफळ १५०.०० चौरसफुट म्हणजेच १३.८९ चौरसमीटर ज्याची चतुः सिमा पुर्वेस गाळा क्रं १६, पश्चिमेस : गाळा क्रं १८, दक्षिणेसः बाजार समितीची मोकळी जागा, उत्तरेस गाळा क्रं ०२ वरील चर्तु- सिमेच्या आतील गाळा क्रं. १७ हा श्री. गोपाल सत्यनारायण सोमाणी रा. हिंगोली ता. जि. हिंगोली यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली कडून राहीलेल्या उर्वरीत (०१/०१/२०३८) पर्यंतच्या कालावधी करीता नोंदणीकृत भाडेपट्टा लेख दि. २७/०८/२०११ अन्वये भाडयाने घेतला होता त्यांना सदरील गाळयाची आवश्यकता नसल्यामुळे सदरील गाळा ते श्री शंकर लक्ष्मीनारायण अग्रवाल, रा. हिंगोली यांना राहीलेल्या उर्वरीत (०१/०१/२०३८) पर्यंतच्या कालावधी करीता कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली मार्फत श्री. शंकर लक्ष्मीनारायण अग्रवाल, रा. हिंगोली यांची कृषि उत्पन्न बाजार समिती हिंगोली च्या रेकॉर्डला उपरोक्त भाडेकरु म्हणून हस्तांतरणाची नोंद करुन घेण्यासाठी विनंती अर्ज केलेला आहे.

सदरील हस्तांतरणाबाबत कोणास काही आक्षेप व उजर असल्यास त्यांनी सदरील नोटीस जाहिर प्रगटन मध्ये प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कार्यालयात लेखी उजर कार्यालयाच्या पत्यावर अथवा प्रत्यक्ष दाखल करावेत. १५ दिवसात उजर आक्षेप न दाखल केल्यास १५ दिवसानंतर कोणासही वरील हस्तांतरणाबाबत आक्षेप व उजर नाही असे गृहित धरुन त्यांच्या नावाने हस्तांतरण नियमाप्रमाणे करुन देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सचिव — सभापती

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

पुढील तारीख : ०१/०३/२०२५

दि.कि.अर्ज क्र. ३३/२०२५

अर्जदार : १. शांताबाई आबाराव जाधव, वयः ९० वर्षे, धंदाः घरकाम, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. नारायण आबाराव जाधव, वयः ५४ वर्षे, धंदाः शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ३. ज्ञानेश्वर आबाराव जाधव, वयः ४८ वर्षे, धंदाः शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ४. भगवान आबाराव जाधव, वयः ४७ वर्षे, धंदाः शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ५. ठगुबाई पंडीत गायकवाड, वयः ६३ वर्षे, धंदाः घरकाम, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ६. सुबाबाई साहेबराव निकम, वयः ७८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ७. इंदुबाई छगनराव जाधव, वयः ५९ वर्षे, धंदाः घरकाम, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ८. गणेश छगन जाधव, वयः ३८ वर्षे, धंदाः शेती, रा. दिगर, पिशोर, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. ९. शितल अमोल मैराळ, वयः ३५ वर्षे, धंदाः घरकाम, रा. शिवाजी नगर कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील अॅड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ व ६ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. ७ यांचे सासरे व अर्जदार क्र. ८ ते ९ यांचे आजोबा नामे आबाराव पुंडलिक जाधव हे दि. १९/०६/१९९१ रोजी मौजे दिगर, पिशोर, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत आबाराव पुंडलिक जाधव यांना अर्जदार क्र. १ ते. ९ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी. सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २०/०१/२०२५

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क.स्तर कन्नड.

## महिला सबलीकरण अंतर्गत आरोग्य शिबीर, टेलरिंग प्रशिक्षण संपन्न



कन्नड :- दि.२१ जानेवारी - तालुक्यातील बनशेंद्रा येथे दि.२१ रोजी महिला सबलीकरण योजने अंतर्गत आरोग्य शिबीर व टेलरिंग प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले. हेलपिंग ह्युमन सेवाभावी संस्थेने तालुक्यातील बनशेंद्रा येथे शिबीर,प्रशिक्षण शिबीर घेतले होते,या आरोग्य शिबिरात महिलांच्या विविध आजारांच्या तपासण्या करण्यात आले,यावेळी वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रदीप कांबळे, समुदाय वैद्यकीय अधिकारी मेनका आणेवार,पौर्णिमा वाघ,संस्था अध्यक्ष योगेश अंभोरे, हर्षदा नलावडे, ग्रामविस्तार अधिकारी कोकणे,सरपंच अंबादास मोरे,बाबू लोखंडे, सह गावकरी उपस्थित होते.

## सोयगाव-शेंदुर्णी आज करणार रस्ता रोको आंदोलन

सोयगाव दि.२१ जानेवारी : सोयगाव- शेंदुर्णी रस्त्यासाठी झोपेचे सोंग घेतलेल्या प्रशासनाला जागी करण्याकरिता सोयगावकर आज दि.२२ बुधवार रोजी रस्ता रोको आंदोलन करणार आहे. हे आंदोलन संत गाडगेबाबा चौक शेंदुर्णी बायपास या ठिकाणी सकाळी वेळ ९:३० वाजता सुरू होणार आहे.तर सोयगावच्या ग्रामस्थांनी सकाळी वेळेवर हजर राहण्याचे आवाहन केले आहे.

# खुले जिल्हा कारागृहातील कैद्यांच्या दादागिरी मुळे त्रस्त शेतकऱ्याचा आत्मदहनाचा

तभा वृत्तसेवा

पैठण दि २१ : जायकवाडी प्रकल्पात संपादित झालेल्या जमिनी उघड्या पडल्यावर, या जमिनी वर गाळपेरा करणाऱ्या मूळ मालक असलेल्या शेतकऱ्याना खुले जिल्हा कारागृहात कैदी दादागिरी करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. खुले जिल्हा कारागृहातील कैद्यांच्या दादागिरी मुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्याने प्रजासत्ताक दिनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

जायकवाडी धरणालगत असलेल्या शेवगाव तालुक्यातील कर्हेटाकळी येथील भाऊसाहेब दौलतराव उल्हूळे यांची २१/२, १९/२,व १८/२ ही शेतजमीन संपादित झालेली आहे. व २८ ऑगस्ट २००१ च्या परिपत्रकानुसार ते जमिनीचे मूळ मालक असल्याने या जमिनीवर गाळपेरा करत आहे. मात्र, त्यांच्या गावाशेजारील खुले जिल्हा कारागृहातील काही अधिकारी कैद्यांना पाठवून जमिनीचे मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांनावर दादागिरी करत असून शेतकऱ्यांना व महिलांना गचाड्या देऊन जमिनीबाहेर काढत आहे.विशेष म्हणजे, मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांना गाळपेरा करण्यास अडथळा करू नये असा शेवगाव तहसीलदाराचा आदेश असताना ही ओपन जेल चे अधिकारी आमच्यावर अन्याय करत असल्याची माहिती शेतकरी भाऊसाहेब दौलतराव उल्हूळे यांनी दिली आहे.

ओपन जेलच्या कैद्यांच्या व अधिकाऱ्यांच्या दादागिरी मुळे त्रस्त झालेल्या कर्हेटाकळी चे शेतकरी भाऊसाहेब दौलतराव उल्हूळे यांनी छ. संभाजीनगर चे जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन योग्य कार्यवाही करावी अन्यथा प्रजासत्ताक दिनी आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.



**जमिनी संपादित झाल्याने देशोधडीला लागलेले शेतकरी, गाळपेरा करून कसाबसा आपला प्रपंच चालवत आहे.या गरीब शेतकऱ्यांवर ओपन जेल चे कैदी दादागिरी करत आहे. शासनाने या कैद्यांना सुधारण्यासाठी आणले आहे की पुन्हा क्राईम करण्यासाठी आणले आहे. कार्यवाही न झाल्यास आम्ही आंदोलन उभे करणार. नवनाथ इसारवाडे, जय शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष अहिल्यानागर.**

## संघ हीच जीवनगाथा



### अलक (२१) संघ शिक्षा वर्ग

**संघ शिक्षा वर्ग नावाचे एक प्रशिक्षण शिबिर असते. इथे एकात्मतेच्या संस्काराला अधिक सुदृढ बनवतात. इथे मत, भाषा, आणि जातीपातीचा भेदभाव नसतो. इथे सर्वांचे सामूहिक जीवन भेदभाव रहित असते. संघ समाजाला एक जिवंत शरीरचना म्हणतो. समाज म्हणजे विराट पुरुष आणि जसे जिवंत शरीरातील सर्व अवयवांना एक दुसऱ्याशी स्नेहभाव जपावा लागतो तसेच समाज म्हणजे या विराट पुरुषाला भारत मातेच्या सर्व जाती धर्मातील व्यक्ती तसेच रहिवाशां सोबत बंधूभावाचे नाते जपावे लागते अट एकच तो रहिवासी भारत माते प्रति विशुद्ध निष्ठा ठेवणारा असावा. इथे शक्ती आणि अनुशासनाचे विराट प्रदर्शन असते. संपूर्ण राष्ट्र एक कुटुंब ही संकल्पना इथे प्रत्यक्ष अनुभवता येते. १९३९ साली पुण्याच्या संघ शिक्षा वर्गाला डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी भेट दिली होती. तेव्हा त्यांनी डॉक्टरांना विचारले होते की शिबिरात अस्पृश्य पण आहेत का. त्यावर डॉक्टर म्हणाले शिबिरात कोणीही स्पृश्य नाही किंवा अस्पृश्य नाही. इथे फक्त हिंदू आहेत. कारण संघाच्या दृष्टीने हिंदू शब्द भारताच्या राष्ट्रीय स्वत्वाचा पर्याय आहे. (क्रमशः)**

**लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालय गावकऱ्यांची व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.२१ जानेवारी : सोयगाव तालुक्यातील माळेगाव प्रिपी येथे राष्ट्रीय सेवा योजना संत ज्ञानेश्वर महाविद्यालय व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गीतेश चावडा,वैद्यकीय अधिकारी डॉ.विशाखा डुकरे,यांच्या संयुक्त विद्यमाने गावकऱ्यांची व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

डॉ.स्नेहल वरंगणे यांच्या मार्गदर्शनाखाली एच.आय. व्ही.सी.बी.सी.थायरॉईड लिव्हर फंक्शन किडनी फंशन तपासणी या तपासण्या करण्यात आल्या.यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र जरंडी येथील प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी ज्ञानेश्वर पाटील,आर.बी. यस,के. चे.डॉ.मोहममद झाकी,तालुका आरोग्य अधिकारी चे कर्मचारी संदीप तेली,आय.सी.टी. सी.तालुका समुपदेशक वानखेडे सर,प्रयोग शाळा तंत्रज्ञ महेंद्र पाटील,सागर घायवट,ईश्वर निकम,संदीप चव्हाण,कदम सर,संतोष सोहनी,दुर्गा आरते व महाविद्यालयाचे प्रा.निलेश गावडे,प्रा. प्रदीप गोल्हारे प्रा.पंकज गावित सर्व प्राध्यापक वृंद व विद्यार्थी उपस्थित होते.



## ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मधील विद्यार्थी यशोधन घुगे यानी राज्यस्तरीय किक- बॉक्सिंग स्पर्धेत जिंकले कास्य पदक

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २१ जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणिक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मधील यशोधन पवन घुगे याने राज्यस्तरीय शालेय किक - बॉक्सिंग स्पर्धेत जिंकले कास्य पदक सातारा जिल्हा छत्रपती शाहु जिल्हा क्रिडा संकुल येथे दिं. १७ ते १९ जानेवारी रोजी आयोजित क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत झालेल्या राज्यस्तर शालेय किक - बॉक्सिंग स्पर्धेत वय १७ वर्ष ३५ किलो मध्ये कास्य पदक जिंकुन शाळेचे नाव लौकिक केले आहे. यशोधनने किक -बॉक्सिंग, वुशू, बॉक्सिंग, कराटे, तायकांदो, बेल्ट रेस्टलिंग, बुडो मार्शल आर्ट, या अंतराष्ट्रीय खेळामध्ये प्राविण्य मिळवले आहे. त्याच्या या यशाबद्दल शाळेमध्ये आज यशोधनचा सत्कार करण्यात आला. शाळेचे संस्थापक अध्यक्ष सतिश तोतला सर, शाळेचे क्रिडा शिक्षक पवन घुगे, शाळेतील शिक्षक, शिक्षीका, विद्यार्थी यांनी याशोधनला या विजया बद्दल आणि पुढील होणाऱ्या स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.




### जाहीर प्रगटन

मा. व्ही. एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.

पुढील तारीख : १६/१२/२०२४
दि.कि.अर्ज क्र. ३२३/२०२४

अर्जदार १. ललिताबाई युवराज गायकवाड, वयः ६८ वर्षे, धंदाः घरकाम, रा. उंबरखेडा तांडा, ता. कन्नड, जि. औरंगाबाद. २. संजू युवराज गायकवाड, वयः २९ वर्षे, धंदाः शेती, रा. सावरगाव, ता. कन्नड, जि. औरंगाबाद.

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी औरंगाबाद.

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे वकील ॲड. टी.डी. शिंदे यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ यांचे वडील नामे युवराज मानसिंग गायकवाड हे दि. २३/०८/२०२० रोजी मौजे उंबरखेडा तांडा, ता. कन्नड येथे मयत झालेले आहे. मृत्यु प्रमाणपत्र अर्जासोबत दिलेले आहे. मयत युवराज मानसिंग गायकवाड यांना अर्जदार क्र. १ व २ हेच कायदेशीर वारस असुन इतर कोणीही वारस नाही. अर्जदार यांना शासकीय निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांनी अर्ज केल्यानुसार वारस प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुनास कुठलाही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि. २५/१०/२०२४

आदेशावरुन
कनिष्ट लिपीक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड

### जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी श्रीमती. हौसाबाई उर्फ जिजाबाई भ्र. रायभान कजबे, रा. रांजनगाव खुरी, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर यांचेकडुन खालिल परिशिष्ठामधील नमुद शेत जमीन विकत घेण्याचा लेखी करारनामा केला असुन त्यांनी नमुद मिळकत ही त्यांची एकमेव मालकीची असल्याचे तसेच त्या मिळकतीवर कसल्याही प्रकारचे सरकारी अथवा खाजगी कर्ज अथवा बोजा नाही अशी हमी त्यांनी माझ्या पक्षकारास दिली आहे. तरी नमुद मिळकती बाबत इतर कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन आठ दिवसांच्या आत तसा लेखी आक्षेप माझ्या कार्यालयात नोंदवावा अन्यथा माझे पक्षकार विक्री करारनाम्यानुसार पुढील व्यवहार पुर्ण करतील.

मिळकतीचे परिशिष्ठः शेत जमीन गट क्र. ८४ मौजे राजुरा, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर क्षेत्र ०१ हेक्टर ८० आर ज्याची चतुसिमा पुर्वेसः मुक्ताबाई विठोबा यांच्या नावावरील भाउसाहेब पि. आण्णासाहेब पदार यांचे ताब्यातील जमीन, पश्चिमेसः - सुदाम पि. प्रभात गायकवाड यांची शेत जमीन, उत्तरेसः- नवनाथ व कैलास पि. बालचंद वैदय यांची शेत जमीन, दक्षिणेस :- शिवा पि. रामराव म्हस्के व संगीता म्हस्के यांची शेत जमीन.

करीता हे जाहीर प्रगटन.

**जाहिर प्रगटन प्रसिध्द करणार**
**ॲड.एस. के. नरोडे पाटील**
**राधेशाम निवास, हॉटेल धनराजच्या पाठीमागे, लक्ष्मी कॉलणी, गंगापुर ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर**
**मो. नं. ९०११९५५५९०**

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.आदेश/प्र.क्र.४५५०/कावि-५१५९
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-२३.१२.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार : सरदारखा सुबहाखा पठाण, वय-७६ वर्ष व्यवसाय- शेती, रा. फत्तेपूर. ता. जामनेर जि. जळगाव.

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय मोलखेडा/हिवरी, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी सरदारखा. सुबहाखा पठाण, रा. फत्तेपूर ता. जामनेर जि. जळगाव यांनी त्यांचा दिनांक ०१.०१.१९४८ रोजी हिवरी येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की सरदारखा सुबहाखा पठाण, यांचा दिनांक ०१.०१.१९४८ रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर/आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर/आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जॉहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

### जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः ४०६/२०२४

अर्जदार १- हिराबाई भ्र. गोकुळ गोरे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. सिरसगांव, ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद २- स्वाती भ्र. राजेंद्र मोहिते, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, रा.नागापूर, ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद ३- किशोर पिता गोकुळ गोरे, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. सिरसगांव ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद ४- अविनाश पिता गोकुळ गोरे, वय ३२ वर्षे, धंदा शेती, रा. सिरसगांव ता. कन्नड, जिल्हा औरंगाबाद

-विरुध्द-

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन, मार्फत जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद,

अर्ज : कायदेशीर वारस प्रमाणपत्र लिगल हेअरशिप सर्टीफिकेट मिळणे बाबत.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ जे.सी.मगर, एस.जे. मगर यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार नंबर १ ते ४ हे मौजे सिरसगांव ता. कत्रड, जिल्हा औरंगाबाद येथील राहणारे आहेत. अर्जदार नंबर १ हिचे पती व अर्जदार क्रमांक २ ते ४ यांचे वडील नामे गोकुळ तुकाराम गोरे हे दिनांक ०८/०९/२०२४ रोजी वृध्दापकाळामुळे मयत झाले आहे. अर्जदार नंबर १ ते ४ यांचे व्यतीरिक्त मयत गोकुळ तुकाराम गोरे यांना ईतर कोणतेही वारस नाही, अर्जदार नंबर १ ते ४ हेच एकमेव वारस आहेत.

अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी, महसुल दफ्तरी नोंद घेणेसाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे व इतरही कायदेशीर कामासाठी सदरील वारस प्रमाण पत्राची आवश्यकता असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे अर्जदार १ ते ४ हे मयताचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतास कोणीही ईतर वारस नाही, अर्जदार सोबत अर्जदारांचे आधार कार्ड तसेच मृत्यु प्रमाणपत्र केले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जहीर प्रगटन.

दिनांक १५/०१/२०२५

आदेशावरून
क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, कन्नड.

### जाहीर प्रगटन

**मा. ए.यु. आवटी, मॅडम, दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज.क्र. ५/२०२४

अर्जदार : १- विष्णु तोताराम राऊत, वय ४८ वर्षे, धंदा- मजुरी, रा. जामडी (जा) ता. कन्नड जि. औरंगाबाद २) अशोक तोताराम राऊत, वय ६७ वर्षे, धंदा- मजुरी, रा. जामडी (जा) ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) कडुबा तोताराम राऊत (मयत) वारस, ३-१) अरुणाबाई भ्र. कडुवा राऊत, वय- ५९ वर्ष, धंदा- घरकाम, रा. जामडी (जा) ता. कन्नड जि. औरंगाबाद ३.२) ज्ञानेश्वर कडुबा राऊत, त्रय- ४२ वर्षे, धंदा- मजुरी, रा. जामडी (जा) ता. कन्नड जि. औरंगाबाद ३.३) बाळु कडुबा राऊत, वय ३४ वर्ष, धंदा मजुरी, रा. जामडी (जा) ता. कन्नड जि. औरंगाबाद ३.४) तुकाराम कडुबा राऊत, वय- ३७ वर्षे, धंदा- मजुरी, रा. जामडी (जा) ता. कन्नड जि. औरंगाबाद ३.५) हिरा संतोष सोनवणे, वय- ४० वर्ष, धंदा घरकाम, रा. चिचोली कान्हेगाव, ता. फुलंब्री जि. औरंगाबाद ४) शशिकलाबाई दादाराव ढोके, वय- ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा भोकरदन ता. भोकरदन जि. जालना.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ डी. के. साळवे यांच्या मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ व २ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्र. ३ हा त्यांचा मयत भाऊ आहे, त्यांचे अर्जदार क्र. ३-१ ते ३-५ हे वारस असुन, अर्जदार क्र. ४ ही अर्जदार क्र. १ व २ यांची बहीन आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र. ३-१ चे सासरे व अर्जदार क्र. ३-२ ते ३-५ यांचे आजोबा नामे तोताराम कोंडु राऊत हे होते ते दिनांक १५/०३/१९९५ रोजी मौजे जामडी (जा) येथे मयत झालेले आहे, तसेच तोताराम कोंडु राऊत यांच्या पत्नी नामे चंद्रभागाबाई तोताराम राऊत या देखील दिनांक २५/१२/२०१६ रोजी मयत झालेल्या आहे. तसेच अर्जदार क्र. १ व २, ४ यांचा भाऊ नामे कडुबा तोताराम राऊत हा होता तो देखील दिनांक ०८/०९/१९९५ रोजी मयत झालेला आहे त्यांचे अर्जदार क्र. ३-१ ते ३-५ हे वारस आहे.

अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाटी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील नमुद अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे अस सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे. अर्जदार यांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी इतर कोणत्याही न्यायालयात अर्ज केलेला नाही. अर्जदार क्र. १ ते ४ व अर्जदार क्र. ३- १ ते ३-५ यांच्या व्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही, अर्जदार क्र. १ ते ४ व अर्जदार क्र. ३-१ ते ३-५ हे मयताचे कायदेशीर वारस आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

दिनांक १३/०१/२०२५

आदेशावरुन
क. लिपिक सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, कन्नड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.आदेश/प्र.क्र.४४७६/कावि-५०८४
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१८.१२.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार : सयनाजबी चांदखा पठाण, वय-४२ वर्ष व्यवसाय- शेती, रा. कुसुंबा ता. मंगरोल जि. सुरत.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय मोलखेडा/हिवरी, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी सयनाजबी चांदखा पठाण, रा. कुसुंबा ता. मंगरोल जि. सुरत यांनी त्यांचा दिनांक ०४.०५.१९८२ रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की सयनाजबी चांदखा पठाण, यांचा दिनांक ०४.०५.१९८२ रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर/आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.आदेश/प्र.क्र.४५४९/कावि-५१५८
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड
दिनांक :-२३.१२.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- रशिदखा उस्मानखा पठाण, वय-५१ वर्ष व्यवसाय- शेती, रा.तोंडपूर. ता.जामनेर जि. जळगाव.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय मोलखेडा/हिवरी, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी रशिदखा उस्मानखा पठाण, रा.तोंडापूर ता. जामनेर जि. जळगाव यांनी त्यांचा दिनांक ०१.०१.१९७३ रोजी हिवरी येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की रशिदखा उस्मानखा पठाण, यांचा दिनांक ०१.०१.१९७३ रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म्र प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जॉहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.आदेश/प्र.क्र.४४७७/कावि-५०८५
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१८.१२.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- अकबरखा चांदखा पठाण,
वय-४५ वर्ष व्यवसाय- शेती, रा. मधुवन सोसायटी, मारोली बाजार, नवसारी ता.जि.नवसारी.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय मोलखेडा/हिवरी, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म - मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी अकबरखा चांदखा पठाण, रा. मधुवन सोसायटी, मारोली बाजार, नवसारी ता.जि. नवसारी यांनी त्यांचा दिनांक ०१.०१.१९७८ रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की अकबरखा चांदखा पठाण, यांचा दिनांक ०१.०१.१९७८ रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/ हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.आदेश/प्र.क्र.४५५१/कावि-५१६०
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-२३.१२.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- जमिलाबी शेख अमीर,
वय-७५ वर्ष व्यवसाय- शेती, रा. मधुवन सोसायटी, वाडा ता. मारोली बाजार, नवसारी जि. नवसारी गुजरात

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय जामठी/पिंपळा, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी जमिलाबी शेख अमीर, रा. मधुवन सोसायटी, वाडा ता.मारोली बाजार, नवसारी जि. नवसारी गुजरात यांनी त्यांचा दिनांक ०२.०८.१९४९ रोजी जामठी/पिंपळा येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म-मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की जमिलाबी शेख अमीर, यांचा दिनांक ०२.०८.१९४९ रोजी मौजे जामठी/पिंपळा येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.आदेश/प्र.क्र.४१५१/कावि-३९७४
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१३.११.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार :- शकिलाबी चांदखा पठाण,
वय-४८ वर्ष व्यवसाय- शेती, रा.सुरत ता. जि.छत्रपती संभाजीनगर.

विरूध्द

गैरअर्जदार :- ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय हिवरा/मोलखेडा, ता. सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज

उपरोक्त विषयी शकिलाबी चांदखा पठाण, रा. सुरत ता.जि. सुरत यांनी त्यांचा दिनांक ०१.०६.१९७६ रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की शकिलाबी चांदखा पठाण, यांचा दिनांक ०१.०६.१९७६ रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला - जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

जा.क्र.२०२४/विधी/ज.मृ.आदेश/प्र.क्र.४१५२/कावि-३९७५
उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, सिल्लोड दिनांक :-१३.११.२०२४.

### जाहीर प्रगटन

अर्जदार : चांदखा सुबहान खा पठाण, वय-७४ वर्ष व्यवसाय- शेती, रा. मधुवन सोसायटी, मारोली बाजार. नवसारी ता. जि. नवसारी.

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय मोलखेडा/हिवरी. ता.सोयगाव जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय : जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा २०२३ चे कलम ११ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी चांदखा सुबहान खा पठाण, रा. मधुवन सोसायटी, मारोली बाजार, नवसारी ता. जि. नवसारी यांनी त्यांचा दिनांक ०२.०८.१९५० रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असून सदर ठिकाणी त्याबाबतची नोंदणी केलेली नसल्यामुळे जन्म- मृत्यू नोंदणी कायदा-१९६९ सुधारणा-२०२३ चे कलम ११ (३) अन्वये या न्यायालयात अर्ज सादर केलेला आहे.

करीता या जाहिर प्रगटनाद्वारे गैरअर्जदार व सर्व जनतेस सुचित करण्यात येते की चांदखा सुबहान् खा पठाण, यांचा दिनांक ०२.०८.१९५० रोजी मौजे हिवरी येथे जन्म झाला असले त्याबाबत संबंधीताचे प्रमाणपत्र जारी करण्यासाठी आदेश मिळणेस विनंती केली आहे. करीता सदर प्रकरणी जर कुणाचा काही उजर / आक्षेप/हरकत असेल तर त्यांनी सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्द झालेपासून ३० दिवसाच्या आत उजर /आक्षेप/हरकत मुळ कागदपत्रासह नोंदवावा. मुदतीनंतर आलेले कोणतेही उजर / आक्षेप/हरकत ग्राहय धरला जाणार नाही व अर्जदाराचे जन्म प्रमाणपत्राबाबत आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर प्रगटन सही व शिक्यानिशी देण्यात आले.

उपविभागीय दंडाधिकारी, सिल्लोड

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# आपुलीच प्रतिमा होते...

सद्गुणांचे संस्कार सातत्याने केले तर मन पारदर्शक होते, विचार प्रगल्भ होतात आणि आचरणही शुद्ध राहते, असे सांगितले जाते. चांगल्या गुणांचे संस्कार करण्याकरिता बालपण हाच योग्य काळ असतो. वय वाढत गेल्यावर मन संस्कारक्षम राहात नाही असे नाही, पण वाढत्या वयात संस्कार घडविण्याकरिता अधिक काळ घालवावा लागतो. आपले बालक शरीराने सुदृढ असावे, मनाने स्वच्छ असावे, स्वभावाने पारदर्शक असावे आणि आचरणाने शुद्ध असावे, अशी प्रत्येक पालकाची इच्छा असते. त्यामुळे या इच्छापूर्तीसाठी जे काही संस्कार बालवयातच मुलावर करावे लागतात, त्यासाठी पालक हरतऱ्हेचे प्रयत्न करतो. शिक्षणाने माणसे सुसंस्कृत होतात, असे सांगितले जात असल्याने, चांगल्या शाळांमधील चांगले शिक्षण आपल्या बालकास मिळावे यासाठी पालक कठोर कष्ट उपसतात, आर्थिक खस्ता खातात. मात्र वय वाढत गेले की, त्याच्या वर्तणुकीतील चांगल्या बदलामुळे पालकांचे समाधान होते. चांगले संस्कार झालेले आपले मूल भविष्यात चांगला नागरिक म्हणून समाजात वावरू शकेल, या समाधानाने मुलांच्या वाढत्या वयातील गरजा भागविण्याकरिता पालक सज्ज होतात. साधारणपणे अलिकडच्या प्रत्येक कुटुंबातच हेच चित्र दिसते आहे. शिक्षणातून संस्कार घडतात या समजुतीस धक्का देणाऱ्या अनेक घटना आसपास दिसतात. महाराष्ट्रातीलच एका सुशिक्षित कुटुंबात जन्मलेली, प्रशासकीय अधिकारी म्हणून सरकारी सेवेत दाखल झालेली आणि प्रशासकीय अधिकाऱ्याचीच मुलगी असलेली एक युवती आपल्या पदाचा गैरवापर करून समाजाच्या अपेक्षांना पाने पुसताना दिसते, सरकारी अधिकारी म्हणून सेवेत दाखल होताच लाचखोरीच्या मार्गाला लागून पैसे कमावण्याकरिता आपल्या शिक्षणाची योग्यता पणाला लावताना दिसते, तेव्हा शिक्षण आणि संस्कार किंवा वयानुरूप येणाऱ्या बौद्धिक प्रगल्भतेतून बऱ्या-वाईटाचा विवेक सांभाळण्याचे शहाणपण यांचा संबंध असावा, या समजुतीस धक्का बसतोच. उत्तरप्रदेशात अन्न व औषध प्रशासनाच्या सेवेत दाखल होताच एका तरुणीने लाचखोरीचे जाळे एका औषध विक्रेत्यावर टाकले आणि ३० हजारांच्या लाचेसाठी आपले पदच पणाला लावले. ही बातमी समाज माध्यमांवरून सर्वदूर पोहोचताच सरकारी अधिकारी म्हणून सेवेत दाखल झालेल्या या तरुणीविषयी तीव्र संतापाच्या भावना उमटल्या. अगोदर दर्जेदार शिक्षणासाठी प्रचंड पैसा खर्च करून प्रतिष्ठित शिक्षण संस्थांमधून पदव्या संपादन करावयाच्या, त्या शैक्षणिक पात्रतेचा वापर करून गलेलठ्ठ पगाराच्या सरकारी नोकऱ्या मिळवायच्या आणि पदाची प्रतिष्ठा प्राप्त होताच त्याचा गैरवापर करून पैसा मिळविण्याकरिता कोणत्याही मार्गाचा अवलंब करावयाचा; यामुळे शिक्षणाच्या प्रतिष्ठेविषयीचे समज आता गळून पडू लागले असून, सरकारी क्षेत्रांतील कर्मचाऱ्यांविषयी सामाजिक आदराच्या भावनेस ओहोटी लागली आहे. कदाचित यामुळेच सरकारी सेवेतील कर्मचाऱ्यांची समाजमनातील प्रतिमा बदलून त्यांना आदराचे स्थान मिळावे यासाठी १० वर्षांपूर्वी सत्तेवर येताच पंतप्रधान मोदी यांनी सरकारी कार्यपद्धती बदलण्याचा संकल्प केला होता. 'चलता है', 'मला काय त्याचे' अशा मानसिकतेतून काम करण्याची प्रवृत्ती बदला नाही तर कारवाईस तयार व्हा, असा सज्जड इशाराही त्यांनी दिला होता. बहुधा मोदी सरकारच्या सत्ताकाळातील पहिल्या काही महिन्यांत या मोहिमांचाही चांगला बोलबाला झाला आणि सरकारी कार्यसंस्कृती बदलत चालल्याच्या जाणिवांनी समाजही सुखावला होता. 'ना खाऊंगा ना खाने दूंगा' अशी ग्वाही पंतप्रधानांनी दिल्यानंतर लाचखोरी-भ्रष्टाचार अशा अपप्रवृत्तींची सरकारी कार्यसंस्कृतीस लागलेली कीड नष्ट होऊन देशात रामराज्य अवतरेल, अशा अपेक्षांनी जनतेने तेव्हा देशातील परिवर्तनशील भविष्याकडे आशेने डोळे लावले होते.

गेल्या १० वर्षांत परिस्थिती खरोखरीच किती बदलली आहे हे पाहावयाचे असेल, तर सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीकडे पुन्हा एकदा पाहावे लागेल. बालवयात सुसंस्कार घडविल्यानंतर मुलांचे आचारविचार सुसंस्कृत होतात. कळत्या वयातील संस्कारांमुळे मोठ्यांच्या आचारविचारातही बदल व्हावा असे अपेक्षित असले, तरी सरकारी कार्यसंस्कृतीत संस्कारांचा एकच बडगा जेव्हा सातत्याने उगारण्याची वेळ येते, तेव्हा असे काही घडतच नसावे, या समजुतीलाच पुष्टी मिळते. महाराष्ट्रात राजपत्रित अधिकारी महासंघामार्फत सरकारी सेवेतील राजपत्रित अधिकाऱ्यांकरिता कार्यसंस्कृती नावाचा एक गोंडस शब्द वारंवार वापरला जातो. 'ना खाऊंगा ना खाने दूंगा' अशी घोषणा पंतप्रधान मोदी यांनी केल्यानंतर सरकारी कार्यसंस्कृतीत बदल घडविण्याची गरज म्हणून पुढच्या काही काळातच महासंघाने एक अभिनव अभियान हाती घेतले असावे. 'पगारात भागवा' हे त्या अभियानाचे अभिनव नाव तेव्हा जनतेसही मनापासून भावले होते. सरकारी कर्मचाऱ्यांविषयी जनतेच्या मनात असलेले समज-गैरसमज दूर करण्यासाठी कर्मचाऱ्यांनी जनसेवकाच्या भावनेने जनतेशी वागावे आणि लाचखोरी-भ्रष्टाचारामुळे जनमानसात निर्माण झालेली तिरस्काराची भावना पुसून टाकण्यासाठी लाचखोरी किंवा भ्रष्टाचारापासून दूर राहून पगारात भागविण्याची सवय लावून घ्यावी, असा या अभियानातून केल्या जाणाऱ्या संस्कारांचा गाभा होता. त्याला आता जवळपास नऊ वर्षे झाली. दोन वर्षांपूर्वी जून महिन्यातही हेच अभियान पुन्हा एकदा राबविण्यात आले. लाचखोरी, भ्रष्टाचार किंवा तत्सम प्रकारातून एखादा सरकारी कर्मचारी गजाआड गेला तर त्याच्या कुटुंबाचे नुकसान होते, प्रतिमेची व प्रतिष्ठेची हानी होते आणि असे नुकसान भरून निघणेही अवघड होते. त्यामुळे सरकारी कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचारापासून दूर राहिले पाहिजे, असा संदेश देत महासंघाचे पदाधिकारी राज्यभर मोहिमेचा प्रचार करीत होते. अशा प्रकारची मोहीम राबविण्याची वेळ राजपत्रित अधिकाऱ्यांच्या संघटनेवर यावी हेच खेदजनक आहे, अशा भावना या मोहिमेच्या प्रचारादरम्यान काही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्तदेखील केल्या होत्या. केवळ पैसे कमावण्याच्या हेतूने सरकारी नोकरीत दाखल झाला असाल तर ते योग्य नसून जनतेचे सेवक म्हणून कर्तव्य बजावा, असा संदेश या संघटनेचे पदाधिकारी तेव्हा देत होते. जनतेच्या मनात जर सरकारी कर्मचाऱ्याविषयी नकारात्मक भावना असेल तर आपली कार्यपद्धती सदोष आहे, हे लक्षात घेऊन कार्यपद्धती बदला, असा संदेशही या अभियानात दिला गेला होता. आज याच संघटनेस पुन्हा एकदा 'पगारात भागवा' या नावाने मोहीम हाती घेण्याची वेळ आलेली दिसते. केंद्र सरकारने आठव्या वेतन आयोगाच्या स्थापनेस मंजुरी दिली आहे. साहजिकच सरकारी कर्मचाऱ्यांच्या वेतनास भरघोस वाढीचे नवे वेध लागले आहेत. पण पगारवाढ होत असूनही सरकारी कर्मचाऱ्यांविषयी जनतेच्या मनात असलेल्या नकारात्मक भावना पुसल्या गेलेल्या नाहीत, याची जाणीव महासंघास नव्याने झाली असून सरकारी कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीला सूत्रबद्धता आणण्यासाठी दशसूत्री जारी केली आहे. राज्यातील प्रशासकीय कामकाजात सुसूत्रता आणणे, कार्यसंस्कृतीला बट्टा लावणाऱ्या भ्रष्टाचार, लाचखोरीसारख्या प्रकारांपासून दूर राहणे हा सुसंस्कार या कार्यसंस्कृतीतून सरकारी कर्मचाऱ्यांच्या मनावर बिंबविण्यात येणार असून कर्मचाऱ्यांच्या कार्यसंस्कृतीची दशसूत्री जनतेसही माहीत व्हावी याकरिता कार्यालयांबाहेर फलकांवरही प्रसृत करण्यात येणार आहे. कामकाजात शंभर टक्के प्रामाणिकपणा, सेवाभावनेप्रति पूर्ण निष्ठा व त्याद्वारे जनतेस दर्जेदार सेवा पुरविणे हे या मोहिमेचे उद्दिष्ट राहणार असल्याचे सांगण्यात येते. कर्मचाऱ्यांवर सुसंस्कार घडविण्यासाठी हार न मानता, अथकपणे राबविल्या जाणाऱ्या अशा मोहिमेबद्दल संघटनेचे कौतुक करायलाच हवे, पण गेल्या नऊ वर्षांत तिसऱ्यांदा हेच अभियान राबविण्याची वेळ आल्याने, त्या त्या अभियनातून केले गेलेले कार्यसंस्कृतीचे सुसंस्कार कर्मचाऱ्यांच्या मनात भिनले किंवा नाही याचा आढावाही या निमित्ताने संघटनेने घ्यावयास हवा. 'परफॉर्म ऑर पेरिश' म्हणजे, कार्यक्षमता दाखवा किंवा बाजूला व्हा, असा इशारा १० वर्षांपूर्वी पंतप्रधानांनी दिला होता. त्यानंतर आपली कार्यक्षमता सिद्ध करण्याकरिता कोणते प्रयत्न झाले, याचाही या निमित्ताने आढावा घ्यावयास हवा. त्यातून सकारात्मक काही समोर आले, तर जनतेच्या मनातील जुनी प्रतिमा पुसण्यास अभियान खरोखरीच उपयुक्त ठरते की केवळ काहीतरी तात्कालिक उपक्रम एवढाच या अभियानाचा हेतू उरतो, हेही स्पष्ट होईल.

## आंतरराष्ट्रीय

**वसंत गणेश काणे**

# अमेरिकन व्हिसा

व्हिसा हा सरकारचा एक अधिकृत दस्तावेज आहे. यानुसार तुम्हाला विशिष्ट वेळ आणि कारणासाठी त्या देशात प्रवेश करण्याची, राहण्याची किंवा प्रवास करण्याची अनुमती मिळते. ही बाब आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी महत्त्वाची आहे. कारण ती तुम्हाला सीमा ओलांडू देते आणि कायदेशीररीत्या दुसऱ्या देशात निरनिराळे व्यवहार करू देते. 'एच१बी व्हिसा' हा अमेरिकेत दाखल होण्यासाठीचा एक प्रकारचा व्हिसा आहे. हा व्हिसा इमिग्रेशन ॲण्ड नॅशनॅलिटी ॲक्टच्या कलम १०१ नुसार दिला जातो. अमेरिकेत काम करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या अनेक व्हिसांपैकी हा एक आहे. हा व्हिसा परदेशी लोकांना अमेरिकेत ठरावीक मुदतीसाठी ये-जा करण्यासाठी तसेच पगारी काम करण्यासाठी देण्यात येतो. व्हिसा अनेक प्रकारच्या व्यवहारांसाठी वापरता येतो. जसे की काम करणे, अभ्यास करणे किंवा फक्त परदेशी देशाला भेट देणे.

डोनाल्ड ट्रम्प यांनी अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर भारतीयांना किती व्हिसा मिळणार आणि त्यात काही कपात होणार का, या प्रश्नाची चर्चा सध्या सुरू आहे. अमेरिकेचे येऊ घातलेले अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी देशाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीच्या प्रचारात स्थलांतरितांचा मुद्दा मांडला होता. त्यामुळे या मुद्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी नुकत्याच काही नियुक्त्या केल्या आहेत. त्यामुळेही चर्चेला बळ मिळाले आहे. उदाहरणार्थ त्यांनी मूळचे भारतीय असलेले श्रीराम कृष्णन् यांना वरिष्ठ सल्लागार म्हणून कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विभागात नेमले आहे. या नेमणुकीमुळे ट्रम्प यांचे पाठीराखे नाराज झाले आहेत तसेच अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षाचे आणखी एक प्रभावी नेते विवेक रामास्वामी यांनी एच१बी व्हिसाधारकांच्या अमेरिकेतील आर्थिक विकासातील योगदानाबाबत अनुकूल स्वरूपाचे वक्तव्य केले. यामुळे आणखी एक वाद अमेरिकेत निर्माण झाला आहे. ट्रम्प यांनी सूत्रे हाती घेण्याअगोदरच अमेरिकेत वाद उफाळला आहे. याची नोंद घ्यायला हवी. शिवाय असे की, विरोध करणारे लोक डोनाल्ड ट्रम्प यांच्या रिपब्लिक पक्षाचे सदस्य आहेत, हेही लक्षात ठेवले पाहिजे. ट्रम्प सरकारमध्ये ज्या ॲलन मस्क यांना महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे, ते स्वत: एक स्थलांतरित आहेत. त्यांनी एच१बी व्हिसाचे समर्थन केले आहे. आजचे अमेरिकेचे पूर्ण माहिती तंत्रज्ञान क्षेत्र एच१बी व्हिसाधारकांच्या प्रयत्नातून उभे झाले आहे, असे मत मस्क यांनी अत्यंत ठामपणे मांडले आहे. निवडणूक प्रचारात ट्रम्प यांची घोषणा होती की, 'मला अमेरिकेला 'ग्रेट' बनवायचे आहे.' अमेरिकेत आलेल्या स्थलांतरितांनीच अमेरिकेला 'ग्रेट' बनविले आहे, असा मस्क यांच्या भूमिकेमागचा विचार आहे. अमेरिकेच्या इतिहासात एका उद्योगपतीने ॲलन मस्क यांनी दिली, इतकी मोठी रक्कम देणगी म्हणून एखाद्या उमेदवाराला दिलेली नाही, यावरून काय ते समजावे.

अमेरिकन कंपन्या, उद्योजक, भांडवलदार हे एच१बीचे समर्थक आहेत तर अमेरिकेतील नागरिकांचा एच१बीला विरोध आहे. कारण अमेरिकेतल्या अनेक आयटी कंपन्या परदेशातून एच१बी व्हिसावर आलेल्या अत्यंत गुणवान तरुणांनासुद्धा कमी पगारावर नेमतात. टीसीएस, इन्फोसिस आणि कॉग्निझंटसारख्या काही या आयटी कंपन्या निर्धारित संख्येपेक्षा जास्त एच१बी व्हिसाधारकांना नोकरीवर ठेवतात. व्हाईट हाऊसच्या म्हणण्यानुसार अमेरिकन नागरिक असलेल्या आयटी नोकरदाराचा वार्षिक पगार १.५० लाख यूएस डॉलर्स एवढा असलाच पाहिजे; त्याच गुणवत्तेचा एच१बीधारक असेल (परदेशी नागरिक असेल) तर त्याला ६० ते ६५ हजार डॉलर पगार दिला तरी चालते. म्हणजे एच१बी धारक नोकर नेमला तर कंपनीचे ८५ हजार डॉलर वाचतात. म्हणून आयटी कंपन्या ६० ते ६५ हजार डॉलर्स एवढाच पगार देऊन जास्तीत जास्त एच१बी व्हिसाधारकांना नोकऱ्या देत. परदेशी नागरिकांना कमी पगार द्यावा लागत असल्याने या कंपन्या अमेरिकी नागरिकांना नोकरीवरून काढून टाकीत किंवा नेमतच नसत. यामुळे अमेरिकेतली बेरोजगारी वाढत असल्याचा आरोप अमेरिकी राजकारणी करीत असतात. अमेरिकेत कोरोनामुळे चार कोटी लोक बेरोजगार झाले. बहुतांश बेरोजगार वर्ग मध्य अमेरिकेत राहतो. कॅनसस, मिसुरी, ओक्लाहोमा, कॅन्सस, इलिनॉईस ही त्यातली काही राज्ये आहेत. ही तुलनेने मागासलेली, गरीब राज्ये तर आहेतच; ट्रम्प यांची समर्थक राज्येही आहेत. तुमची गरिबी, दारिद्र्य यावर मी उपाय शोधीन, असे आश्वासन ट्रम्प यांनी त्यांना निवडणूक प्रचारादरम्यान दिले होते. 'अमेरिकेच्या जोरावर इतर अनेक देशांनी आर्थिक प्रगती केली. त्या देशांचा फायदा झाला; त्याचवेळी आणि त्याचमुळे अमेरिकेची आर्थिक व्यवस्था पार ढासळली. आता आम्ही आमच्या लोकांचाच प्राधान्याने विचार करू. त्यांना अधिकाधिक रोजगार कसा उपलब्ध होईल, याचा विचार करू' असे ट्रम्प प्रचारात म्हणत असत. एच१बी व्हिसाधारकांबाबत कठोर पावले उचलण्यामागचे हे एक पाऊल उचलण्याच्या विचारात ट्रम्प असावेत, असे एक मत आहे. अमेरिकन कंपन्यांना विज्ञान, कायदे, वास्तुरचना, गणित, शिक्षण आदी क्षेत्रांतील प्रवीण व्यक्तींची गरज असते. अशा व्यक्तींनाच या कंपन्या व्हिसा देण्याच्या प्रयत्नात असतात. नोकरी देताना दरवर्षी साधारण ८५ हजार कुशल परदेशी कर्मचाऱ्यांना अमेरिकेत सामावून घेतले जाते. हे बंद झाले तर ही क्षेत्रे माघारतील आणि अमेरिकेचेच फार मोठे नुकसान होईल, असे दुसरे मत आहे. एच१बी व्हिसावर टीका आत्ताच होते आहे असे नाही. उजव्या विचारांचे लोक 'हे धोरण बदलावे' अशी मागणी सतत करीत आले आहेत. एखादी कंपनी एच१बी व्हिसा देऊन परदेशातील कर्मचारी भरती करणार असेल तर ३० दिवस आधी त्यांनी ही जाहिरात दिली पाहिजे. देशात कर्मचारी किंवा तज्ज्ञ मिळाले नाहीत तरच या कंपन्यांना बाहेरच्या देशांमधून कर्मचारी मागविता येतात. सन २०१६ मध्ये डोनाल्ड ट्रम्प सत्तेत आल्यानंतर अमेरिकी काँग्रेसच्या कनिष्ठ सभागृहात त्यांनी एक विधेयक मांडले होते. त्यानुसार एच१बी व्हिसावर अनेक निर्बंध आणण्यात आले.

अमेरिकेने एखाद्या जबाबदार बलिष्ठ राष्ट्राप्रमाणे व्यवहार करावा हे अपेक्षित आहे. अनेक सर्वेक्षण संस्थांनी आपापल्यापरीने जागतिक राजकारणविषयक प्रश्नांबाबत सर्वेक्षणे केली आहेत. संयुक्त राष्ट्र संघटना तर अगतिकपणे अनेक अपप्रकारांकडे किंकर्तव्यमूढ होऊन अगतिकपणे सर्व प्रकारच्या अनिष्ट घटनांकडे उघड्या डोळ्यांनी मुकाटपणे पाहत उभी आहे. अशा निर्णायकी काळी अमेरिकेने नेतृत्व गुणांचा परिचय देण्याची आवश्यकता होती आणि आहे, पण असे घडले नाही. अमेरिकेतील दोन्ही राजकीय पक्ष आणि अमेरिकन जनमानस यांच्या भूमिकांचा मागोवा घेतला तर अपेक्षाभंगाशिवाय दुसरे काहीही पदरात पडत नाही.

गेल्या वर्षीच्या उपलब्ध झालेल्या आकडेवारीनुसार अमेरिकेने २ लक्ष ६५ हजार ७७७ व्हिसा मंजूर केले होते. त्यापैकी ७८ टक्के व्हिसा भारतीयांच्या वाट्याला आले होते. अमेरिकेच्या तांत्रिक उद्योगात भारत किती महत्त्वाचा सहभाग देतो आहे, ते यावरून लक्षात यावे. अमेरिकेला स्वस्तात कुशल मनुष्यबळ मिळाले, तर भारतीयांना अर्थप्राप्तीची संधी प्राप्त झाली. थोडक्यात काय की, एच१बी व्हिसा उभयपक्षी फायदेशीर आहे.

९४२२८०४४३०

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# इस्रोच्या कामगिरीची जगाला भुरळ

१६ जानेवारी रोजी भारताने पुन्हा एकदा यशाचे शिखर पादाक्रांत करीत जगामध्ये दबदबा निर्माण केला. स्पेस डॉकिंग करणारा भारत हा जगामध्ये चौथा देश ठरला. अंतराळ क्षेत्रामध्ये रशिया, चीन व अमेरिकेसारख्या राष्ट्राचा दबदबा असतानाही भारताने ही मोहीम यशस्वी केली. अंतराळामध्ये स्थानक तयार करण्यासाठी आणि चंद्रावर मानव पोहोचविण्यासाठी भविष्यामध्ये हे तंत्रज्ञान एक मैलाचा दगड ठरणार आहे. स्पॅडेक्स मिशनमध्ये दोन २२० किलोग्रॅमचे उपग्रह चेसर आणि टार्गेट पीएसएलव्ही-सी ६० द्वारे ४७० किमी उंचीच्या कक्षेत प्रक्षेपित करण्यात आले होते. या उपग्रहांनी प्रथम २० किमी अंतर राखून एकमेकांच्या जवळ येत ५ किमी व नंतर ३ किमी अंतरावर जवळ येऊन यशस्वी डॉकिंग केले. डॉकिंगनंतर दोन्ही उपग्रहामध्ये विद्युत शक्ती हस्तांतरणाची यशस्वी चाचणीही करण्यात आली. ही प्रक्रिया भविष्यामधील अंतराळ मोहिमांसाठी फारच महत्त्वपूर्ण आहे. हे तंत्रज्ञान भविष्यातील मानवाची अंतराळातील उड्डाणे, अंतराळामध्ये स्थानकाची उभारणी व उपग्रहाच्या देशभालीसाठीही अतिशय उपयुक्त ठरणार आहे. अंतराळामध्ये दोन उपग्रह एकमेकांना जोडणे व त्यांना अलग करणे हे वाटते तेवढे सहज सोपे नाही. परंतु, भविष्याचा वेध घेत इस्रो देशासाठी अथक प्रयत्न करून यश संपादन करीत आहे. त्यामुळेच इस्रो ही संस्था जगामध्ये मानाच्या स्थानावर आहे. अंतराळामध्ये गुरुत्वाकर्षण नसल्याने तेथे उपग्रह अतिशय वेगाने फिरत असतात. हा वेग नियंत्रित करून येणाऱ्या आव्हानांना तोंड देत इस्रोने ही कामगिरीही यशस्वीपणे पार पाडली. भारताने या कामास सन २०१६ पासूनच सुरुवात केली होती. १९६० च्या दशकामध्ये नासाने अंतराळामध्ये उपग्रहाचे डॉकिंग करून अपोलो चांद्रमोहिमेचा मार्ग मोकळा केला होता. नासा अजूनही याच तंत्रज्ञानाचा वापर करून इंटरनॅशनल स्पेस स्टेशनचे संचालन यशस्वीरीत्या करीत आहे. २०३५ पर्यंत स्वतःचे अंतराळ स्थानक उभारण्याचा आणि २०४० पर्यंत मनुष्याला चंद्रावर पाठविण्याचा महत्त्वाकांक्षी उद्देश समोर ठेवून इस्रोची भविष्यातील वाटचाल सुरू आहे. ही बाब प्रत्येक भारतीयांसाठी अभिमानाची आहे. या यशानंतर इस्रो ३० टन वजनापर्यंतचा भार पृथ्वीच्या निम्न कक्षेत म्हणजेच जवळपास दोन हजार किमीवर पोहोचवू शकणारे नवीन हेवी लिफ्ट प्रक्षेपण वाहन तयार करण्याची तयारी करीत आहे. चांद्रयान मोहिमेद्वारे चंद्रावरील दगड, मातीचे नमुने पृथ्वीवर आणले जातील. त्यासाठी वेगवेगळ्या यानांना अवकाशामध्ये जोडून पुन्हा त्यांना अलग करण्याची प्रक्रिया साधावी लागणार आहे. सन २०२८ ते २०३५ या कालावधीमध्ये भारतीय अंतरिक्ष स्टेशनची निर्मिती टप्प्याटप्प्याने डॉकिंगद्वारे केली जाणार असून भारतीय यानांनी अवकाश स्थानकाला भेट देण्यासाठी ही प्रक्रिया अतिशय आवश्यक आहे. सन २०४० मध्येही चंद्रावर भारतीय नागरिक पाठविताना स्पेस डॉकिंग याच प्रक्रियेचा अवलंब केला जाईल. भारत हे सर्व स्वबळावर विविध तंत्रज्ञान विकसित करून भविष्याची वाटचाल करीत आहे. अवकाश मोहिमांचे उद्दिष्ट सहज साध्य करणे एवढे सोपे नाही. चांद्रयान-२ या मोहिमेद्वारे प्रत्येक भारतीयाने याचा अनुभव घेतला आहे. हे अतिशय आव्हानात्मक कठीण कार्य आहे. पृथ्वीचे किंवा एखाद्या ग्रहाचे निरीक्षण करावयाचे असल्यास एखाद्या उपग्रहावर विविध उपकरणे बसवून त्या उपग्रहाला ग्रहाच्या कक्षेमध्ये स्थापन करून अपेक्षित नोंदी घेतल्या जातात. परंतु, एखाद्या ग्रहाच्या पृष्ठभागावर यान उतरवून पृथ्वीवर नमुने आणणे अशा एका यानाद्वारे अवघड असते. अशा मोहिमा अनेक यानाच्या समन्वयाद्वारे यशस्वी केल्या जाऊ शकतात. त्यामुळे स्पेस डॉकिंग ही उपलब्धी भारतासाठी अतिशय महत्त्वाची उपलब्धी आहे. हे यश इस्रोला सहज साध्य झाले असेही नाही. त्यामध्ये इस्रोच्या अनेक वैज्ञानिकांचे अथक परिश्रम आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जिद्द, चिकाटी आणि देशाच्या प्रगतीची असलेली मनातील अभिलाषा आहे. नरेंद्र मोदी यांच्या काळात भारताची होत असलेली चौफेर प्रगती विरोधकांसाठी वेदनादायी ठरत आहे. तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यास न जुमानता देशासाठी झटत आहेत. नागरिकांच्या स्वप्नातील सुंदर आणि प्रगतिशील भारताचे चित्र साकारण्यास इस्रोचे हे यशस्वी पाऊल आहे.

९८८१७१७८५६

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# नैसर्गिक शेतीतून स्थायी विकासाची क्रांती

मोदी सरकारने प्रारंभापासूनच नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्याचे धोरण अवलंबलेले दिसते. देशभरात नैसर्गिक शेतीला मिशन मोडमध्ये प्रोत्साहन देण्यासाठी 'राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियाना'चाही शुभारंभ करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने नैसर्गिक शेतीचे विविध आयाम आणि त्याचे कृषी उत्पादकतेवरील परिणाम यांचा हा ऊहापोह...

नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून ग्रामीण विकासाला मोठे पाठबळ लाभले आहे. यासंदर्भात केंद्र सरकारच्या नैसर्गिक शेतीला पूरक ठरणारे राष्ट्रीय धोरण व त्याची अंमलबजावणी या बाबीही आता तितक्याच महत्त्वाच्या ठरल्या आहेत. या नव्या व महत्त्वपूर्ण धोरणांतर्गत आगामी २०२५-२६ या वर्षांपर्यंत नैसर्गिक शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी पूरक आणि मार्गदर्शक अशा शेतजमिनीचा अभ्यास करून कृषी उत्पादकता वाढ, कृषी उत्पादनात विविधतेसह दर्जात्मक वाढ व त्याद्वारे ग्रामीण भागात अधिकाधिक रोजगार वाढीतून स्थायी स्वरूपात विकास साधणे, या उपक्रमांवर विशेष भर दिला जाणार आहे. ग्रामीण विकासाच्या माध्यमातून सर्वांगीण विकास साधण्याच्या या महत्त्वाकांक्षी उपक्रमांची केंद्र सरकारच्या प्रचलित-प्रस्थापित व भौगोलिक परिस्थितीशी सांगड स्थायी विकासाच्या प्रयत्नांशी घालण्याचा प्राधान्याने प्रयत्न केला जाणार आहे. याच प्रयत्नांचा प्राथमिक व महत्त्वाचा टप्पा म्हणून आता केंद्र सरकारतर्फे ग्रामपंचायत स्तरावर १५ हजार विकास केंद्रे विकसित केले जाणार आहेत. या ग्रामीण व कृषी विकास केंद्रांच्या माध्यमातून सुमारे साडेसहा लाख हेक्टर्सच्या कृषी क्षेत्रात नैसर्गिक शेती उपक्रमाची सुरुवात केली जाणार आहे. यातूनच जैविक संसाधन विकास केंद्र, आदर्श नैसर्गिक शेती प्रकल्पचा विकास करण्याची व्यापक योजना निश्चित करण्यात आली आहे. या प्रयत्नांना प्रत्यक्षात साकारण्यासाठी सुमारे १९ लाख शेतकऱ्यांना थेट आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले जाणार आहे. हे काम ३० हजार कृषी-सखींच्या माध्यमातून ग्रामीण स्तरावर व व्यापक प्रमाणात केले जाईल. प्रशिक्षण-प्रकल्पाद्वारे शेती आणि शेतकरी या उभयतांच्या प्रत्यक्ष सहभागावर विशेष भर दिला जाणार आहे. त्यामुळेच यामध्ये शेतजमिनीचा अभ्यास, परीक्षण, निगा व विकास, जैविक पद्धतींचा अधिकाधिक वापर, बदलत्या वातावरण व हवामानाशी अभ्यासपूर्ण सांगड व त्यातून अधिक उत्पादक व उपयुक्त शेती साधने असे व्यापक ध्येय निश्चित करण्यात आले आहे. नव्या संदर्भातील नैसर्गिक शेतीमध्ये खालील आयामांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.



**अनावश्यक रसायनांचा वापर टाळणे** : यामध्ये अनावश्यक व प्रसंगी अहितकारी रसायने व रासायनिक खतांचा वापर पुरतेपणी टाळला जाणार आहे. ही बाब शेती आणि शेतकरी या उभयतांसाठी अधिक उत्पादक व उपयुक्त ठरणार आहे.

**स्वदेशी जैविक पद्धतीचा अवलंब** : शेतीला स्वदेशी जैविक पद्धतीची जोड देण्यात येणार आहे. यामध्ये सेंद्रिय खतांच्या वापराला चालना मिळून, त्याद्वारे खऱ्या अर्थाने नैसर्गिक शेतीच्या प्रभावी उपयोगाद्वारे स्थायी विकास साधला जाऊ शकेल.

**शेत जमिनीच्या आरोग्याचा विकास** : नैसर्गिक शेतीसाठी शेतीचा कस वाढवून व शेतीच्या आरोग्य विकासाद्वारे उत्पादक शेतीवर अधिक भर असेल. यासाठी तंत्रज्ञानासह प्रगत संशोधनावर विशेष भर दिला जाणार आहे.

**पाण्याचे प्रगत नियोजन** : विकासामध्ये पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेता, नैसर्गिक शेतीमध्ये पाण्याचे नियोजन व संवर्धनावर विशेष भर दिला जाईल. त्याशिवाय त्याला शेती परिसरातील आर्द्रतेच्या उपयोगाची जोड देण्यात येणार असल्याने नैसर्गिक शेती प्रक्रियेमध्ये उपलब्ध जलस्रोतांचा अधिकाधिक व कायमस्वरूपी उपयोग होणार आहे.

**आर्थिक सक्षमता** : शेतीला आर्थिकदृष्ट्या फायदेशीरच नव्हे तर किफायतशीर बनविण्यासाठी नैसर्गिकदृष्ट्या केलेले प्रयत्न विविध प्रकारे फायदेशीर ठरावे. यामध्ये विशेषतः नैसर्गिक वा परंपरागतरीत्या उपलब्ध स्रोतांचा अधिकाधिक उपयोग करण्यात येणार असल्याने शेतीच्या उत्पादन खर्चात लक्षणीय कपात होईल व अशाप्रकारे स्थायी विकासाच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामीण विकास साधता येईल. नैसर्गिक शेतीच्या माध्यमातून स्थायी विकास साधण्यासाठी केंद्र सरकारच्या नैसर्गिक शेती व विकास उपक्रमांतर्गत व त्याच्या परिणामकारक उपाययोजनेसाठी प्रामुख्याने पुढील उपाययोजना करण्यात आली आहे.

**अर्थसंकल्पीय तरतूद** : नैसर्गिक शेतीद्वारा 'स्थायी विकास योजने'साठी शासकीयदृष्ट्या व प्राधान्य तत्त्वावर केंद्र स्तरावर २ हजार ४८१ कोटी व राज्यांच्या स्तरांवर ८९७ कोटी रुपयांची तरतूद २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी करण्यात आली आहे. आगामी दोन वर्षांच्या कालावधीत सुमारे एक कोटी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीसाठी प्रेरित करून मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये विविध भौगोलिक प्रदेश व धान्योत्पादनानुसार निवडक राज्यांचा समावेश केला जाणार आहे. नैसर्गिक शेतीची सुरुवात करून त्याला प्रोत्साहन देण्यासाठी देशपातळीवर सुमारे १० हजार शेतकरी मार्गदर्शन केंद्र स्थापण्यात येणार आहेत.

**कृषी विज्ञान केंद्रांचा सहभाग** : देशांतर्गत दोन हजार कृषी विधान केंद्रांची निवड करून त्यांच्या माध्यमातून प्रायोगिक स्तरावर शेतकऱ्यांसाठी विशेष कृषी मार्गदर्शन केंद्रे स्थापन केली जाणार आहेत.

**प्रचार-प्रसार** : नैसर्गिक शेतीला अधिक चालना देऊन त्याचा अधिकाधिक प्रचार-प्रसार करण्यासाठी 'नैसर्गिक शेती योजने'त सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांना त्या संदर्भातील नामांकनासह प्रमाणपत्र देऊन प्रोत्साहित करण्याची योजना आखली जाणार आहे.

ग्रामीण युवकांना विशेष कौशल्य : योजनेंतर्गत समाविष्ट केलेल्या 'ग्रामीण युवा कौशल्य विकास' या विशेष उपक्रमाद्वारे विविध प्रदेशातील ग्रामीण युवकांना नैसर्गिक शेतीच्या दृष्टीने आवश्यक अशा कौशल्यांचे विशेष प्रशिक्षण दिले जाईल. यातून ग्रामीण युवकांना त्यांच्या या कौशल्याच्या आधारावर रोजगार स्वयंरोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होतील. याशिवाय विविध राज्य सरकारांचे साहाय्य व सक्रिय सहभाग याद्वारे नैसर्गिक शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ केली जाईल. तुलनात्मकदृष्ट्या सांगायचे झाल्यास २०१२ साली नैसर्गिक पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या देशपातळीवर सुमारे ४० हजार होती; ती सध्या ८० हजार झाली आहे.

थोडक्यात म्हणजे नैसर्गिक शेतीला प्रयत्नपूर्वक अधिक प्राधान्य दिल्यास त्याद्वारा देशातील शेती आणि शेतकऱ्यांना बहुविध फायदे होणार आहेत.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### अनियंत्रित वाहतुकीला आवरा, स्वत:ला सावरा

फटाक्याचे आवाज करत जाणाऱ्या बाईक्सचे सायलेन्सर्स निकामी करण्याबाबतच्या वाहतूक विभागाच्या कारवाईची बातमी नुकतीच वाचण्यात आली. वाहतूक विभागाने उचललेले हे पाऊल निश्चितच अभिनंदनीय आहे. काही दुचाकी तसेच चारचाकी वाहनचालक वाहनाच्या मूळ दिव्यांच्या जागी फार प्रखर दिवे किंवा जास्तीचे दिवे, पिवळे दिवे लावून विरुद्ध दिशेने येणाऱ्या चालकांचे डोळे दिपवून टाकतात. त्यामुळे अपघाताची शक्यता खूप जास्त असते. वाहतूक विभागाने याबाबत लक्ष घालून कारवाई करावी. तसेच आजकाल रॉंग साईडने वाहन चालविण्याचे प्रकार खूपच वाढले आहे. समोरच्याला काही म्हटले तर तोच उलट शिव्याशाप, प्रसंगी हाणामारी करायलाही मागेपुढे पाहत नाही. ऑटोवाल्यांबद्दल तर न बोललेलेच बरे. संपूर्ण रस्ता त्यांचा आणि नियमही त्यांचेच आहेत, या आविर्भावात ते ऑटो चालवतात. नियम न पाळता ऑटो चालवण्यात त्यांचा हात कुणीही धरू शकत नाही. त्यांच्यावरही वचक बसावा, हीच अपेक्षा.



**विनय निजसुरे**/९५७९९६८१४४

### ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डाचा कोतेपणा!

पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेतील सिडनी येथील अखेरचा कसोटी सामना तिसऱ्याच दिवशी ६ गड्यांनी जिंकत ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट संघाने या सामन्यासह मालिका १-३ अशी खिशात घातली. पहिला कसोटी सामना सोडल्यास ५ सामन्यांच्या या संपूर्ण मालिकेत कांगारूच्या खेळाडूंनी वर्चस्व गाजवले आणि तब्बल एका दशकानंतर बॉर्डर-गावस्कर चषक उंचावला. हा चषक समारंभपूर्वक ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाचा विजयी कर्णधार पॅट कमिन्सने त्या क्रिकेट संघाचे माजी कर्णधार ॲलन बॉर्डरकडून स्वीकारला.

वास्तविक पाहता क्रिकेट विक्रमादित्य सुनील गावस्कर हे सुद्धा सिडनी मैदानावर उपस्थित होते आणि बॉर्डर-गावस्कर यांच्या नावाचा हा चषक १९९६ पासून विजयी संघाला प्रदान केला जातो. मात्र लिटिल मास्टर सुनील गावस्कर तेथे उपस्थित असतानाही त्यांना पुरस्कार वितरण समारंभाला आमंत्रित न करता ऑस्ट्रेलियन क्रिकेट बोर्डने आपल्या मनाचा कोतेपणा दाखवला. मला आठवतं १९८६ ला भारतीय क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर होता. तेव्हा कसोटी मालिकेतल्या कुठल्यातरी एका सामन्यत भारतीय संघ पराभवाच्या छायेत होता. तेव्हा सुनील गावस्कर खेळपट्टीवर होते. त्यांनी आपल्या प्रदीर्घ आणि संयमी खेळीने भारताला पराभवाच्या छायेतून सुखरूप बाहेर काढत विजयाच्या उंबरठ्यावर आणले. तेव्हा ऑस्ट्रेलियन नियतकालिकाने सुनील गावस्कर यांच्या संस्मरणीय डावाविषयी गौरवोद्गार काढताना लिहिले होते की, ''सुनील गावस्कर अजिंक्य भारतीय खेळाडू आहेत. त्यास ऑस्ट्रेलियाच काय तर संपूर्ण क्रिकेट विश्व पराभूत करू शकत नाही.''

**गजेंद्र डोळके**/८०१०६०३७८९

### रस्ते अपघात टाळण्यासाठी उपाययोजना असाव्यात

सध्या आपल्या राज्यात पोलिस भरतीसाठी युवकांकडून मोठ्या प्रमाणात तयारी चालू आहे. या प्रक्रियेत ग्रामीण भागातील युवकांनाही शारीरिक चाचणीसाठी मुख्य रस्त्यांचा सराव करावा लागतो. मात्र, या सरावामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो, तसेच रस्त्यांवर धावणाऱ्या वाहनांमुळे अपघात होण्याचा धोका निर्माण होतो. कालच, बीड -परळी रस्त्यावर राज्य परिवहन बसने तीन उमेदवारांना चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली. यामध्ये निष्पाप युवकांचा जीव गेला आणि त्यांच्या कुटुंबांवर शोककळा पसरली.

या दुर्दैवी घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उपाययोजना तातडीने केल्या जाव्यात अशी सामान्य जनतेची सरकारकडून अपेक्षा आहे. त्यात प्रत्येक गावात किंवा जिल्ह्यात पोलिस भरतीसाठी किंवा अन्य क्रीडा सरावासाठी धावण्याच्या स्वतंत्र मार्गांची व्यवस्था करावी. उमेदवारांसाठी सुरक्षित आणि मोकळी मैदाने उपलब्ध करून द्यावी. वाहनचालकांसाठी अशा ठिकाणी अधिक सतर्क राहण्याच्या सूचना द्याव्यात, फलक लावावे, आवश्यकतेनुसार सिग्नल यंत्रणा किंवा पोलिस कर्मचारी तैनात करावेत. सरकारने या बाबतीत तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी आहे. या उपाययोजनांमुळे अशा अपघातांची पुनरावृत्ती रोखता येईल आणि युवकांचे भविष्य सुरक्षित राहील.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### जिंतूरात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान जनजागृती

**जिंतूर,/प्रतिनिधी :** राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियान जनजागृती कार्यक्रम २०२५ आज रोजी दिनांक २०/०१/ २०२५ रोजी महामार्ग क्रमांक ७५२ वर बोरी आठवडा बाजार ता. जिंतूर येथे आम्ही सहाय्यक पोलीस निरीक्षक जाधव व पोलीस अंमलदार भागवत घोडके, शाकीर सय्यद, श्रीकांत कदम , असे मोटरसायकल , ट्रक चालक व इतर नागरिकांना अपघाताचे कारणे व परिणाम तसेच सदर अपघात होऊ नये करिता घ्यावयाची दक्षता व करावयाच्या उपाय योजनांचे मार्गदर्शन करून प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. १) वाहन चालवताना सीट बेल्ट वापरावा २) भरधाव वेगात वाहन चालवू नये ३) अंमली पदार्थाचे सेवन करून वाहन चालू नये ४) वाहतूक चिन्हांचे व नियमाचे तंतोतंत पालन करणे ५) लेन कटिंग करून वाहन चालू नका ६) वाहन चालवीत असताना मोबाईलवर बोलू नये ७) मो.सा चालवितांना चालक व मागील व्यक्ती यांनी हेल्मेट घालावे ८) गावाजवळ ट्रक हळू चालवा ९) रस्त्याने पायी इसमाकडे लक्ष देऊन वाहन चालवा १०) लहान मुलांना व लायसन नसलेल्या व्यक्तीला वाहन चालविण्यास देऊ नये ११) बिना लायसन ने कोणीही वाहन चालवू नये १२) वाहनाची वेळोवेळी मेकॅनिकल कडून तपासणी करून घेणे १३) आम्ही दिलेल्या सूचना आपण देखील आपल्या गावात, कॉलनीत, घरातील मंडळी,नातेवाईक यांना सांगाव्यात जेणेकरून जास्तीत जास्त वाहन चालक, पालक यांच्यापर्यंत जनजागृती अभियान संदर्भात माहिती दिल्यास जनजागृती होण्यास सहकार्य होईल.

### शिवसेना शिंदे गट जिल्हा प्रमुख व्हीजेएनटी,ओबिसी पदी मदन रेनगडे यांची निवड

**पूर्णा,/प्रतिनिधी :** शिवसेनेच्या पक्ष नेतृत्वाने मदन रेनगडे यांची परभणी जिल्हा प्रमुख व्हीजेएनटी ,ओबीसी म्हणून निवड केली आहे. मदन रेनगडे यांना जिल्हा प्रमुख (/) पत्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसावे यांच्या हस्ते देण्यात आले.

रेनगडे यांनी पक्षासाठी अनेक वर्षे निष्ठेने व प्रामाणिकपणे कार्य केले आहे. त्यांनी ग्रामीण भागातील विकास, समाजसेवा आणि शिवसेनेचा विचार लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या या नेत्रदीपक कार्याची दखल घेत, शिवसेनेच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर विश्वास दाखवला आहे.

नियुक्तीनंतर रेनगडे यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले असून, पक्ष संघटन मजबूत करणे, वंचित घटकांचे प्रश्न सोडवणे, तसेच जनतेपर्यंत पक्षाचा विचार पोहोचविण्याचे आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

शहर व जिल्ह्यातील शिवसैनिकांनी त्यांचे अभिनंदन केले असून, या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.



# इमरान लातूर व विराट नांदेड विजयी

# रौप्य महोत्सवी नितीन चषक स्पर्धेचे क्रिकेट स्पर्धा

**सेलू ,/प्रतिनिधी-:** नितीन कला व क्रीडा युवक मंडळ यांच्या वतीने स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

नूतन महाविद्यालयाचे क्रीडांगणावर दिनांक २० जानेवारी रोजी सकाळ सत्रात इमरान लातूर वि. हुंडेकरी अकॅडमी यांच्या दरम्यान लातूर संघाने प्रथम फलंदाजी इमरान लातूर संघाने वीस शतकात सात गडी बाद १७० धावा केल्या. यात मनोज मस्के ६३ धावा तेजस तोलसंके २०, वृषभ करवा २०, आशिष सूर्यवंशी वीस धावा केल्या. हुंडेकरी संघाच्या वतीने गोल दाजी करताना आदिनाथ गायकवाड ०३गडी तर अभिजीत धुहे व गौरव लगड यांनी प्रत्येकी दोन दोन गडी बाद केले. १७० भावाचे लक्ष काढताना हुंडेकरी अकॅडमीने २० षटकात १५२ धावा करत नऊ गडी बाद झाले यात मोसीन काझी ३२,अभिजीत पठारे २०, अनिस भोसले२०, अभिजीत दोहे १८ धावा करत तंबूत परतले इमरान लातूर च्या वतीने भेदक मारा करताना आशिष सूर्यवंशी व सुरेश चव्हाण यांनी प्रत्येकी दोन दोन गडी बाद केले ऐआर आर ४ गडी बाद करत १८ धावांनी सामना जिंकला.

दुपार सत्रात विराज नांदेड विरुद्ध सोल्डर हेल्थ क्लियर मुंबई यांच्या



दरम्यान प्रथम फलंदाजी विराट नांदेड ने करताना २० षटकात १७८ धावा करत नऊ गडी बाद झाले.यात यश यादव यांनी चौफेर फटकेबाजी करत १५ चौकार एक षटकार मदतीने ८३ धावा केल्या. शाहरुख काझी २१ धावा तर काझी समोद्दीन ३० धावा केल्या. शोल्डर हेल्थ क्लियर मुंबईच्या वतीने गोलंदाजी करताना पियुष कुनाजे ३ गडी तर यशराज २ गडी बाद केले.

मुंबई संघाने १७८ धावांचे लक्ष काढताना १९ षटकात १४४ धावा करत सर्व गडी बाद झाले.यात सुजन आठवले २५ धावा तर अजिंक्य अरुणोदय सोप्या फटकेबाजी करत पाच चौकार सहा षटकार च्या मदतीने ७५ धावा केल्या.

दीपक खत्री १५ धावा करत तंबूत परतल. विराट नांदेड विराट नांदेड संघाच्या वतीने गोलंदाजी करताना शाहरुख काजी ०४ गडी बाद केले तर संन्डी पाटील तीन गडी बाद करत ३४ धावाने सामना जिंकला. सामना वीर पुरस्कार प्रदान करताना विनोद तरटे, ओमप्रकाश तोषणीवाल,बाबा काटकर, अजयकुमार डासाळकर, नामदेव डंख , बंडू देवधर आदी उपस्थित होते. पंच: सय्यद जमशेद, विद्याधर पांडे, समालोचक -पवन फुल माळी, यासेर शेख, विजय वाघ गुणलेखक - सलमान सिद्दिकी -यूट्यूब लाइव्ह - डायरेक्टर - दीपक निवळकर कॅमेरामन - वैभव सरकटे, माझ अन्सारी, काफिल बागवान हे काम पाहत आहेत.

शिवसेना तालुकाप्रमुख बाबा काटकर, अविनाश शेरे,माधव लोकुलवार पांडुरंग कावळे ,धनंजय कदम,राजेश राठोड,प्रमोद गायकवाड, दीपक निवाळकर गजानन शेलार, कपिल ठाकूर मसूद अन्सारी,अभिजीत चव्हाण ,सलमान सिद्दीकी, झीशान सिद्दीकी,मोईन शेख,सुरज शिंदे, क्रीडा मंडळाचे सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत

## चिम्मा गार्डन येथील संत सेवालाल पुतळा बसवण्यासाठी शासकीय बैठक घ्या; गोर बंजारा सेनेची मागणी

**जिंतूर,/प्रतिनिधी:** पुणे येथील चिम्मा गार्डन मध्ये संत सेवालाल महाराज पुतळा बसवण्यासाठी शासकीय बैठकीचे आयोजन करण्यासाठी जिंतूर गोर बंजारा सेनेच्या वतीने दि. २० जानेवारी सोमवार रोजी तहसीलदार मार्फत पुणे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.

बंजारा समाजाचे आराध्य दैवत क्रांतिकारी सद्गुरु सेवालाल महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याच्या कामांमध्ये काही समाजकंटक अडथळा आणत असल्याच्या अनुषंगाने जिंतूर गोरसेनेच्या वतीने जिंतूर तहसीलदार मार्फत पुणे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे. सदरील निवेदनात तातडीने शासकीय बैठक बोलावून सदरील सतगुरु संत सेवालाल महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे व चोथाऱ्याचे काम लवकरात लवकर चालू करावे अन्यथा पुणे जिल्हाधिकारी कार्यालय समोर लाखोच्या संख्येने गोरसेना व सर्व समाज बांधवांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा सदरील निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर गोर सेना तालुका अध्यक्ष विजय आडे, राष्ट्रीय बंजारा परिषदेचे जिल्हाध्यक्ष संतोष राठोड कोलदंडीकर, सामाजिक कार्यकर्ते संजय आडे, प्रवीण चव्हाण, किरण राठोड, किसन आडे, सुरेश चव्हाण, विष्णू चव्हाण, रामा चव्हाण, विलास राठोड, विजय राठोड, आर्यन राठोड, शिवाजी चव्हाण, गोविंद चव्हाण, सुभाष राठोड, मारुती पवार, दीपक चव्हाण, माजी सभापती वसंतराव आडे, माणिक जाधव, संतोष आडे, बबन राठोड व सचिन आडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## सेलूत सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन जागतिक हस्तक्षार दिनाचे औचित्य

### गटशिक्षणाधिकारी कार्यालय व कल्याणम एज्युकेशन सोसायटीचा अभिनव उपक्रम

**सेलू,/प्रतिनिधी:** गटशिक्षणाधिकारी कार्यालय, सेलू व कल्याणम एज्युकेशन सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने सेलूत जागतिक हस्ताक्षर दिनाचे औचित्य साधून सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे .

२३ जानेवारी २०२५ गुरुवार रोजी या एकाच दिवशी या स्पर्धा तालुकास्तरावर घेतल्या जाणार आहेत . तालुक्यातील खाजगी अनुदानित, समाज कल्याण ,जिल्हा परिषद ,अंशतः अनुदान, विनाअनुदान, स्वयंअर्थसहायीत या सर्व शाळेतील विद्यार्थ्यांना या स्पर्धेत सहभागी केले जाणार आहे . या स्पर्धेचे हे प्रथम वर्ष असून स्पर्धा दोन गटांत होणार आहे.

यामध्ये पाचवी ते सातवी आणि आठवी ते दहावी अशा दोन गटात ही स्पर्धा राहणार आहेत. स्पर्धेसाठी उतारा लिहिण्याकरिता भारताचे संविधान ( उद्देशिका ) निवडण्यात आले आहेत.

सध्याच्या संगणक व मोबाईल च्या युगात हस्तलेखन दिवसेंदिवस मागे पडत चालले आहे .त्यातही हाताने मराठीतून लिहणे तर दूरच .सुंदर हस्ताक्षर ही एक कला असून खरा दागिनाच आहे .त्यासाठी ही कला कालबाह्य होऊ नये .व मुलांनी पुन्हा एकदा लेखनाकडे गांभीर्याने पाहावे व हस्ताक्षर सुधारावे तसेच मराठी भाषेचा प्रसार व्हावा या प्रमुख उद्देश समोर ठेऊन या स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

दोन्ही गटांतील प्रथम,द्वितीय, तृतीय क्रमांक पटकवणाऱ्या विजेत्यांना रोख रक्कम व सन्मानपत्र मान्यवरांच्या हस्ते देऊन गौरविण्यात येईल. दोन्ही गटातील विद्यार्थ्यांसाठी एकच उतारा देण्यात येणार असून स्पर्धेतील सहभागी सर्व स्पर्धकांचे उतारे शाळेने एका मोठ्या पाकिटात टाकून त्यावर शाळेचे नावं,मुख्याध्यापकाचे नावं ,मोबाईल क्रमांक टाकून दोन दिवसांच्या आत गट साधन केंद्र ,सेलू येथेजमा करावीत असे आवाहन गटशिक्षणाधिकारी ,गट साधन केंद्र सेलू यांनी सर्व केंद्र प्रमुख व मुख्याध्यापकांना एका पत्राद्वारे कळवले आहे . स्पर्धकांनी उतारा लिहिताना पेनचा एकेरी ओळी असलेल्या कागदावर दोन्ही बाजूनी समास सोडावा .उतारा लिहिण्यासाठी ३० मिनिटांचा वेळ देण्यात येणार असून स्पर्धेच्या कागदावर कसल्याही प्रकारची खाडाखोड न करता शाळेचे नावं ,विद्यार्थ्यांचे नावं ,इयत्ता व मोबाईल नंबर चा आवर्जून उल्लेख करावा .असे देखील कळविण्यात आले आहे .

स्पर्धेतील दोन्ही गटातील प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शाळेस शिक्षण विभाग पंचायत समिती सेलू व कल्याणम एज्युकेशन सोसायटी मार्फत सन्मानचिन्हे देऊन गौरवण्यात येणार आहे .

तरी या स्पर्धेत तालुक्यातील जास्तीतजास्त शाळांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन गटशिक्षणाधिकारी उमेश राऊत व निशिकांत पाटील ,अध्यक्ष कल्याणम एज्युकेशन सोसायटी यांनी केले आहे .

## तालुकास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेत जि.प.वडाळी शाळेचा डंका

**जिंतूर/प्रतिनिधी:** तालुकास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राधाकृष्ण मंगल कार्यालय येथे १५ डिसेंबर रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. सदर स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यात जिल्हा परिषदेच्या वडाळी शाळेने एकूण ९ बक्षीस पटकावले आहेत.तालुक्यात एवढे बक्षीस मिळवणारी एकमेव शाळा ठरली आहे.तालुक्यातील उपक्रम शील शाळा म्हणून वडाळी शाळेकडे पाहिले जाते.ग्रामीण भागतील विद्यार्थ्यांना गटसाधन केंद्र तर्फे व्यासपीठ उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्यार्थी व पालक वर्गात आनंदाचे वातावरण आहे. शाळेस सामूहिक नृत्य ६ ते ८ गट प्रथम क्रमांक मूक अभिनय गट ३ ते ५ प्रथम क्रमांक मूक अभिनय गट ६ ते ८ प्रथम क्रमांक नाट्यीकरण गट ३ ते ५ तृतीय क्रमांक नाट्यीकरण गट ६ ते ८ द्वितीय क्रमांक समूह नृत्य गट ३ ते ५ लक्षवेधी सादरीकरण



बक्षीस गितगायन ३ ते ५ गट महेश कैलास क्षीरसागर उत्तेजनार्थ बक्षीस गितगायन गट ६ ते ८ साक्षी लिंबाजी फुपाटे उत्तेजनार्थ बक्षीस वैयक्तिक नृत्य गट ६ ते ८ शुभ्रा सतीश तरटे उत्तेजनार्थ बक्षीस मिळाले आहे.

या यशामुळे जिल्हापरिषद वडाळी शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यार्थ्यांची कठीण मेहनत, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद यांचे मार्गदर्शन व नेहमीच उत्साह वाढवणारे वडाळी गावातील समस्त पालक यांचे सहकार्य यामुळेच हे यश मिळाले आहे. या यशाबद्दल समस्त गावकरी यांनी सहभागी सर्व विदयार्थी, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## शिवसेना प्रमुखांच्या जयंतीनिमित्त नेत्र तपासणी शिबीराची सांगता

**पाथरी,/ प्रतिनिधी:** तालुक्यातील बोरगव्हाण येथे देवनांद्रा जि प सर्कलच्या शिवसेना युवासेना शाखेच्या वतीने हिंदू-हदय सम्राट शिवसेना



प्रमुख स्व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त मंगळवार २१ जानेवारी रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिर तसेच अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रीया शिबिर आणि नागरीकांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिरात दिडशे वर रुग्णांची तपासणी करण्यात आली त्यात मोतीबिंदू असलेले १२ रूग्ण आढळून आले.

या शिबिरा साठी युवासेचे सिद्धेश्वर इंगळे पाटील, शिवसेना शाखाप्रमुख केशवराव खुडे, गावचे सरपंच भाऊराव इंगळे, उपसरपंच विठ्ल कदम, कृष्णा कांबळे, डॉ. स्वामी, भालचंद्र नेत्रालय पाथरी, सुरेश इंगळे, शिवाजीराव इंगळे, भागवत इंगळे , करण इंगळे, हनुमान इंगळे, करण कदम, अजय कदम, सीताराम धोतरे , परमेश्वर धोतरे आदी उपस्थित होते.

## जिंतूर पोदार शाळेत स्नेह संमेलन- विद्यार्थ्यांनी दाखवले विविध कलागुण

**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर शहरातील पोतदार लर्न इंग्लिश स्कूल मध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना चालना मिळावी म्हणून वार्षिक स्नेहसंमेलनात शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांनी नृत्य, सामुहिक नृत्य,सांगीत,नाटक,अभिनय, गीत गायणसह विविध कलागुणांचा उत्कृष्ट प्रदर्शन केल्याने मान्यवर मंडळी सह पालक,श्त्यांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना साथ दिल्याचे दिसत होते.

परभणी रोडवर असलेल्या पोतदार इंग्लिश स्कूलमध्ये दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक १३ जानेवारी रोजी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आलेले होते या कार्यक्रमाच्या उद्घाटन संस्था अध्यक्ष मीनाताई बोर्डीकर, शाळेच्या अध्यक्षा भावना ताई मुगूसे बोर्डीकर, प्रिन्सिपल रेणू मिश्रा,अनन्या पाल आदींच्या उपस्थितीत पार पडला स्नेहसंमेलनात सुरुवातीला कृष्णा द मोटीवेशन ऑफ लाईफ या संगीतमय थिमवर अप्रतिम सामूहिक नृत्य केले तसेच देशभक्तीसह शेतकरी महापुरुष व इतर विविध गाण्याच्या तालीवर विविध वेशभूषा करत सामूहिक,एकल नृत्याची धारदार प्रदर्शन सर्वच विद्यार्थ्यांनी दाखविली तसेच तसेच नाटक अभिनय एकांकिका एकपात्री अभिनय संगीतमय गीत गायन



तसेच इतर विविध कलागुणांची उजळणी फारच उत्कृष्टरित्या विद्यार्थ्यांनी दाखवली तब्बल तीन तास वार्षिक स्नेहसंमेलनात आलेल्या पालक श्रोत्यांना मंत्रमुग्ध झाले होते.प्रत्येक कलागुणावर सर्वांनीच जोरदार टाळ्यांची गजरा देत विद्यार्थ्यांच्या कलागुणांची दाद दिली या कार्यक्रमासाठी प्रिन्सिपल्स शाळेतील सर्वच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आदींनी अथक परिश्रम घेतले होते.

## जिल्हास्तरीय स्काऊट गाईडच्या नृत्यकला स्पर्धेत ज्ञानेश्वर विद्यालयाला प्रथम पारितोषिक

**जिंतूर,/प्रतिनिधी-** दरवर्षीप्रमाणे याही वर्षी परभणी जिल्हा ४३ व्या स्काऊट गाईड मेळावा उत्साहात पार पडला. या स्काऊट गाईड मेळाव्यामध्ये जिंतूर शहरातील ज्ञानेश्वर विद्यालय या स्काऊट गाईड पथक सहभागी झाले होते. यामध्ये शेकोटी स्पर्धा आदिवासी ढेमसा नृत्य व शोभायात्रा या दोन स्पर्धेत मुख्य शेकोटी कार्यक्रम (नृत्यकला) मध्ये परभणी जिल्ह्यातून प्रथम येण्याचा बहुमान ज्ञानेश्वरी विद्यालयाने पटकावला. त्याचबरोबर शोभायात्रा या उपक्रमामध्ये आदिवासी समाजाची वेशभूषा, केशभूषा त्यांचे रीतीरीवाच, संस्कृतीचे प्रदर्शन केले आणि जल, जमीन व जंगल यांचा रक्षण करावे असा संदेश दिला. दरम्यान या दोन्ही उपक्रमात ज्ञानेश्वरी विद्यालयाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. दरम्यान विद्यालयात स्काऊट मास्टर टापरे हिरामण, संतोष टापरे, राजपंके, जंगले मामा, यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी वाघ व प्रवेक्षक केशव राठोड, लक्ष्मण कातकडे, अंगत घुगे, दिलीप देवकर यांनी पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सदरील संचाला सन्मानित करण्यात आले.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# रोजगाराभिमुख संधी प्राप्तीसाठी आव्हानांना सामोरे जा- श्रीधर राव



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जानेवारी**

युवक आणि युवतींनी सध्याची परिस्थिती लक्षात घेता रोजगाराभिमुख संधी प्राप्तीसाठी आव्हानांना सामोरे जाण्याची गरज असल्याचे मत श्रीधर राव यांनी केले.

भारत सरकारच्या उच्च शिक्षण विभागांतर्गत तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणास गती आणि बळकटी देण्याकरिता प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान या उपक्रमांतर्गत आदर्श महाविद्यालय, हिंगोली येथे नुकतेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी उदबोधकीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. रोजगाराभिमुख संधी शोधताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या समस्यांवर मात करण्याकरिता ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली. व्यवसायिक व नोकरीच्या संधी शोधताना विद्यार्थ्यांना उपजत असलेल्या गुणांची व विकासाभिमुख देहबोलीची पारख उत्तम तऱ्हेने व्हावी या हेतूने दोन दिवशीय प्रशिक्षण कार्यशाळा आदर्श महाविद्यालय येथे घेण्यात आले.

या कार्यशाळे अंतर्गत गटचर्चा, व्यक्तिगत मुलाखत आणि परिचय पत्र सर्वोत्तम पद्धतीने कसे लेखांकित करावे याकरिता सदर उद्बोधन शिबिर घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भरीव सहभागानेही कार्यशाळा यशस्वीरित्या पूर्ण पार पडली.

महाविद्यालयातील सामंजस्य करार कक्ष आणि पदस्थापना विभाग अंतर्गत प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान राबविण्यात येत आहे. याकरिता स्पर्धा परीक्षेत व व्यवसायिक संधी मिळवून यशस्वी होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या विवेकी प्रयत्नांवर भाष्य करणारे, मार्गदर्शक तथा करिअर गुरु श्री श्रीधर राव हे छत्रपती संभाजी नगर येथून उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना पुर्णवेळ उत्साहवर्धक वातावरणात मार्गदर्शन केले.

प्रस्तुत कार्यशाळेच्या उदघाटन सत्राचे उदघाटक व अध्यक्ष म्हणून प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या या अलौकिक संधीचा उपयोग करून घेतला पाहिजे असे प्रेरक विधान प्रो. डॉ. विलास आघाव यांनी केले.

कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन करताना श्री श्रीधर राव यांनी विद्यार्थ्यांनी स्वतःचा परिचय देताना आणि लिहिताना कोणत्या क्रमाचा, संकल्पनांचा व तंत्राचा उपयोग केला पाहिजे आणि त्याची विशिष्ट कोणती पद्धत अवगत व विकसित केली पाहिजे याविषयी विस्तृत भाष्य केले. विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य विकसित व्हावे यासाठी गटचर्चा आयोजित करण्यात आली होती. सध्या भारतीय संघराज्यात एक राज्य एक निवडणूक' ही संकल्पना प्रभावी व परिणामकारकरीत्या राबवली जावी यासाठी विस्तृत चर्चा घडवून आणली. प्रस्तुत संकल्पनेची सकारात्मक व नकारात्मक बाजू काय असेल आणि त्याचे भारतीय संघराज्यावर दूरगामी कोणते परिणाम होतील याविषयी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त भूमिका व्यक्त केल्या.

सदर कार्यशाळेचे प्रस्ताविक सामंजस्य करार विभागाचे समन्वयक डॉ. आशिष गट्टानी यांनी केले. २१ व्या शतकात विद्यार्थी ज्या स्पर्धात्मक समस्यांना तसेच विशेषतः ग्रामीण शहरातील विद्यार्थ्यांना तोंड द्यावे लागत आहे त्या सर्व समस्यांची उकल या कार्यशाळेतून व्हावी असा मनोदय आणि भूमिका प्रस्ताविक व्यक्त करताना डॉ. आशिष गट्टाणी यांनी मांडली.

या उदबोधकीय कार्यशाळेस मुख्य अतिथी म्हणून आदर्श कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य रमेश दळवी यांच्यासह अंतर्गत मूल्यमापन कक्षाचे समन्वयक डॉ. सचिन पत्की उपस्थित होते. सदर कार्यशाळेस डॉ. दयाराम मस्के, डॉ. तुकाराम हापगुंडे, प्रा. प्रकाश वाकोडे, प्रा. ओम होंडराव, प्रा. निलेश उबाळे, डॉ. द्राक्षमाला जावळे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

या कार्यशाळेला यशस्वी करण्यासाठी सामांजस्य व सहाय्य करार विभागातील डॉ. लक्ष्मण सोळंके, प्रा. गौरी जोशी, प्रा. शिवाणी पारीख यांनी परिश्रम घेतले. तंत्रज्ञान व संगणकीय कार्य प्रा. राम देवडे यांनी केले. दुर्गादास टापरे, सुभाष जाधव, संजय राठोड, जिवन मोरे यांनी अथक परिश्रम घेतले. विद्यार्थ्याभिमुख असलेल्या कार्यशाळेचे सूत्रसंचालन व आभार डॉ. प्रभाकर शिंदे यांनी केले.

# दुरावा निर्माण झालेले २९५ संसार जुळविण्यात भरोसा सेलला यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जानेवारी**

हिंगोली पोलिस विभागातील भरोसा सेलच्यावतीने दुरावा निर्माण झालेल्या २९५ कुटुंबांचे संसार जुळविण्यात यश आले आहे. सदरील कुटुंबे सर्व मतभेद विसरून आनंदाने पुन्हा एकत्र आल्यामुळे आता त्यांच्या जीवनात नवचैतन्य निर्माण झाले आहे. भरोसा सेलच्या उत्तम कामगिरीमुळे पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली भरोसा सेल येथील कार्यालयात महिलांच्या कौटुंबिक वादाच्या तक्रारी अर्जामध्ये सन २०२४ मधील बैठकीत ठेवण्यात आलेल्या एकूण ११०९ कौटुंबिक तक्रारी अर्जापैकी २९५ अर्जामध्ये ज्यात सदर अर्जामधील पती व पत्नीमध्ये तसेच त्यांचे परिवारातील सदस्यामध्ये काही कारणास्तव मतभेद निर्माण झाले होते. त्यांचे संसारात वाद सुरू झाले होते. अशा जोडप्यांना योग्य व समर्पक समुपदेशन करून त्यांच्या संसारात निर्माण झालेला दुरावा मिटवून त्यांचे संसारात गोडवा आणण्यात भरोसा सेल यांनी केलेल्या परिश्रमाला यश मिळाले आहे. तसेच सदर प्रकरणी २१० अर्जामध्ये तडजोडी न झाल्यामुळे पोलिस ठाण्याला पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले आहे. तसेच ३०९ प्रकरणे कोर्ट समजपत्र, फाईल निकाली काढण्यात आले असे एकूण ८१४ प्रकरणे निकाली काढण्यात आले आहेत. सध्या २९५ प्रकरणामध्ये समुपदेशन बैठक चालू आहे. पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपाधिक्षक श्रीमती शालीनी नाईक, सपोउपनि शेख इस्माईल, महिला पोलिस अंमलदार अरूणा पेंदोर, अनिता जाधव, सीमा पाटील, वर्षा शिंदे तसेच सर्व भरोसा सेल, समुपदेशक ज्योती पोटे, राणी धुळधुळे यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

# जिल्ह्यातील सहा गावांत जाणार पाणलोट रथयात्रा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जानेवारी**

प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० योजनेची स्थानिक समुदायामध्ये पाणलोट विकासाबाबत जागरुकता निर्माण करुन पाणलोट प्रकल्पाविषयी लोकांना माहिती देण्यासाठी तसेच लोकसहभागातून योजनेच्या अंगलबजावणीला चालना देण्यासाठी केंद्र शासनामार्फत जानेवारी, २०२५ मध्ये पाणलोट रथ यात्रा सुरु करण्यात येणार आहे.

ही रथ यात्रा हिंगोली जिल्ह्यात कळमनुरी तालुक्यातील बोथी, कुंभारवाडी, डोंगरगाव पूल आणि कामठा, सेनगाव तालुक्यातील बोरखेडी व डोंगरगाव या सहा गावातून जाणार आहे. या रथ यात्रेद्वारे मृद व जलसंधारणाचे महत्व व योजनेच्या जनजागृतीसाठी, प्रकल्प क्षेत्रातील स्थानिक नागरिकांमध्ये पाणलोट विकास ही संज्ञा सुपरिचित होऊन पाणलोट प्रकल्पाबाबत जनसामान्यामध्ये जबाबदारीची भावना वाढीस लागण्यासाठी मोबाईल थिएटरद्वारे पाणलोट कामांबाबत आभासी सहलीचा अनुभव देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील निवड केलेल्या सहा गावात पाणलोट चळवळ निर्माण करणे, हातात माती घेऊन मृद व जलसंधारणाची शपथ घेणे, योजनेच्या प्रकल्प क्षेत्रातील नवीन मृद व जलसंधारण कामांचे भूमिपूजन करणे, पाणलोट कामांवर श्रमदान करणे, पाणलोट क्षेत्रात फळबाग लागवड करणे, पाणलोट क्षेत्रातील पूर्ण झालेल्या मृद व जलसंधारण कामाचे लोकार्पण करणे, पूर्ण झालेली कामे दत्तक घेण्यास स्थानिक शाळांना प्रोत्साहन देणे आदी उपक्रम यात्रेच्या माध्यमातून राबविले जाणार आहेत. दरम्यान पाणलोट यात्रा सुरु होण्यापूर्वी यात्रेसंबंधी जनजागृती करणे, समाज माध्यम व प्रसार माध्यमातू प्रचार प्रसिध्दी करणे, उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचारी व नागरिकांची पाणलोट योध्दा म्हणून निवड करणे, प्रभातफेरी काढणे, गाव व परिसरातील शाळांमध्ये चित्रकला, निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहेत.

या यात्रेचे आयोजन व्यापक प्रमाणात करण्यात येणार असून कार्यक्रम अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी सर्व विभागाची बैठक घेऊन पाणलोट यात्रेमध्ये शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, बचत गटातील महिला, युवक, स्वयंसेवी संस्था व शेतकरी यांना यामध्ये मोठ्या प्रमाणात सहभागी करुन घेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे, असे आवाहन जलसंधारण व कृषि विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.




**हिंगोली- सहकार भारतीच्यावतीने जिल्ह्यातील पतसंस्थेचे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते. यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी मार्गदर्शन केले. छाया- सुनील पाठक**

# वासवी कन्यका परमेश्वरी उद्यानाच्या नामफलकाचे अनावरण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जानेवारी**

आर्य वैश्य समाजाची कुलस्वामिनी माता वासवी कन्यका परमेश्वरी देवी यांच्या नावाने मंजूर झालेले एनटीसी मधील उद्यानाच्या जागेवर आर्य वैश्य (कोमटी) समाजाच्या वतीने नामफलकाचे अनावरण येथील समाजाचे जेष्ठ नागरिक दिवाकर निलावार व लक्ष्मीकांत गुंडेवार यांच्या हस्ते करण्यात आले, मैदानाची साफसफाई करून लवकरच मैदानावर चांगले उद्यान विकसित करण्याचा निर्धार गिरीश गुंडेवार यांनी केला. यावेळी समाजातील समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. ज्ञानेश्वर मामडे, ॲड स्वप्निल गुंडेवार, ॲड अशोक डुब्बेवार, आनंद निलावार, राजु गुंडेवार, गजानन बासटवार, राम गुंडेवार, प्रशांत गुंडेवार, कृष्णा निलावार, प्रल्हाद बासटवार, विकास कापरतवार, संतोष प्रतापवार, सचिन गुंडेवार, गिरीश बासटवार, गणेश नीलावार, संचित गुंडेवार, डॉ. सुशील गुंडेवार, विक्रांत व्यवहारे, नितीन निलावार, राजकुमार निलावार, संतोष बिडवई, समीर बासटवार, आशिष पिंगळकर, गोपाल बासटवार, प्रणव गंधेवार, संचित गुंडेवार, ऋषिकेश बासटवार, प्रवीण गुंडेवार, सुरज मामडे, राजू गुंडेवार, मनीष पिंगळकर, सोनू येरावार, सोहम गुंडेवार व इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### बहुमंडळाच्यावतीने मकर संक्रांत साजरी



हिंगोली- अखिल भारतीय मारवाडी महिला सम्मेलन व सरस्वती बहु मंडलच्यावतीने नवीन वर्षातील पहिला सण मकर संक्रांती हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला. हळदी कुंकूवाचे आकर्षण केंद्र प्रयागराज महाकुंभ मेला डेकोरेशन कुंभमेळ्यात गंगा संगम कुंभमेळा म्हणजे साधू-संत, गुरु, भक्तगण आणि श्रद्धाळू यांच्यातील ज्ञान, भक्ती आणि सेवा यांची देवाणघेवाण करणारे एक महत्त्वाचे केंद्र ठरले..खूप सुंदर करण्यात आला. प्रयागराज कुंभ मेळा प्रदर्शनचा व सेल्फि पॉईंट चा हळदी कुंकू ला आलेला सर्व महिला नी आनंद घेतला या हळदी कुंकवाचा ७५० महिला नी आनंद घेतला. कार्यक्रमासाठी उपस्थित अर्चना सोनी, दिपाली भक्कड़, प्रीति झुनझुनवाला, वर्षा मुंदडा, विजया अग्रवाल, अर्चना खंडेलवाल, सुनीता खंडेलवाल, दीक्षा खंडेलवाल, प्रीति खंडेलवाल, कीर्ति व्यास, मीना झंवर, निकिता झंवर, विजया बाहेती, आरती बाहेती ज्योति अग्रवालअनुषा अग्रवाल 'रानी सारडा सुनीता सारडा, किरण खांडल, ममता खांडल, पल्लवी खांडल, पदमा सोमानी, सुरेखा बालदी, राखी झंवर व इतर महिला उपस्थित होत्या.

### मराठी भाषा संवर्धन पंधरवाडाचे आयोजन

हिंगोली- राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त होण्यासाठी दि. १४ जानेवारी, २०२५ पासून मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात येत आहे. हा पंधरवाडा दि. २८ जानेवारी पर्यंत विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात येत आहे.या संवर्धन पंधरवाड्यात मराठी भाषेसंबंधी, वाङ्मयासंबंधी विविध परिसंवाद, व्याख्याने, कार्यशाळा, शिबिरे, कविसंमेलने, एकांकिका, बालनाट्ये, नाटके, पुस्तक प्रकाशन समारंभ, साहित्य पुरस्कार वितरण, निबंध स्पर्धा, प्रश्नमंजुषा, कथाकथन, चारोळी, लेखन, कथालेखन, कविता लेखन, हस्ताक्षर, शुध्दलेखन, वक्तृत्व घोषवाक्ये, अभिवाचन, वादविवाद, अंताक्षरी शब्दकोडी, मराठी साहित्यासंबंधी पुस्तकाचे रसग्रहण, समीक्षण, परिच्छेद अनुवाद आदी स्पर्धाचे आयोजन, परिसंवाद कार्यशाळा, ग्रंथ प्रदर्शन, ग्रंथ दिंडी, साहित्यिक कार्यक्रम घेणे यासह भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध स्वरुपाचे कार्यक्रम घेण्यात येत आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली आहे.

# कारवाई न केल्यास वंचीत बहुजन आघाडीचा आत्मदहन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जानेवारी**



डोंगरकडा येथील ग्रामसेवकाने नियमबाह्यपणे निविदा काढून मागासवर्गीय कंत्राटदारावर अन्याय केल्याप्रकरणी संबंधितास निलंबीत करून चौकशी करावी अन्यथा दि २६ जानेवारी रोजी आत्मदहन करण्याचा इशारा वंचीत बहुजन आघाडीकडून देण्यात आला आहे.

डोंगरकडा येथील ग्रामसेवक व सरपंच यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशाची पायमल्ली करीत नियमबाह्यपणे ४४ लाखांची निवीदा काढली. याबाबत वंचीतने धरणे आंदोलन केल्यानंतर प्रशासनाने तीन महिने लपवून ठेवलेला अहवाल तक्रारदारास दिला. त्यामुळे संबंधित ग्रामसेवकाची चौकशी करून तत्काळ निलंबीत करण्यात यावे अन्यथा प्रजासत्ताक दिनी आत्मदहन आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. यावेळी ज्योतीपाल रणवीर, राजकुमार इंगोले, शिवाजी खरात, राजू कांबळे, विनोद नाईक, भूषण पाईकराव, रोहन पंडीत, सिध्दार्थ कांबळे, शाम डीडुळे, बुध्दभूषण पाईकराव, प्रशांत चोपडे आदींची उपस्थिती होती.

# वसमत येथील जिल्हा परिषदेचे मैदानावर तळीरामांचा सुळसुळाट

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २१ जानेवारी**



शहर पोलीस स्टेशन समोर जिल्हा परिषदेचे मैदान आहे याच मैदानावर खेळाडू विविध खेळांच्या कौशल्यांचा सराव करत असतात आणि काही क्रिकेट खेळाडूंनी याच मैदानावर सराव करून रणजीसारख्या खेळापर्यंत पोहचले आहे. परंतु या मैदानाचा उपयोग सायंकाळच्या वेळी काही दारुडे ओपन बार म्हणून वापर करत असतांना दिसत आहे.

मैदानावर तळीरामांकडून संध्याकाळी, रात्री पिलेल्या दारूच्या रिकाम्या बाटल्या फोडल्या जात आहेत. त्यामुळे मैदानात काचे पसरवली जात आहे. खेळाडूंना या काचा पासून शारीरिक इजा होत आहे विशेष म्हणजे शहर पोलीस स्टेशनच्या हाकेच्या अंतरावर असलेले जिल्हा परिषद मैदानावर हा प्रकार घडत असताना याकडे मात्र नूतन पोलीस निरीक्षक डोळेझाक करीत असल्याचा आरोप खेळाडू वर्गातून होत आहे आता नूतन पोलीस निरीक्षकांनी वाहतुकीचा अडथळ्यासह जिल्हा परिषदेच्या मैदानात सायंकाळच्या वेळी सुरू होत असलेले ओपन बारकडे लक्ष दिल्यास मैदानावर सराव करणाऱ्या खेळाडूंना होणारी दुखापत, त्रास थांबेल असे मत खेळाडू वर्गातून होत आहे.

# पोलिस अधीक्षकांच्या उपस्थितीत व्यापारी, बँक अधिकाऱ्यांची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २१ जानेवारी**

येथील पोलिस अधीक्षक कार्यालयात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व्यापारी आणि बँक अधिकारी यांची बैठक घेण्यात आली.

यावेळी अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष गजाननराव घुगे, नंदकिशोर तोष्णीवाल यांची उपस्थिती होती. यावेळी पोलिस अधीक्षकांनी व्यापारी आणि बँक अधिकाऱ्यांना सुरक्षेच्या दृष्टीकोनांतून सीसीटीव्ही कॅमेरे तसेच इतर उपाययोजना करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी बँक अधिकाऱ्यांनाही बँक परिसरात सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह इतर उपाययोजना करून ग्राहकांची व बँकेची सुरक्षा ठेवण्याबाबत सुचना देण्यात आल्या. यावेळी सर्व राष्ट्रीयकृत बँकेचे अधिकारी, सहकारी बँकेचे शाखा व्यवस्थापक यांच्यासह शहातील व्यापारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## कांदा लागवड...



बीड : जिल्ह्यात अलीकडे कांदा लागवड व उत्पादनात मोठी वाढ झाली आहे. उन्हाळी कांदा उत्पादनासाठी शेतात वाफे करून कांद्याचे रोप लावताना शेतकरी महिला.
(छाया : श्रीकांत कुलकर्णी)

# भाषा ही संस्कृती आणि मूल्यांची वाहक असते-डॉ.राजकुमार यल्लावाड

**सावरकर महाविद्यालयात मराठीभाषा संवर्धन पंधरवड्या निमित्त व्याख्यान**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ जानेवारी**

कोणतीही भाषा ही संस्कृतीची वाहक असते.भाषेमुळे मूल्य संस्कार होतात.लोक रूढी लोकपरंपरा रुजऊन संस्कृती टिकून राहते. त्यामुळे मराठी मातृभाषा टिकली पाहिजे, तिचे संवर्धन आणि संगोपन करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचे आहे असे प्रतिपादन भाषेचे अभ्यासक डॉ. राजकुमार यल्लावाड यांनी केले.मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याा निमित्त दिनांक २२ जानेवारी रोजी २०२५ रोजीरकर महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर हे होते. व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, मराठी विभाग प्रमुख डॉ. सोपान सुरवसे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. राजकुमार यल्लावाड म्हणाले की मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे यापुढे ४५० विद्यापीठांमधून ही भाषा शिकवली जाईल. पाश्चात्य भाषा, पाश्चात्य संस्कृतीमुळे आपली बोलीभाषा धोक्यात आली आहे. मातृभाषेतून शिक्षण हे सर्वात प्रभावी आहे. अध्यक्षीय समारोपात डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की स्वातंत्र्यवीर सावरकरांचे भाषा संवर्धनासाठीचे योगदान मोठे आहे. सावरकरांनी भाषा शुद्धी आणि लिपीसुधारण्यासाठी प्रयत्न केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोपान सुरवसे यांनी केले. सूत्रसंचालन गोविंद गरड यांनी तर आभार व्यंकटेश राऊत यांनी मानले कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक कर्मचारी यांची उपस्थिती होती. मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित पुस्तक प्रदर्शनेची माहिती ग्रंथपाल डॉ. अनुजा कास्तीकर दिली.

# बोगस पीक विमा घोटाळ्याची चौकशी करून गुन्हे दाखल करा - शेकापची मागणी

## जिल्ह्यात आयत खाऊ लोकांमुळे शेतकरी आत्महात्या करत आहेत- भाई मोहन गुंड

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२१ जानेवारी**

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर बोगस शेतकऱ्यांच्या नावाने पीक विमा भरल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. केज तालुक्यातील २०२३ च्या कालावधीत सुमारे ८०% गावांमध्ये ग्रामपंचायत गायरान जमीन, शासकीय जमीन, लघु पाटबंधारे जमीन, देवस्थान व पडीक क्षेत्रावर ६८० बोगस खातेदारांनी वेगवेगळ्या नावाने पीक विमा भरल्याचे उघड झाले आहे. हे खातेदार केज तालुक्यातील नसून, यांची चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई मोहन गुंड यांनी केली आहे.

भाई मोहन गुंड यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आयतखाऊ लोक बोगस पीक विम्याचा लाभ घेत असून, त्यामुळे प्रामाणिक शेतकऱ्यांना हक्काचा विमा मिळत नाही. परिणामी, आर्थिक अडचणीत सापडलेले प्रामाणिक शेतकरी आत्महत्या करत आहेत.

शासकीय, गायरान व देवस्थान जमिनींवर बोगस नावाने पीक विमा भरल्याचे उघड.

६८० बोगस खातेदारांची चौकशी करण्याची मागणी.

संबंधित महा-ई-सेवा केंद्र व बोगस खातेदारांवर गुन्हे दाखल करण्याची विनंती.

भाई मोहन गुंड यांनी स्पष्टपणे इशारा दिला आहे की, जर दोषींवर कठोर कारवाई झाली नाही, तर शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडले जाईल. त्यांनी या संदर्भात मुख्यमंत्री, कृषी मंत्री, जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार केज आणि तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन सादर केले आहे.

निवेदनावर भाई मोहन गुंड, मंगेश देशमुख, अशोक रोडे, सुदर्शन देशमुख, महेश गायकवाड आदींच्या सह्या आहेत. बोगस पीक विम्याचा प्रकार गंभीर असून, यावर तातडीने कारवाईची गरज आहे, असे मत शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे.

# मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे. महिला आरोग्य शिबिर व किशोरवयीन मुली मुलींची निमिया चाचणी तपासणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ जानेवारी**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या अंतर्गत मा. डॉ प्राचार्य सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला आरोग्य शिबिर व किशोरवयीन मुली व मुली व मुलांची आयोजित करण्यात आली होती दिनांक १७ जानेवारी २०२५ पासून मौजे आदर्श गाव वंजारवाडी तालुका जिल्हा बीड येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे युवक व युवती शिबिर चालू आहे या शिबिरादरम्यान आज दिनांक २० जानेवारी २०२५ रोजी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते या शिबिरासाठी राजुरी नवगण येथील तज्ञ डॉक्टरांची टीम शिबिर स्थळी दाखल झाली होती यामध्ये डॉक्टर नितेश गाडवे समुदाय वैद्य वैद्यकीय अधिकारी, श्री, कल्याण सांगळे आरोग्य सेवक, श्रीमती पिंगळे पार्वती, सिस्टर, श्रीमती उषा आघाव, श्रीमती आशा ढगे पर्यवेक्षक, प्राथमिक आरोग्य केंद्र नवगण राजुरी येथील सर्व कर्मचाऱ्यांनी गावातील महिला व मातोश्री विद्यालय मौजे वंजारवाडी येथील किशोरवयीन मुला मुलींची आरोग्य तपासणी केली तसेच गावातील वयोवृद्ध रुग्णांची सुद्धा तपासणी करण्यात आली या तपासणीमध्ये सीबीसी तपासणी, निमिया तपासणी, रक्तदाब तपासणी मधुमेह तपासणी, सर्दी ताप खोकला तपासणी अशा विविध प्रकारच्या तपासण्या श्री संत भगवान बाबा मंदिर स्थळी व शिबिर स्थळी करण्यात आल्या या संपूर्ण आरोग्य तपासणीच्या कार्यक्रमासाठी डॉक्टर नितेश गाडवे यांनी १०० रुग्णांची तपासणी केली व आरोग्य विषयी मार्गदर्शन केले शरीरातील प्रोटीनचे प्रमाण वाढण्यासाठी व सशक्त आरोग्य सर्वांनी हिरव्या पालेभाज्या मोड आलेली कडधान्य, मोड आलेले मूग मटकी याचा आहारामध्ये योग्य वापर करावा दररोज किमान एक तास व्यायाम करावा किमान आठ तास झोप घ्यावी अशा



आरोग्याच्या दृष्टीने फायद्याचे असणारे मार्गदर्शन केले अध्यक्षीय समारोप करताना मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री बी डी नागरगोजे म्हणाले हे आरोग्य शिबिर आम्हा गावकऱ्यांसाठी व शाळेतील मुला मुलींसाठी खूप फायद्याचे ठरले असून या तपासणीमुळे मुला मुलींचे असणारे शरीरातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कळाले राष्ट्रीय सेवा योजनेचा एक स्तुत्य उपक्रम असून या उपक्रमामुळे गावाला फायदा होईल आरोग्य हीच संपत्ती असून प्रत्येकाने या मोफत आरोग्य तपासणी मध्ये सहभाग नोंदवावा यानंतर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक संजय काळे यांनी केले. तसेच मान्यवरांचा सत्कार डॉक्टर सुहास जोशी व सर्व स्वयंसेवकाच्या हस्ते करण्यात आला.तपासणी शिबिरासाठी गावातील श्री दगडू तांदळे, अशोकराव धुरंदरे, देवराव, कुर्लेकर, डॉ.श्रीधर आघाव, प्राध्यापक विजय सम्बेटवाड आदी नागरिक उपस्थित होते.या कार्यक्रमाचे आभार गावातील श्री अशोकराव धुरंदरे यांनी केले सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी आरोग्य तपासणीसाठी सहकार्य केले या आरोग्य तपासणीसाठी निखिल वाघमारे, अभिजीत वाघमारे, अनंत चव्हाण, इमरान कुरेशी,, अजय शिंदे, पवन कपाळे, गोविंद फासे व सर्व शिक्षक वृंद यांची उपस्थिती होती.

# संघाच्या तालुका कार्याध्यक्षपदी महादेव दौंड यांची तर तालुका संघटकपदी काशीनाथ कातमांडे यांची वर्णी

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२१ जानेवारी**



केज दि.१८ जानेवारी रोजी सह्याद्री मराठी पत्रकार संघाची २०२५ वर्षासाठीची केज तालुका कार्यकारिणी घोषित करण्यात येऊन केज तालुका पदाधिकारी निवडीची प्रक्रिया शासकीय विश्रामगृह येथे पार पडली असुन सह्याद्री मराठी पत्रकार संघ केज तालुका अध्यक्षपदी दैनिक सामना वृत्तपत्राचे पत्रकार व कराटे प्रशिक्षक श्री अनिल ठोंबरे सचिवपदी डॉ लतिफ शेख , कार्याध्यक्षपदी महादेव दौंड तर तालुका संघटकपदी काशीनाथ कातमांडे यांची निवड संघाचे अध्यक्ष गोविंद नाना शिनगारे , संघाचे पदसिद्ध सचिव तथा प्रदेशाध्यक्ष डॉ जावेद शेख , प्रदेश कार्याध्यक्ष शहजी भोसले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन सर्वानुमते करण्यात आली असून सह्याद्री मराठी पत्रकार संघ हा मागील अनेक वर्षांपासून सामाजिक, कृषी , औद्योगिक , ग्रामीण , शहरी भागातील सर्वसामान्य नागरिकांच्या विकासात्मक कार्यासाठी तसेच समाजहितासाठी कायम कटिबध्द राहिलेला आहे संघाच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य तसेच सामाजिक जनजागृती संघ अविरत करत असुन संघाने पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी सदैव आवाज उठलेला आहे तसेच पत्रकारांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न करण्याचा निर्धार करत येणाऱ्या काळात केज तालुक्यात सह्याद्री मराठी पत्रकार संघाचे काम तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी कार्य करणार असल्याचे नवनिर्वाचित पदाधिकारी यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले व सर्व पदाधिकारी यांना निवडीनंतर पुढील वाटचालीसाठी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी तसेच मित्र सहकारी यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या व सर्वांच्या सहकार्याने सह्याद्री मराठी पत्रकार संघाची केज तालुका कार्यकारिणी निवड संपन्न झाली

# स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत बालविवाह प्रतिबंध कायदा रॅलीचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२१ जानेवारी**

बीड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत मौजे आदर्श गाव वंजारवाडी येथे प्राचार्य डॉक्टर सुहास मोराळे यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर चालू आहे. दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी बालविवाह प्रतिबंध रॅली काढण्यात आली बालविवाह अपराध है, प्राधान्य द्या शिक्षणाला नकार द्या बालविवाहाला बालविवाहाचा करू निषेध यशस्वी भविष्याचा होऊ वेध, सर्वांनी आता ठरवूया बालविवाहाला हरवू या अशा अनेक घोषणांनी विद्यार्थ्यांनी घरी आली मध्ये घोषणा दिल्या. रॅली निघण्यापूर्वी बीड येथील प्रसिद्ध वकील श्री अरविंद पाटील यांनी बालविवाह प्रतिबंध कायद्यावर मार्गदर्शन केले आपल्या मार्गदर्शनात ते म्हणाले प्रत्येक आई-वडिलांनी मुलीचे वय १८ व मुलाचे वय २१ पूर्ण झाल्यास ते विवाह करण्यास पात्र ठरतील या वयाच्या आधी बाल विवाह करणे हा कायद्याने गुन्हा आहे बालविवाहास प्रत्येक नागरिकांनी



विरोध केला पाहिजे बालविवाह करणे म्हणजे अपराध आहे प्रथम प्रत्येक नागरिकांनी आपल्या मुला-मुलींना शिक्षणास प्राधान्य द्यावे व बालविवाह पासून रोखणे ही काळाची गरज आहे. बालविवाहाच्या बाबतीत १०९८ ही हेल्पलाइन नंबर असून या नंबर वरती नागरिक फोन करू शकतात. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री बी. डी. नागरगोजे होते. श्री नागरगोजे सर म्हणाले प्रत्येकाने प्रथम शिक्षणाला प्राधान्य देऊन प्रत्येक कुटुंबास प्रतिबंध करण्यास सतर्क करणे ही काळाची गरज आहे बालविवाहाचा गुन्हा करण्याआधीच बालविवाह प्रतिबंध साक्षरता अभियान राष्ट्रीय सेवा योजनेने राबविले हा एक स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम आहे.या फेरीमध्ये श्रीमती एस बी नागरगोजे, श्री शिंदे सर व जिल्हा परिषद शाळा वंजारवाडी येथील सर्व शिक्षक मातोश्री विद्यालयातील सर्व विद्यार्थी येथील सर्व शिक्षक, व विद्यार्थी राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक कार्यक्रमाधिकारी प्रा. संजय काळे,डॉ सुहास जोशी, राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक अजय शिंदे, पवन कपाळे, अभिजीत वडमारे, निखिल वाघमारे, अनंता चव्हाण, इमरान कुरेशी, प्रसाद पांडे, गावातील नागरिक श्री दगडू तांदळे, श्री गायकवाड, आदी नागरिक उपस्थित होते.


# राष्ट्रशिक्षिका सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेत विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे

## माजलगाव तालुक्यातील १ हाजार विद्यार्थीची संस्थेकडे नोंदणी विश्वस्त संकेत लांडगे वतीने विद्यार्थ्यांना आहवान

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२१ जानेवारी**

क्रांतिसूर्य बहुउदेशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने माता रमाई यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रशिक्षिका सावित्रीमाई फुले यांच्या जीवनावर आधारित सामान्य ज्ञान परीक्षेसाठी तालुक्यातून आतापर्यंत १००० विद्यार्थीची नोंदणी झाली आहे.तरी तालुक्यातील विद्यार्थीनी या सामान्य ज्ञान परीक्षेसाठी जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन क्रांतिसूर्य बहुउदेशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने संस्थेचे विश्वस्थ संकेत लांडगे यांनी विद्यार्थ्यांना केले आहे.

क्रांतिसूर्य बहुउदेशीय सेवाभावी संस्थेने मागील ३ वर्षापासून या सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन केले असून यामागील संस्थेचा मुख्य हेतू विद्यार्थ्यांना आपल्या महापुरुषाची ओळख व त्यांच्या बदलीची ऐतिहासिक माहिती कळावी हा आहे परीक्षा मध्ये बसणाऱ्या विद्यार्थींना संस्थेच्या वतीने मी सावित्री हा ग्रंथ व परीक्षा पुर्वी सर्व विद्यार्थींना मोफत दिला जाणार असून परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना नोंदणी फि १०० रु आकारण्यात येणार आहे.या परीक्षेतील यशस्वी होणाऱ्या विद्यार्थींना रोख रक्कम व पारितोषिक दिले जाणार आहे.तरी दि ३१ जानेवारी २०२५ पर्यंत जास्तीत जास्त विद्यार्थीनी सहभाग नोंदवावा असे आव्हान संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.या परीक्षेसाठी प्राचार्य सानप,प्रा.संजय बागुल,के. व्ही.साळवे, मुख्याध्यापक अभिमन्यु इबिते,राहुल टाकणखार, मुख्याध्यापक चंद्रशेखर तौर,रमेश



वजीर,नामदेव भगत,वसंत टाकणखार,कपिल डोंगरे,लक्ष्मण पोटभरे,प्रभाकर साळवे,कैलास टाकणखार, प्रा.डॉ.एम.एस.वानखेडे,प्रा.सुदर्शन स्वामी, प्रा.व्हि.एस.भिसे मॅडम,प्रमोद साळवे, वाय.बी.भोसले,प्रा.राहुल कांबळे,प्रशांत जाधव,बळीराम कोरडे,एकनाथ मस्के,बाबासाहेब जाधव,प्रा.धम्मानंद बोराडे,संघर्षकुमार डोंगरे,शांतीलाल पट्टेकर,शिवाजी ससाणे,संदीप वाघमारे,सचिन कांबळे यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे.या परीक्षेसाठी अशोक मगर, शत्रुघ्न कसबे, अश्विन टाकणखार, संदेश डोंगरे,दिनेश निसर्गंध,प्रविण ओव्हाळ,स्वप्नील स्वामी, सदानंदभैय्या प्रधान,आजिनाथ लोखंडे,केतन प्रधान,राज सोनवणे,संजोग कसबे,राहुल वाघमारे, डॉ.सुहास टाकणखार,दिपक टाकणखार, अभिजीत साळवे, संदेश निसर्गंध, सचिनदादा टाकणखार,संदेश लांडगे,रविकिरण टाकणखार, नवनाथ तोडके, नितीन मगर, विशाल टाकणखार, विजय साळवे, सचिन मगर,विलेश कांबळे,बळीराम माने,मुंजाजी तुपसमुद्रे,राज कुमावत,नंदकिशोर निसर्गंध,रोहन टाकणखार,गब्बर ससाणे,सुहास टाकणखार,आरव जोगदंड,कपिल भाग्यवंत,ऋषीकेश सोनवणे,विशाल सोनपसारे,सुजल खळगे,दिपक दादा गायकवाड,सुबोध खळगे,रविराज भालेराव,प्रमोद भदर्गे,मिलिंद भाग्यवंत,बळीराम जाधव,सिद्धार्थ साळवे,राहुल धाईजे,मानव पोटभरे,शशिकांत घनघाव,अनिल भराटे,उत्कर्ष शिंदे, नवरत्न प्रधान, अविनाश गायकवाड,सचिन सिरसट,संघपाल साळवे,रमेश बल्लाळ,सुशिम बोराडे,बबलु फंदे, उत्कर्ष शिंदे हे परीश्रम घेत आहेत.

# सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्यावर गुन्हे दाखल करून कडक कारवाई करावी; बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षकांना मराठा समाजाचे निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२१ जानेवारी**

बीड जिल्ह्यात अनेक दिवसापासून काही समाजकंटक सोशल मीडियावर चितावणीखोर व जातीवाचक भाष्य करत आहेत. जातीवाचक व चितावणीखोर आक्षेपहार्य पोस्ट व कॉमेंट करणाऱ्या विरुद्ध पोलिसांनी तात्काळ गुन्हे दाखल करावेत. अशी मागणी दि. १८ जानेवारी २०२५ रोजी बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांना मराठा समाजाच्या वतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दरम्यान सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या विरुद्ध गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कठोर कारवाई करणार असल्याचे बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी निवेदनकर्त्यांना आश्वासन दिले आहे.

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यात गेल्या काही दिवसापासून फेसबुक, इंस्टाग्राम, ट्विटर आदीच्या माध्यमातून सोशल मीडियावर काही लोक जाणीवपूर्वक आक्षेपहार्य पोस्ट टाकत आहेत. सदरील पोस्टमुळे समाजात एकमेका विरुद्ध वितुष्ट निर्माण होत आहे. सामाजिक भावना दुखावल्या जात आहेत.

सोशल मीडिया पोस्ट टाकून काही महाभाग जाणीवपूर्वक सामाजिक भावना दुखावण्याचे काम करीत आहेत. ज्यामुळे काही लोकांमध्ये नाराजी किंवा आक्षेप निर्माण होऊ शकतो. सोशल मीडियावर अशा प्रकारच्या पोस्टिंगचा परिणाम कधी कधी समाजात द्वंद्व किंवा असहमति निर्माण करू शकतो. सोशल मीडियावर पोस्ट केलेल्या सामग्रीचा समाजावर मोठा प्रभाव असतो. त्यामुळे, जरी एखादी पोस्ट वैयक्तिक अभिव्यक्ती असली तरी ती एक मोठ्या सामाजिक व सांस्कृतिक संदर्भात घेतली जाते. आणि त्यामुळे अनेक लोकांची भावना दुखावली जाऊ शकते. अशा परिस्थितीत, लोकांची प्रतिक्रिया, संताप, आणि विरोध होणे सामान्य आहे. त्यामुळे माननीय पोलीस अधीक्षक साहेब यांनी बीड जिल्ह्यात जे कोणी सोशल मीडियावर चुकीच्या व दोन समाजात तेढ निर्माण करू शकतात अशा पोस्ट टाकणाऱ्या



विरुद्ध तात्काळ कारवाई करावी. यावेळी परळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष अमित घाडगे पाटील, मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक गंगाधर काळकुटे, हनुमान मुळीक, ड. जीवनराव देशमुख, संजय गोडसे, धनंजय कराळे, ड. जाधव, सुनील सोळंके आदी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

**सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट टाकणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई करणार- पो.अ नवनीत कॉवत**

बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत कार्यालयीन कामकाज साठी बाहेर गेले असल्या कारणाने त्यांच्या सुचणेप्रमाणे पोलीस उपाधीक्षक गोल्डी यांनी निवेदन स्वीकारले. सोशल मीडियावर दोन समाजात तेढ निर्माण करणाऱ्यावर कडक कार्यवाही करावी. माँसाहेब जिजाऊ यांच्या बदल आक्षपार्ह वक्तव्य केलेल्या व्यक्तीवर कडक शासन व्हावे अशी ही मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांना दूरध्वनीद्वारे सगळया प्रकारची महिती निवेदनकर्त्यांनी दिली आहे. संबंधित लोकांवर कडक कारवाई करणार असल्याचे आश्वासन या प्रसंगी पोलीस अधीक्षकांनी दिले आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com


# ना. पंकजाताई मुंडे यांनी घेतले श्री रेणुकामातेचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**माहुर,दि. २१ जानेवारी**

पर्यावरण व वातावरणीय बदल तथा पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी सोमवार दि.२० जाने.रोजी सायं.५ वा. माहूर गडावरील श्री रेणुकामाता मंदिरात जाऊन विधिवत पूजा अर्चा करुन मातेचे दर्शन घेतले.

यावेळी संस्थान कार्यालयात सहाय्यक जिल्हाधिकारी तथा सचिव मेघना कावली यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी तहसीलदार तथा कोषाध्यक्ष किशोर यादव,विश्वस्त संजय काण्णव, दुर्गादास भोपी आदींची उपस्थिती होती. तत्पूर्वी त्यांनी दत्तशिखर येथे जाऊन भगवान श्री दत्तात्रेय यांचे दर्शन घेतले.

ना.पंकजाताई यांचे माहूर नगरीत आगमन होताच,युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष विनायक मुसळे यांनी पाच जेसीबी मशीनच्या सहाय्याने त्यांचेवर पुष्पवृष्टी केली. दरम्यान,ना. पंकजाताई यांनी शहरातील मुंडे चौकात लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी आ.भीमराव



केराम, देविदास राठोड,तालुकाध्यक्ष कांतराव घोडेकर, शहराध्यक्ष पुरोषोत्तम लांडगे,प्रा.राजेंद्र केशवे,अनिल वाघमारे, नगरसेवक सागर महामुने, महिला मोर्चाच्या शहराध्यक्षा निर्मला जोशी, स्वाती आडे, तालुका सरचिटणीस अर्चना दराडे, पद्मा गिऱ्हे, राधा उपलेंचवार, विजय आमले, तालुका सरचिटणीस अपील बेलखोडे, निळकंठ मस्के, हनुमंत मुंडे, रामकिसन केंद्रे, सदबा मुंडे ,नंदकुमार जोशी,राजु दराडे, गोपाल खापर्डे आदींसह कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सावली प्रतिष्ठानच्या वतीने एक हात मदतीचा ; आत्महत्याग्रस्त कुटुंबांना होणार मदत

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. २१ जानेवारी**

शेती पिकत नसल्याने झालेल्या कर्जाला कंटाळून आत्महत्या केलेल्या भोकर तालुक्यातील शेतकरी कुटुंबीयांना एक हात मदतीचा उपक्रमांतर्गत सावली प्रतिष्ठान व संदीप भाऊ गौड मित्र मंडळाच्या वतीने संसार उपयोगी साहित्याचे वाटप २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी खा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

शेती पिकत नसल्याने कर्जबाजारी झालेल्या अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली त्यामुळे त्यांचे कुटुंब उघड्यावर आले, भोकर तालुक्यात २०२० पासून ते २०२४सालापर्यंत५० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत अशा कुटुंबीयांना सावली प्रतिष्ठान व संदीप भाऊ गौड मित्र मंडळाच्या वतीने संसार उपयोगी साहित्य देऊन खा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते सन्मानित करून जगण्याचा विश्वास दिला जाणार आहे. २६ जानेवारी २०२५ प्रजासत्ताक दिनी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून श्री हनुमान मंदिर जि. प. हायस्कूलच्या पाठीमागे किनवट रोड भोकर येथे सायंकाळी ५ वाजता हा कार्यक्रम होईल तालुक्यातील आत्महत्याग्रस्त कुटुंबीयांनी या कार्यक्रमास उपस्थित राहून साहित्य वाटपाचा लाभ घ्यावा असे आवाहन सावली प्रतिष्ठानचे अध्यक्ष बी. आर. पांचाळ, उपाध्यक्ष बाबुराव पाटील, सचिव महेश नारलावार, व संदीप भाऊ गौड मित्र मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# भर दिवसा कासराळी शिवारातून दोन मोटार सायकल चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर,दि. २१ जानेवारी**

बिलोली तालुक्यातील ग्राम कासराळी येथे शनिवार दि.१८ जानेवारी रोजी भर दिवसा सायंकाळी पाच,सहा वाजेच्या दरम्यान दोन शेतकऱ्यांचे मोटार सायकल चोरीला गेल्याची घटना घडलेली आहे.

पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार,मौजे कासराळी येथील शेतकरी उस्मान अहेमद शहा व मित्र कर्वेडकर हे शेती संबंधित कामासाठी आपापली मोटार सायकल घेऊन पाच वाजेच्या सुमारास गेले होते. शेताजवळील गंदमवाड तलाठी यांच्या समाधीजवळून अनुक्रमे होंडा शाईन कंपनीची मोटार सायकल क्र.एमएच २६/बीके ७७०१ व हीरो पॅशन प्रो कंपनीची मोटार सायकल क्र.एमएच २६/एएन ३४५९ या दोन्ही गाड्या अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याचे गाडी मालकांच्या निदर्शनास आले.घटनास्थळी इकडे तिकडे शोध घेतल्यानंतरही गाडीचा ठावठिकाणा कुठेच त्यांना लागला नाही.

संबंधित बाबी संदर्भाने रविवार दि.१९ जानेवारी रोजी बिलोली पोलीस ठाण्यात गाडी मालकांकडून तक्रार दाखल करण्यात येऊन,अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.दोन्हीं मोटार सायकलची अंदाजे किंमत एकत्रित ६०हजार रू.एवढी आहे.अज्ञात चोरट्यांचा छडा लावण्यासाठी पुढील तपास पोलीस कॉन्स्टेबल कुमारप्रसाद गायकवाड हे करीत आहेत. दिवसेंदिवस कासराळी परिसरातून मोटार सायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याची चर्चा गावपरिसरात होत असल्याचे बोलले जाते.

# नागेश लुटेला राष्ट्रीय सब ज्युनीअर ज्यूदो स्पर्धेत रौप्य पदक



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २१ जानेवारी**

सब-ज्युनिअर राष्ट्रीय ज्यूदो स्पर्धेत नागेश लुटे याने ६१ किलो गटातुन महाराष्ट्राचे नेतृत्व करत रौप्य पदक पटकावले आहे.

पुणे येथे दि.१८ ते २२ जानेवारी या कालावधीत पुणे येथे राष्ट्रीय सब ज्युनीअर ज्युदो स्पर्धा आयोजीत करण्यात आली होती. या स्पर्धेत मुदखेड येथील राजर्षी शाहू विद्यालयाचा विद्यार्थी नागेश नारायण पाटील लुटे याने १४ वर्षाखालील ६१ किलो वजनी गटातील ज्यूदो कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनीधीत्व करत रौप्य पदक पटकावले.

नागेश लुटे याने मिळवलेल्या यशाबद्दल नांदेड जिल्हा ज्युदो असोसिएशनचे सचिव प्रवीणकुमार कुपटीकर, उपाध्यक्ष रविकुमार बकवाड, जिल्हा क्रिडाधिकारी जयकुमार टेंभरे, क्रिडाधिकारी संजय बेतिवार, बालाजी शिरसीकर, विठ्ठल पुयड, जगतसिंघ गाडीवाले, दिलीपसिंघ गाडीवाले, रविकिरण डोईफोडे, प्रल्हादराव पुयड, जगन्नाथ टरके, गोपिचंद लुटे पाटील, अमोल कंकाळ, बारी वस्तादसह पैलवान नागेश लुटेचे सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

## संक्षिप्त वृत्त

### माहूर मेडिकल असोसिएशनच्यावतीने २४ रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन

**माहूर-** अखिल भारतीय मेडिकल असोसिएशन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष जगन्नाथ आप्पा शिंदे यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण भारत देशात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून,त्यानिमित्ताने माहूर तालुका मेडिकल असोसिएशन केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेकडून दि. २४ जानेवारी रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत स्थानिक हॉटेल कृष्णा पॅलेस येथे रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती माहूर मेडिकल असोसिएशन केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे तालुका अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष समर भाऊ त्रिपाठी यांनी दिली आहे. माहूर शहरासह तालुक्यात मौजे वानोळा, वाई बाजार ,कुपटी,आष्टा इत्यादी ठिकाणी केमिस्ट आणि ड्रगिस्ट मेडिकलची एकूण ५५ दुकाने असून, या संघटनेकडून दरवर्षी रक्तदान शिबिराचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात येते.मेडिकल संघटनेच्या पदाधिकारी,सदस्यांसह शहरातील नागरीकही मोठ्या संख्येने या रक्तदान शिबिरात रक्तदान करतात. या शिबिरात मेडिकल असोसिएशन सह वैद्यकीय संघटनांकडून मोठ्या प्रमाणात रक्तदान करण्यात येते.मानवास जीवनदान ठरणारे मानवी जीवनातील सर्वात मोठे दान म्हणजे रक्तदान असून, या मानवतावादी उपक्रमात सहभागी होऊन शिबिरात जास्तीत जास्त रक्तदात्यांनी आपले रक्तदान करावे असे आवाहन माहूर तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष समर भाऊ त्रिपाठी, प्रशांत जहागीरदार, रितेश देशपांडे, फैसल बावाणी, सुनील कलाने, जावेद खीच्ची, सुनिल गोविंदवार, सचिन बेहेरे, शेख परवेज शेख मुसा, प्रतीक चुंगडे, तौसिफ बावाणी, घनश्याम केशवे, इसाद कुरेशी यांचेसह मेडिकल संघटनेकडून करण्यात आले आहे.

### महारेशीम अभियान रथाचे जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते उद्घाटन

**नांदेड -**नांदेड जिल्ह्यातील महारेशीम अभियानाची सुरुवात जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी रथाला हिरवी झेंडी दाखवून केली आहे. सन २०२५-२६ मध्ये महारेशीम अभियान अंतर्गत तुती लागवड, मनरेगा सिल्क, समग्र दोन योजनेअंतर्गत तसेच वैयक्तिक नवीन तुती लागवड करणास उत्सुक असलेल्या शेतकऱ्यांची नोंदणी करण्यासाठी दिनांक ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महा रेशीम अभियान जिल्ह्यात राबविण्यात येत आहे. ९ जानेवारी ते ९ फेब्रुवारी या कालावधीत हा उपक्रम राबविण्यात येणार आहे . नवीन तुती लागवड करण्यासाठी उत्सुक असलेल्या शेतकऱ्यांनी नाव नोंदणी करण्यासाठी जिल्हा रेशीम कार्यालय, रामकृष्ण इमारत, दुसरा मजला, एम एफ होंडा शोरूमच्या बाजूला, जॉन डियर सर्विस सेंटरच्या समोर, हिंगोली रोड नांदेड येथे संपर्क करावा. तसेच तालुका कृषी कार्यालय व पंचायत समिती कृषी विभाग यांच्याशी संपर्क साधून नवीन तुती लागवड करिता सभासद नोंदणी करावी, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी नांदेड यांनी केले आहे. जिल्ह्यात महारेशीम अभियानाच्या रथास जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते दिनांक १५ जानेवारी रोजी हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी संजीव मोरे, उपजिल्हाधिकारी शिंदे, रेशीम विकास अधिकारी पी. बी.नरवाडे, क्षेत्र सहाय्यक पी. यु. भंडारे, ए. एन. कुलकर्णी, एन. वाय.कोरके, ए.बी.यलकटवाड, दत्ता भुसकटे, प्रसाद डुबुकवाड उपस्थित होते.

### रोषनगावात गावसन उत्साहात साजरा

**धर्माबाद-** तालुक्यातील रोषनगाव येथे गावसणा निमित गावात आसलेल्या लक्ष्मीपूजनाचे पुजन करून प्रत्येक घरामध्ये मोठ्या आनंदाने उत्साहात महीला व पुरुष मंडळींनी हा सण साजरा केला गावसणा निमित्त लक्ष्मी मातेच्या मंदिराला रंगरगोटी करण्यात आली होती. पौष महिना आसल्याने लक्ष्मी मातेला माटावर दिवा लावून तो माट डोक्यावर घेऊन महिलांनी आळंक्या काढल्याने गावात दिव्यांची रोषणाई दिसत होती . गोदावरी नदीच्या पाण्याने लक्ष्मी मातेच्या मुर्तीचा अभिषेक करण्यात आला . हरभऱ्याची हिरवी भाजी, दहीआंबील ने भरलेले कळस मांडून वरण-भाताचे ऑप्पल - वडे शेंगोळ्या चा नैवेद्य ठेऊन लक्ष्मी मातेच्या मुर्ती ची सुंदर सजावट करून आरती करण्यात आली गावकऱ्यांच्या वतीने दि. २२ रोजी सार्वजनिक महाप्रसाचे आयोजन करण्यात आले आहे. दीपोत्सव पर्वातील सर्वाधिक महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या या गावसणात माता लक्ष्मी माता पूजनाचा सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला यात गावातील महिला पुरुष तसेच पाहूने मंडळी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

### जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**नांदेड-** भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त २६ जानेवारी रोजी ध्वजारोहणाचा राष्ट्रीय कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमाच्यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यादृष्टीने जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत केले आहेत.

### स्वातंत्र्य सैनिक गंगाधरराव कोलूरे यांचे निधन ; शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**नायगाव-** भोकर तालुक्यातील हाडोळी येथील जेष्ठ नागरीक, स्वातंत्र्य सैनिक गंगाधरराव गंगाराम कोलुरे वय ९७ वर्ष यांचे दि. २० जानेवारी रोजी सोमवारी रात्री १० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले आहे. गंगाधरराव कोलूरे यांच्यावर शासकीय इतमामात दि.२१ रोजी मंगळवारी हाडोळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात्य दोन मुले, सूना,नातू,नात असा मोठा परिवार आहे. अंत्यविधीस भोकरचे तहसीलदार गुंडमवार , सुभाष पाटील किन्हाळकर, किशोर पाटील लगळुदकर,सुरेशराव देशाई कामनगावकर, मंडळ अधिकारी, तलाठी सह गावातील नागरिक पाहुणे मित्रमंडळी उपस्थित होते.

# रक्तदान शिबिर

**नायगांव-** नायगाव येथील ग्रामीण रुग्णालयात जगदुरु नरेंद्राचार्य महाराज संस्थान नाणिजधामच्या वतीने महारक्तदान शिबिर संपन्न झाले. यावेळी एकूण १८५ रक्तदात्यानी रक्तदान केले. शिबिराचे उद्घाटन उपनगरध्यक्ष विजय पा. चव्हाण यांच्या हस्ते जगदुरु नरेंद्राचार्य महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून महाआरती करण्यात आली.

# हळदी कुंकू निमित्त वृक्ष संवर्धन व जतन



**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर,दि. २१ जानेवारी**

हिमायतनगर शहरांमध्ये श्री महालक्ष्मी सखी ग्रुपच्या वतीने वृक्ष संवर्धन व धार्मिक हेतूने हळदी कुंकवाच्या कार्यक्रमांमध्ये वृक्ष जतन करण्यासंदर्भात सामाजिक संदेश देण्यात आला या हळदी कुंकू कार्यक्रमांमध्ये र हळदीकुंकवाच्या कार्यक्रमासोबत श्री महालक्ष्मी सखी ग्रुपच्या वतीने झाड शमी. बेल. आवळा. ही पारंपारिक झाडे श्री महालक्ष्मी सखी ग्रुपच्या वतीने झाडे वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

हिमायतनगर शहरातील सर्व महिलांनी मोठ्या संख्येने चांगला प्रतिसाद दिला हा कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश पारंपारिक झाड हे आता दुर्लभ होत आहेत त्याचे जतन झाले पाहिजे व आध्यात्मिक कार्यक्रमांमध्ये आजपर्यंत या पारंपारिक झाडाच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम केला भावनेच्या दायित्व या नात्याने सौअनिताबाई सकवान सौ अश्विनी चिंतावार यांच्यासह श्री महालक्ष्मी सखी ग्रुपच्या वतीने सौ आनिता सकवान यांच्या घरी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमांमध्ये सखी ग्रुपच्या सौ अश्विनी चिंतावार सौ कांचन सकवान सौ पूजा पळसकर सौ ज्योत्स्ना पळसकर सौ सुमन मुंडावरे सौ सुनिता देवसरकर सौ शितल चिंतावार सौ माधुरी आरेलवार सौ भाग्यश्री येरावार सौ प्रतिभा पांडे सौ पुष्पा माळवी सदरील कार्यक्रम या सर्व सखी ग्रुपच्या महिलांनी आयोजित केला होता.

# वाचन संकल्प विचारांना प्रगल्भ बनवून व्यक्तिमत्त्व विकासासाठीही महत्त्वाचे ठरते : डॉ. शिल्लेवार

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. २१ जानेवारी**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार व विद्यापीठाच्या सूचनेनुसार वाचन संकल्प अभियान अंतर्गत आज दि. १८ जानेवारी २०२५ रोजी समीक्षा लेखन उपक्रम शिवाजी राजे महाविद्यालयात यशस्वीपणे राबविण्यात आला असून या उपक्रमात किनवट माहूर तालुक्यातील जवळचपास ३०० विद्यार्थी सहभागी झाले होते

विश्वविद्यालयाच्या मार्गदर्शन व सूचनेनुसार विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढीस लागावी तसेच विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी,त्यांच्या ज्ञानात भर पडावी या उद्देशाने दि. १८ जानेवारी २०२५ ते २० जानेवारी २०२५ दरम्यान या अभियानांतर्गत पुस्तकांचे सामूहिक



वाचन, वाचन कौशल्य कार्यशाळा आयोजन, ग्रंथ प्रदर्शन, वाचन संवाद कार्यक्रमांतर्गत लेखकांचा वाचकांशी संवाद इत्यादी उपक्रम राबवण्यात आले.

'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राज्यातील वाचनसंस्कृतीला बळकट करण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. या उपक्रमामुळे तरुण पिढीमध्ये ग्रंथ वाचनाची आवड निर्माण होईल, ज्यामुळे त्यांचा ज्ञानाचा आवाका वाढेल आणि त्यांना नव्या क्षितिजांचा शोध घेण्यासाठी प्रेरणा मिळेल. वाचनाची सवय फक्त शैक्षणिक प्रगतीसाठीच नव्हे, तर सामाजिक आणि वैयक्तिक विकासासाठीही महत्त्वाची आहे. त्यामुळे वाचनाच्या या प्रवासात प्रत्येक विद्यार्थ्याने आपले योगदान द्यावे आणि वाचन संस्कृतीला अधिक गतिमान बनवावे. वाचन संकल्प केवळ वाचनाला नवा अर्थ आणि उद्देश देणार नाहीत तर उत्तरदायित्व आणि विद्यार्थ्यांमध्ये आयुष्यभर वाचनाची आवड निर्माण करतील असे मत प्रमुख वक्ते ऍड. डॉ. सागर शिल्लेवार यांनी व्यक्त केले. सदर कार्यक्रमास प्रा.डॉ. गजानन जाधव, प्रा. रजनी पेरेवार, प्रा. सोनी कोलावर यांची उपस्थिती होती. प्रस्तावीक प्रमोद राठोड यांनी केले तर आभार प्रा नवघडे यांनी मानले.

# वैद्यकीय महाविद्याल येथील वसतिगृहाच्या बांधकामासाठी ३५ कोटी मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २१ जानेवारी**

डॉ.शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड येथे इडब्ल्यूएस योजनेअंतर्गत मुलांच्या वसतिगृहाचे बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष जीवन घोगरे पाटील यांनी नुकतीच वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली होती. या मागणीची दखल घेऊन मंत्री हसन मुश्रीफ यांनी ३५ कोटी रूपये वसतिगृह बांधकामासाठी निधी तात्काळ मंजूर केले आहेत. राष्ट्रवादीचे शहर जिल्हाध्यक्ष जीवन घोगरे पाटील यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

नांदेड येथील डॉ. शंकराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालयात अनेक जिल्ह्यांतून वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी येतात. परंतु सदरील ठिकाणी त्या विद्यार्थ्यांची राहण्याची गैरसोय होत होती.

# आरटीई शिक्षण प्रवेशाबाबत मार्गदर्शन शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २१ जानेवारी**

भारतीय जनता पार्टीच्या वतीने आरटीई शिक्षण प्रवेशाबाबत मोफत मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले असून याचा लाभ घेण्याचे आवाहन भाजप महानगर चिटणीस क्षितिज जाधव यांनी केले आहे.

शहरातील जंगमवाडी रोड येथील शिव इंटरप्रायझेस येथे दि. १९ जानेवारी या शिबिराचा शुभारंभ भाजपाचे माजी महानगर अध्यक्ष प्रवीण साले यांच्या हस्ते करण्यात आला. दि. २७ जानेवारी पर्यंत हे शिबिर चालणार असून पालकांनी आपल्या पाल्याच्या प्रवेशासाठी लागणाऱ्या आधार कार्ड, उत्पन्नाचा दाखला, जात प्रमाणपत्र आदी कागदपत्रासह संपर्क साधण्याचे आवाहन क्षितीज जाधव यांनी केले आहे या शिबिरासाठी उमेश दिघे, सुरेश गच्चे, पवन जाधव, विजय जाधव, रवी पेरूका, आकाश लेवडे, विकी सोनकांबळे, अजिंक्य गांजापुरकर, दास निखाते, निखिल हटकर, अनिकेत कदम, प्रतिमेश बुक्तरे, दीपक बुक्तरे, किरण नरवाडे सचिन भोसले, उत्कर्ष नरवाडे, माधव खंडागळे, जनार्दन बुक्तरे, देवानंद देवर, सुजित सूर्यवंशी विनायक माळी हे परिश्रम घेत आहेत.

सचखंड गुरुद्वारा सोने वितळणी प्रकरण

# चौकशीचा अंतिम अहवाल ३१ मार्चला

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २१ जानेवारी**

सचखंड गुरुद्वारातील भाविकांनी भेट स्वरूपात दान दिलेले बहुमूल्य दागिने वितळून गैरव्यवहार प्रकरणी रणजीतसिंघ व राजेंद्रसिंघ पुजारी यांनी ॲड. वासिफ शेख यांच्या मार्फत याचिका दाखल केली होती. यावर उच्च न्यायालयात सुनावणी झाली असता जिल्हाधिकाऱ्यांच्या विनंतीवरून न्यायालयाने ३१ मार्चपर्यंत अंतिम चौकशी अहवाल देण्याचे आदेश दिले आहेत.

सिख धर्मियांची दक्षिण काशी मानल्या जाणाऱ्या सचखंड गुरुद्वारा येथे दरवर्षी हजारो भाविक दर्शन घेतात. श्रद्धेपोटी भाविकांकडून गुरुद्वारा बोर्डाला हिरे-मोती, सोने चांदीचे दागिने भेट स्वरूपात दान केले जातात. अशाप्रकारे १९७० ते २०२० दरम्यान प्राप्त झालेले सोने चांदी वितळून अशुद्ध कमी वजनाचे सोने जमा केल्याचा आरोप याचिकाकर्त्यांनी करीत चौकशीची मागणी केली आहे.

याप्रकरणी जिल्हा प्रशासनाने अतिरिक्त जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय चौकशी समिती नेमली आहे. या मध्ये पीएनजी ज्वेलर्स शाखा नागपूर व पुणे यांच्यासह महानगर पालिका लेखाधिकारी, दोन पंचऱ्यारे, वेंधमापन शास्त्र नांदेड उपनियंत्रक व उप जिल्हाधिकारी सामान्य यांचा समावेश आहे.

या समितीचा अंतिम अहवाल ३१ मार्च रोजी येणार असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. अभिजीत राऊत यांनी सहाय्यक शासकिय अभियोक्ता यांना विनंतीचे शपथपत्र दिले आहे. त्यावर उच्च न्यायालयाचे न्या. एस.जी. मेहत्रे, शैलेश पी. ब्रम्हे यांनी विनंती मान्य करीत दि. ३१ मार्च २०२५ रोजी अंतिम चौकशी

# पोलिस व पत्रकारांना परस्पर सहकार्याची गरज : अबिनाश कुमार

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. २१ जानेवारी**

पत्रकार संरक्षण समितीच्या वतीने देगलूर येथे आयोजित पोलीस व पत्रकारांचा सन्मान आणि कार्यालय उद्घाटन सोहळ्यात जिल्हा पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी पोलिस व पत्रकारांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेवर भाष्य केले.

ते म्हणाले पोलिस आणि पत्रकार हे समाजाचे आधारस्तंभ असून, सत्य आणि न्यायासाठी दोघांचेही समान उद्दिष्ट आहे. त्यामुळे परस्पर आदर आणि सहकार्य राखणे अत्यावश्यक आहे. फक्त हंगामा



निर्माण करण्याऐवजी सकारात्मक बदल घडवणारी पत्रकारिता करणे महत्त्वाचे आहे.

कार्यक्रमात पोलिस व पत्रकार यांचा सन्मान करण्यात आला. यात विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यात सेवानिवृत्त वाहतूक पोलिस शेख अब्दुल अमीर यांना आदर्श पोलिस पुरस्कार, देगलूर शहर स्वच्छतेचा जागर ग्रुपला आदर्श पर्यावरण मित्र पुरस्कार, स्व. प्रशांत माळगे (मरणोत्तर) आणि ज्येष्ठ पत्रकार अविनाश देशपांडे यांना आदर्श पत्रकार पुरस्कार प्रदान करण्यात आले. यावेळी कार्यालय उद्घाटन अबिनाश कुमार व संस्थापक अध्यक्ष विनोद पत्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी संकेत गोसावी उप वि. पो. अ., पो. नि. मारूती मुंडे, सहायक पोलिस निरीक्षक, माजी नगराध्यक्ष मोगलाजी शिरशेटवार, लक्ष्मीकांत पदमवार, डॉ. पूजा सचिन गायकवाड संघटनेचे जिल्हाध्यक्ष महेंद्र गायकवाड, जिल्हा सचिव शशिकांत गाडे पाटील यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुकाध्यक्ष शेख असलम यांनी केले तर सूत्रसंचालन मिलिंद वाघमारे आणि आभार प्रदर्शन गजानन टेकाळे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शेख असलम (तालुकाध्यक्ष), अमित पाटील (उपाध्यक्ष), मिलिंद वाघमारे (सचिव), धनाजी देशमुख (कार्याध्यक्ष), तौहिद काझी (कोषाध्यक्ष), गजानन टेकाळे (संघटक), मनोज बिरादार (सहसचिव), धनाजी जोशी (प्रसिद्धीप्रमुख), गजानन शिंदे (सहकोषाध्यक्ष) प्रसेनजीत दावणगीरकर (सदस्य) उबेद हबीब (सदस्य), किरण सोनकांबळे (सदस्य), सय्यद समी, सुजित सूर्यवंशी, अफान शेख, सचिव कुंभारे आदींनी परिश्रम घेतले.